आर्यांना पंजाबातील नद्यांच्या उन्हाळी महापूराची माहिती नसल्यमुळे जागोजागी आर्य गांवे पुरात सापडली. इंद्र संस्कृतीची स्थापना झाल्यानंतर गावोगावचे शबर, किरात, निषाद व नागलोक भयमित झाले. भितीने हया लोकांच्या अनेक टोळया निरनिराळया देशात पळून गेल्या. विंध्य, सातपुडा ओलोंडून ते तापी नर्मदेच्या खोऱ्यात आले. पुढे सहयाद्री पर्वताच्या व गोदावरीच्या खोऱ्यात स्थिरावले. त्यांनी सरमक राज्य स्थापिले. ते इ.स.पूर्व ६०० ते ३०० पर्यंत येथे होते. इ. स.पूर्व २०० मध्ये

* प्राध्यापक - प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ४११ ००७.

आर्यांनी आदर्शवादी वाड.मयाची लाट सुरु केली. सूर लोकांची इतिहास लेखनाची प्रथा बंद पडून चौथ्या शतकापासून पुराण लिहिणे सुरु झाले. क्षत्रियांना हिणविण्यासाठी शुद्र म्हणणे सुरु केले. सातवाहन, होयसळ, यादव आणि त्यानंतरची मुस्लीम राज्य यांत वेळोवेळी आदिवासींचे अनेक उठाव झाले. काळाच्या ओघात आदिम जमातीची अनेक प्रदेशात राज्ये निर्माण झाली. त्यांच्या अनेक संस्कृती विकसित झाल्या. त्यात गोंडांची व भिल्लांची संस्कृती प्रसिध्द होती. त्यांची स्वतंत्र राज्ये होती. गोंड, भिल्ल संस्कृतीबरोबर संताळ, नागा, मिझो, हॅू, ओरॅान यांच्याही संस्कृती विकसित झाल्या.

एका स्वतंत्र दृष्टीकोनातून आदिवासी समाजाकडे पाहिल्यावर असे म्हणता येईल की, आदिवासी हा पूर्ण विकसित मानव असून त्यांची स्वतंत्र भाषा, संस्कृती, जीवनपध्दती होती व आजही ती टिकून आहे. आदिवासींचे जीवन इतके एकसंघ आहे की, त्यांच्या राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक परंपरा इत्यादीबाबत विचार करत असता एखाद्या अंगाचा वेगळा विचार करता येत नाही.

भारतातील आदिवासींना वेरिअर एल्विन आणि जवाहरलाल नेहरुन यांची 'मूलनिवासी' म्हणून संबोधले. डॉ. एल्विन ' aborigins ' या शब्दाने त्यांचे आदिवासीत्व सांगतात, तर डॉ. हट 'Primitive Tribe' (आदिम जमाती) असे म्हणतात. रिसले, लॅस्सी, गिकसन, शूबर्न, सेडविक आणि मार्टिन या विचारवंत, समाजशास्त्रज्ञांनीही त्यांना 'अगदी प्राचीन' (Aboriginal) किंवा 'अगदी मूळचे रहिवासी' (Aborigines) म्हटले आहे. थोर भारतीय समाजशास्त्र श्री. धुर्वे यांनी त्यांना 'तथाकथित मूळचे रहिवासी' (so-called Aborigines) असे म्हटले आहे. १९३१ मध्ये ब्रिटीश सरकारने आदिवासींची जनगणना केली त्यावेळी 'पशुपूजक' Aborigines अशी त्यांची नोंद केली. ब्रिटीशांनी 'आदिवासी ' Tribal हाच शब्द वापरला. पुढे स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्य घटनेने, कलम ३४२ (१) अनुसार राष्ट्रपतींनी घोषित केलेल्या सामाजिक समूहांना अनुसूचित जमाती (Scheduled Tribe) असे संबोधले. जगातील २३ टक्के आदिवासी / भारतात ८ टक्के पेक्षा जास्त आदिवासी आहेत. त्यात ५ टक्के आदिवासी भयाण मरण यातना भोगतात. एकूण आदिवासी लोकसंख्येच्या ७१ टक्के आदिवासी लोकसंख्या मध्य प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, बिहार व ओरिसा या सहा राज्यामध्ये वास्तव्य करते. भारतीय आदिवीसंची वांशिक ओळख सांगताना उपलब्ध मानववंशशास्त्राच्या अभ्यासानुसार भारतात प्रोटो- ऑस्ट्रॉलाईड वंशाच्या आदिवासींची संख्या जास्त आहेत.

आदिवासी समाजाचे वास्तव्य निरनिराळया सहा विभागांमध्ये आढळून येते. त्यात दक्षिण भारतामध्ये प्रामुख्याने चेंचू, इरुला,कदार, कोटा, तोडा या निग्रो-प्रोटो ऑस्ट्रालाईड किंवा समिश्र अशा वांशिक जमाती केरळ, तामिळनाडू, कनार्टक आणि आंध्र प्रदेशात राहतात.

मध्य भारतातील बिहार, ओरिसा, मध्य प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यामध्ये गोंड, संथल, भूमजी, हो, कोरवा/ओरीअन, मुंडा, यासारख्या प्रमुख्याने जमाती वास्तव्य करतात. देशाच्या पश्चिमी स्थान प्रदेशात मुख्यतः राजस्ािान, गुजरात, महाराष्ट्र, गोवा, दमण, दीव, दादरा, आणि नगर-हवेली या राज्य आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये भिल्ल या प्रमुख जमातीचे वास्तव्य आहे. या पश्चिम पट्टयात प्रोटो-ऑस्ट्रॉलाईड वांशिक समूहाच्या आदिवासी जमाती प्रामुख्याने आहेत. भिल्ल व्यतिरिक्त कोळी, कोकणा-कोकणी, वारली, ठाकर या जमातीचे वसतिस्थाने याच प्रांतात आणि गुजरातमध्ये आहेत.

त्याचप्रमाणे मध्य-पश्चिमी हिमायलयीन प्रांतामध्ये सिस्कीम, उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, पंजाब, हरियाना आणि जम्मू काश्मिर या राज्यांमधून लेपचा, राधा, तारु, या आदिवासी प्रमुख जमाती आहेत. त्या मंगोलॉईड वंशाच्या मानल्या जातात. तर पूर्व हिमालयीन प्रांत हा डोंगराळ, पहाडी, महाकाय दऱ्या आणि जंगलांनी व्यापलेला आहे. यात उत्तर-पूर्वेकडील अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालया, मिझोराम, नागालँड आणि त्रिपुरा या राज्यांचा समावेश होतो. या राज्यामध्ये प्रामुख्याने अभोर, गारो, खासी आणि कुकू, नागा या मंगोलाईड वंशाच्या जमातीचे प्राबल्य आहे. अंदमान, निकोबार, आणि लक्षद्वीप बेंटांवरही निग्रो आणि मंगोलाईड वंशाच्या आदिवासी जमाती आहेत. त्यांना अंदमानातील ओंगे, सेंटिनेलेस, निकोवारीस या नांवाने ओळखले जाते.

थोडक्यात संपूर्ण भारतात काही ठराविक भौगोलिक पट्टयामध्ये आदिम जमातीचे वास्तव्य आहे. भौगोलिक अलगता हे आदिवासी समाजाचे प्राथमिक वैशिष्टये आहे. परंतू भौगोलिकदृष्टया एकापेक्षा जास्त जमातीमध्ये सलगता असली तरी सामाजिक-सांस्कृतिकदृष्टया एक जमात दुसऱ्या जमातीपेक्षा व्यावहारिक जीवन पातळीवर भिन्न असतात. उदा.आज भारतात ज्या आदिवासी जमाती आहेत त्यांचे प्रत्येकाचे एका मर्यादित अर्थाने धर्म आहेत. त्यांना टोळयाचे धर्म अगर जमात धर्म म्हणून संबोधले जाते. असे असले तरी सर्व आदिवासी जमातींचा सांस्कृतिक गाभा समान आहे. त्यातून एक समान दृष्टीकोन विकसित झालेला आहे.

भारतीय आदिवासींची व्यावसायिक ओळख करुन घेताना असे दिसते की, ९०.०३ टक्के आदिवासी प्राथमिक क्षेत्रातील व्यवसायांवर अवलंबून आहेत. त्यात प्रामुख्याने शेती आणि वन उत्पादने यांचा समावेश होतो. देशातील उपलब्ध जमिनीपैकी ७.९ टक्के जमीन मालकी आदिवासीं समाजाकडे आहे. हया जमिनीची मालकीचे सरासरी प्रमाण २.२५ हेक्टर इतके

अल्प आहे. एकूण आदिवासींपैकी ३.८५ टक्के आदिवासी हे दुय्यम क्षेत्राशी निगडीत व्यवसायांमध्ये आहेत तर ६.१२ टक्के आदिवासी तृतीय क्षेत्र रोजी-रोटीच्या व्यवसाय करीत असतात. याचाच अर्थ असा की, शेती हा आदिवासी समाजाचा उदरनिर्वाह करण्याचा मुख्य व्यवसाय आहे. शेती हा ९० टक्के आदिवासींचा मुख्य व्यवसाय असला तरी प्रत्यक्षात ५४.४१ टक्के च आदिवासी खऱ्या अर्थाने शेती कसणारे जमीन मालक आहेत तर बाकीचे ३२.६९ टक्के आदिवासी शेतमजूर आहेत. त्यात भूमीहिन शेतमजूरांचे प्रमाण मोठे आहे. आजही १६ राज्यातील ६०००० आदिवासी कुटुंबे फिरती शेती करतात, ही वस्तुस्थिती आजच्या संगणक युगाला आव्हानच आहे.

आपल्याकडे भारतात मनुष्यबळ मुबलक उपलब्ध असले तरी ते मनुष्यबळ निर्माण कार्यामध्ये किंवा उत्पादक स्वरुपाच्या कामामध्ये गुंतलेले असतेच असे नाही. किंबहुना बेकारीचे प्रमाणच आपल्याकडे मोठे आहे. इतर समाजाच्या तुलनेत आदिवासी समाज जास्त कार्यरमण व कार्यप्रवण झालेला आहे. ४९.३० टक्के आदिवासी उत्पादक कामामध्ये गुंतलेला आहे. आदिवासीबाहय समाजामध्ये हे प्रमाण फक्त ३७.४६ टक्के इतकेच आहे.

आदिवासी अर्थव्यवस्थेमध्ये स्त्रियांचा सहभाग मोठा आहे. ४३.७१ टक्के आदिवासी स्त्रिया आणि ५४.७४ टक्के आदिवासी पुरुषांचा त्यांच्या अर्थव्यवस्थेमध्ये प्रत्यक्ष सहभाग आहे. मोठे मनुष्यबळ अर्थव्यवस्थमध्ये गुंतलेले असले तरी त्यांची उदरनिर्वाहाची साधने व तंत्रे अतिशय जुनाट, पारंपारिक आणि अकार्यक्षम असल्यामुळे उत्पादन मात्र अतिशय कमी असते. पारंपारिक शेती करण्याच्या पध्दती व तंत्रामुळे उत्पादकता कमी आणि कमी उत्पन्नामुळे पिढयानपिढया दारिद्रयाचे सातत्य आहे. हे आर्थिक आणि व्यावसायिक दुर्दैव भारतीय आदिवासीं वाटयाला आलेले आहे.

भारतीय आदिवासींचे सामाजिक जीवन अतिशय वैशिष्ठयपूर्ण असते. त्यांचे आंतरिक संबंध अनौपचारिक, परस्परपूरक आणि सहजीवन पध्दतीचे असतात. सह-संबंध हे त्यांच्या सामाजिक जीवनाचे ठळक वैशिष्ठये असते. आदिवासी माणसाच्या वैयक्तिक किंवा कौटुंबिक जीवनात काही बरे वाईट प्रसंग आले तर ते संपूर्ण गांव आणि नातेवाईकांबरोबर जातात. घरात काही शुभ कार्य असले तर ते आपलेच आहे, असे समजून कोणत्याही औपचारिक निमंत्रणाशिवाय ही मंडळी या कार्यात तन-मनाने गुंतून जातात. अशा प्रकारचे भावनिक पातळवरचे त्यांचे हे सामाजिक जीवन असते. व्यक्तीकेंद्रीत नव्हे तर समुदायाभिमुख असे हे जीवन शहरी किंवा ग्रामीण जीवनापेक्षा पूर्णपणे वेगळे परंतू तेवढेच स्वतंत्र वृत्ती जोपासणारे असते.

प्रत्येक आदिवासी समूहाची सामाजिक वृत्ती ही स्वतंत्र असते. त्यात समानता आणि बंधूभाव ही वैशिष्टये आहेत. पूर्वापार जोपासलेल्या या वैशिष्ठयामुळे त्या समूहाला एक विशिष्ट नांव मिळालेले असते आणि त्या नावानेच आपण त्या जमातीला

ओळखतो. खरे तर या नावाची पूर्वपीठीका फार मजेशीर आणि महत्वाची असते. त्यात सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय पार्श्वभूमी दडलेली असते. मध्य आणि पश्चिम भारतामध्ये भिल्ल आणि गोंड या जमातीच्या नावाचा पूर्वतिहास फार उज्वल आणि रंजक आहे. त्यांच्या सामाजिक जीवनात श्रेणीकरण फारसे नसते. परंतू पश्चिम-उत्तर आणि मध्य हिमालयीन प्रांतातील आदिवासींमध्ये काही अंशी श्रेष्ठ-कनिष्ठता हे वैशिष्टय दिसून येते. मध्य आणि पश्चिम भारतातील काही जमातीमध्येही ही बाब आढळून येते. रक्तसंबंध हे वैशिष्ठये भारतीय आदिवासींमध्ये सर्वसाधारणपणे सगळयाच समूहामध्ये दिसून येते. याला अपवाद फक्त बिहारमधील मलेर आणि परहिया. हिमालयातील खासा, ओरिसातील सवर्णा आणि दक्षिण भारतातील कदार, पंदरम, मलासर आणि अलार या जमातींचा आहे. या जमाती वगळता उर्वरित जमातींचे आपापसातील संबंध हे केवळ स्नेहाचे आणि भावनिक नव्हें तर आपल्या सगळयांचे पूर्वज हे एकच होते . पर्यायाने आपले संबंध हे वांशिक किंवा रक्ताचे आहेत, ही भावना त्यांच्यामध्ये आहे.

बहुपतीत्वाची पध्दत भारतीय आदिवासीमध्ये नाही. परंतू हिमालयीन प्रांतातील विरळ लोकसंख्या आणि दुर्गम भौगोलिक वैशिष्ठयामुळे तिकडील लडाख, जम्मू-काश्मिर, कांग्रा, चंबा, कुलू, मंडी या हिमायल प्रदेशातील आणि उत्तर प्रदेश, अरुणाचल प्रदेशातील काही जमातीमध्ये बहुपतीत्वाची पध्दत आढळून येते. तामिळनाडूतील निलगिरी पर्वत आणि केरळमधील काही भागात बहुपतीत्वाची चाल आजही प्रचलित आहे. भारतात बहुपतीत्वाची पध्दत असलेल्या प्रमुख जमातीमध्ये लडाखी, गलोंग, तोडा, कोटा, कुरुंबा आणि उरलली यांचा समावेश होतो. या जमातीमध्ये मातृसत्ताक कुटुंब पध्दती आजही आढळून येते. अर्थात आदिवासीमध्ये मातृसत्ताक कुटुंब पध्दती आस्तित्वात होती. परंतू कालौघात सांस्कृतीकरणाच्या प्रक्रियेमध्ये बाहय पितृसत्ताक कुटुंब पध्दतीचा बहुतांश आदिवासी टोळांनी स्विकार केला.

आदिवासींची मूळ संस्कृती आत्मावाद मानणारी. निसर्ग आणि पक्षी-पशु पूजक आहे आणि ही संस्कृती हा त्यांचा धर्म सर्वसाधारणपणे मानले जाते आणि शास्त्रीय कसोटीवर ते सत्यही उतरलेले आहे. या मूळ आदिवासी संस्कृतीतून पुढील आजचे धर्म निर्माण झाले. त्याची सुरुवात वैदिक संस्कृतीपासून झालेली असावी. वेदांच्या रचनेला आधार ही येथील मूळ सिंधू संस्कृती आहे. सिंधु संस्कृतीमध्ये तत्कालीन आदिवासी जीवनाचे प्रतिबिंब आहे. या पार्श्वभूमीमुळे भारतातील बहुसंख्य आदिवासी आणि हिंदू परस्परांच्या संपर्कात आले. · हिंदूना त्यांच्या चालीरिती कर्मकांड सहजपणे आदिवासीपर्यंत पोहोचविता आले आणि म्हणून सद्यस्थितीत भारतात आदिवासींच्या धार्मिक स्थितीकडे पाहिले तर असे दिसते की, ८९.३९ टक्के आदिवासीच्या मते त्यांचा धर्म हिंदू आहे. गेल्या काही दशकातील जनगणना अहवालानुसार

भारतातील आदिवासीमध्ये एकूण ५९ प्रकारच्या धर्माचे आचरण केले जाते. त्यात सर्वाधिक नोंद हिंदू आदिवासींची आहे. तर ५.६३ टक्के आदिवसी ख्रिश्चन आहेत. एक टक्केपेक्षा कमी बौध्द असून जैन, शीख, मुस्लीम आणि झोरोस्ट्रीयन या सर्वाचे प्रमाण ४.१९ टक्के आहे. तर ४.१९ टक्के आदिवीसंचे त्यांचे स्वतःचे असे ५२ प्रकारचे धर्म असल्याचे दिसून आले. त्यापैकी निम्मे म्हणजे २६ धर्माची नांवे ही त्यांच्या जमातीची नांवेच आहेत. थोडक्यात आदिवासी धर्म मानणाऱ्या आदिवासींचे प्रमाणही लक्षणीय आहे हे विशेष होय.

भारतातील अंदमान, निकोबार आणि लक्षद्वीप बेटांचा अपवाद वगळता पश्चिम/दक्षिण आणी मध्य भारतातील बहुसंख्य म्हणजे ६९ टक्के आदिवासी हिंदू आहेत तर आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर आणि मिझोराम या राज्यांमध्ये ख्रिश्चन आदिवासी आहेत. हिमाचल प्रदेश, पश्चिम बंगाल, लक्षद्वीप आणि महाराष्ट्रात मुस्लीम आदिवासी असून त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. भारतात विविध आदिवासी जमातीच्या जीवनशैलीमध्ये बाहयांगी वैविध्य असले तरी ऐतिहासिकदृष्टया त्यांचे विचार, दृष्टीकोन आणि तत्वज्ञानामध्ये समानता आहे.

आदिवासींच्या शैक्षणिक स्थितीमध्ये पाहिल्यास प्रांतनिहाय शैक्षणिक प्रगती किंवा शिक्षणाचे प्रमाण कमी जास्त असल्याचे दिसून येते. १९९१ च्या जनगणना अहवालात ही शैक्षणिक स्थितीची विविधता दिसून येते. ही विविधता मिझोराममधील ८२.७१ टक्के ते आंध्र प्रदेशातील १७.१६ टक्के दरम्यान होती. भारतातील आदिवासीमधील साक्षरतेचे प्रमाण १९६१, १९७१, १९८१ आणि १९९१ च्या जनगणना अहवालानुसार अनुक्रमे ८.५३ टक्के, ११.३० टक्के, १६.३५ टक्के आणि २९.६० टक्के होते.

आदिवासींच्या ओळखीत भौगोलिक, पर्यावरण, भाषा, कला, परंपरासारख्या वैशिष्टयांचा समावेश आहे आणि त्यामुळे ते इतरांपेक्षा वेगळे ठरतात. आता त्यांच्या ओळखीबाबत प्रश्न उपस्थित झाल्याने त्यांच्या जीवनातील वैशिष्ठये, त्यांच्यातील गतिशिलता व लवचिकपणामुळे विजेत्यांच्या शक्तीपुढे, लिपि नसतांनाही त्यांच्या भाषा व त्यांची मौखिक परंपरा, सत्तेच्या आधाराशिवाय टिकून आहेत. यातून त्यांचे वेगळे तत्वज्ञान आहे याचा शोध लागतो. आणि ते तत्वज्ञान मानणारे समह आदिवासी म्हणून वैध ठरतात. या आदिवासी जमाती भौगोलिकदृष्टया, भाषिकदृष्टया, वांशिकदृष्टया व सांस्कृतिकदृष्टया वेगवेगळया पातळीवर आहेत.

भौगोलिकदृष्टया उत्तर-उत्तरपूर्वेकडील, मध्य भारतातील प्रदेश आणि दक्षिणेकडील प्रदेश अशी विभागणी करता येईल. पहिल्या विभागात पूर्व काश्मिर, पूर्व पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेशाचा उत्तर भाग व आसाम या भागात राहणाऱ्या जमाती येतात. सिक्कीमचा समावेशही याच प्रदेशात होतो. तर मध्य भारतातील प्रदेशामध्ये बंगाल, बिहार,उत्तर प्रदेशाचा दक्षिण भाग, राजस्थानचा दक्षिण भाग, मध्य

भारत, महाराष्ट्राचा उत्तर भाग, मध्य प्रदेश व ओरिसा हे प्रदेश येतात. या प्रदेशाच्या अगदी सीमेवर राजस्थानचा उत्तर भाग, पूर्वीच्या मुंबई प्रांताचा दक्षिण भाग व पूर्वीचा बस्तर प्रदेश हे भाग येतात. शेवटच्या दक्षिणकडील प्रदेशात पूर्वीचे हैद्राबाद, म्हैसूर, कूर्ग, त्रावणकोर, कोचीन, आंध्र आणि तामिळनाडू हे प्रदेश येतात. अंदमान आणि निकोबार बेटावर राहणाऱ्या जमातींचा अंतर्भावही याच प्रदेशात येतो.

भाषिकदृष्टया विचार केला तर भारतामध्ये चार भाषासंघ आढळतात. ते खालीलप्रमाणे-

(१) इंडो-युरोपियन (आर्यन) भाषा संघ (२) द्रविडीयन भाषासंघ (३) ऑस्ट्रीक भाषासंघ (कौल किंवा मुंडा) (४) तिबेटी- चायनीज (किंवा सिनोतिबेटन) भाषासंघ. भारतातील आदिवासी जमातीच्या दृष्टीने पाहिले तर आर्यन भाषासंघाचा संबंध हा नंतरच्या काळात आलेला आहे. कारण भारतातील बहुतेक जमाती आर्यपूर्व काळातील आहेत किंवा आर्येतर रक्ताच्या आहेत. यामुळे वांशिकदृष्टया त्या आर्यापासून भिन्न आहेत. भाषा ही संस्कृतीसंचारणाचे महत्वाचे माध्यम आहे. भाषेच्या माध्यमातून संस्कृती ही एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशाकडे जात असते. यामुळे दोन प्रदेशामध्ये मूल्ये व प्रतिके या बाबतीत साध्ये निर्माण होऊ शकतात. तथापि, संस्कृती संचारणामध्ये भाषा चित्र असूनही सामाजिक व आर्थिक परिस्थितीला साधर्म्ये निर्माण झाल्याची उदाहरणे आहेत. उदा.छोटा नागपूर प्रदेशातील मुंडा व ओरायन या दोन जमाती परस्परांच्या अगदी नजिक राहतात. त्यांचे सांस्कृतिक जीवनही पुष्कळसे समान आहे. परंतू त्यांच्या भाषा मात्र भिन्न आहेत. मुंडा लोक ऑस्ट्रिक भाषा बोलतात. तर ओरायन लोक द्रविडीयन भाषा बोलतात.

मध्य विभागातील बहुतेक जमाती दोन भाषा बोलतात. त्यांना स्वतःची बोलीभाषा तर येतेच परंतू स्वतःच्या बोलीभाषेबरोबरच ज्या ग्रामीण समाजालगत हे लोक राहतात त्यांची भाषाही त्याना अवगत असते. उदा.हिंदुस्थानी, उडिया किंवा बंगाली या भाषा शेजारी राहणाऱ्या आदिवासींना अवगत आहेत, असे आढळते. ओरायन लोक किंवा मुंडा लोक चुकतमाकत हिंदुस्थानी भाषा बोलू शकतात. तर बंगालमधील संथाळ लोकांना त्यांच्या बोलीभाषेबरोबर बंगालीचेही तुटंपुंजे ज्ञान असते. बैगा जमातीसारख्या काही जमाती तर स्वतःची मुळची भाषा हरवून बसल्या आहेत. हे लोक आपल्या शेजारी असलेल्या लोकांची भाषा बोलतात. अर्थात भाषिक समानता असली तरी बैगा लोक आपल्या शेजारी असलेल्या लोकांचीच भाषा बोलतात. अर्थात भाषिक समानता असली तरी बैगा लोक स्वतःची सांस्कृतिक वैशिष्ठये टिकवून आहेत. यावरुन असे म्हणता येईल की, भारतातील जमातीचे वर्गीकरण करताना भाषेचा निकष फारसा उपयोगी पडणार नाही.

भारताच्या बाबतीत सर्वसामान्यपणे असे म्हणता येईल की, आपण कल्पिलेल्या प्रत्येक भौगोलिक प्रदेशानिहाय एक एक

वेगळा भाषासंघ भारतीय जमातीमध्ये बोलला जातो. याचाच अर्थ की भारतामध्ये जसे तीन भौगोलिक विभाग आदिवासी जमातीचे वर्गीकरण करु शकतात तद्वतच या जमातीची वर्गीकरणे करणारे तीन भाषासंघही दाखविता येतात. उदा.उत्तर- उत्तर पूर्वेकडे असणाऱ्या प्रदेशातील जमातीचे लोक सिनो-तिबेटन किंवा तिबेटो-बर्मन हा भाषासंघ बोलतात. भारतातील इर्शान्य प्रदेशात मॉनरुमेर (Mon-Khemer) या भाषेचा वापर होताना दिसून येतो उदा. खासी लोकांची भाषा. नागा टेकडयामध्ये कित्येक बोलीभाषा बोलल्या जातात. उपलब्ध माहितीनुसार नागा टेकडयात १६ भाषा व असंख्य बोलीभाषा बोलल्या जातात.

मध्य विभागामध्ये ऑस्ट्रिक भाषा संघाचे प्राबल्य आढळून येते. मात्र ओराबन, कोलाम, खोंड व गोंड या जमाती द्रविडीयन भाषा संघाशी साधर्म्य असणाऱ्या भाषा बोलतात. भारतातील सुमारे १५ लाख आदिवासी आजही गोंडी भाषा बोलतात. ही भाषा द्रविड भाषा व आंध्र भाषा यांचे संमिश्रण आहे. छोटा नागपूर प्रदेशात मात्र ऑस्ट्रीक भाषा संघाची चलती आढळून येते. या भाषा संघाला १८५२ साली फ्रेडरिक मिलर यांनी मुंडा भाषा असे नांव दिले आहे. या भाषेचे वैशिष्ठये असे की, या भाषेमध्ये क्रियापद अजिबात नसते. त्याचप्रमाणे लिंगभेदही दाखविण्यास या भाषेमध्ये साधन नाही. फक्त सजीव आणि निर्जीव एवढाच भेद केला जातो.

दक्षिण विभागात आदिवासी जमातीचे लोक द्रविडियन भाषा किंवा तिचा कोणता तरी प्रकार बोलतात. तामिळ, तेलगू, मल्याळम, कानडी व क्रुर्गी या काही भाषा दक्षिणेतील आदिवासी बोलतात. त्रावणकोर कोचीनकडे कादर लोक हे भारतातील सर्वात जुने रहिवासी आहेत, असे काही लोकांचे मत आहे. हे लोक मल्याळी भाषेची एक बोली बोलतात. दक्षिणेतील काही जमातीचे द्रविडीकरण झाले आहे. उदा. चेंचू व यानाडी या जामती. हटन यांनी द्रविड भाषासंघ हे आशिया मायनरकडून हिंदुस्थानात आले असा दावा मांडला आहे. आशिया मायनरककडून मेसोपोटीमियाच्या मार्गाने हा भाषासंघ मेडिटरेनियन लोकांनी प्रथमतः भारताच्या वायव्य भागात आणला. आदिवासींचे विभाजन तीन भौगोलिक प्रदेशात करता येते. त्याचप्रमाणे भारतातील आदिवासींच्या भाषाही तीन भाषासंघ विभागात येतात. प्रत्येक भौगोलिक विभागात एक भाषासंघ अशी भारतातील आदिवासींच्या बाबत प्रदेश व भाषा यांची जुळणी आपणास आढळून येते.

भारतातील लोकांचे व विशेषतः आदिवासी जमातीचे मानववंश निश्चित करणे, हे काम मानववंशशास्त्रज्ञांच्या दृष्टीने फार अवघड व जिकीरीचे होऊन बसले आहे. याचे कारण असे की, इतिहासपूर्व काळात भारतात वस्ती करुन राहणाऱ्या मानवांच्या वंशाविषयी कसलाही प्रत्यक्ष पुरावा आढळत नाही. भारतामध्ये या काळातील मानवावर प्रभाव टाकणारे मानवी सांगाडे मूळीच सापडलेले नाही. भारतातील जुनी संस्कृती

म्हणून सिंधू नदीच्या खोऱ्यातील संस्कृतीच उल्लेखण्यात येते. तथापि, या संस्कृतीच्या उत्खननामधून तत्कालीन मानववंशावर कोणताच प्रकाश पडत नाही. सिंध आणि पंजाबमधल शहरे समिश्र व विविधतापूर्ण वंशाच्या लोकांची होती, असेच आज मानले जाते. तात्पर्य, मानववंशाचे संमिश्रण इतक्या जुन्या काळापासून भारतात सुरु झाले होते. नर्मदा नदीच्या खोऱ्यात वास्तव्य करणाऱ्या मानववंशाची तर आपणास काहीच माहिती मिळत नाही. भूगर्भ- शास्त्रांच्या दृष्टीने भारतातील मनुष्याची वसाहत फार जुनी आहे. नंतरच्या बर्फयुगात वायव्य हिंदुस्थानामध्ये मानवाचे आस्तित्व प्रथम आढळले असे मानले जाते. मध्य हिंदुस्थानात नर्मदेच्या खोऱ्याती मानववांशिकदृष्टया आद्य पाषाण युगातील मानवासारखा होता.

इतिहास काळातील भारतीय वंशाबद्दलही फारशी माहिती उपलब्ध नाही. स्थानांतरण करुन भारतात आलेल्या मानवाच्या स्वरुपाची व त्याच्या स्थानांतरणाच्या अंतर्गत व बाहय मार्गाची आपणास नीटशी माहिती नाही. आर्यांचा हिंदुस्थानात प्रवेश होईपर्यंत व नंतरही हीच स्थिती आढळते. म्हणून ऐतिहासिक पुराव्यांची रचना करुन जर भारताच्या इतिहास काळातील वंशिक संघटनावर प्रकाश टाकावयाचा असेल तर पुष्कळ प्रमाणात अनुमानाचा आश्रय घ्यावा लागतो.

**संदर्भ :-**


| | |
|---|---|
| (१) | डॉ. आंबेडकर बी. आर. - अस्पृष्य मूळचे कोण होते- रघुवंशी प्रकाशन, पुणे. |
| (२) | कुलकर्णी वि. श्री. - भारतातील आदिवासी वंश, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई - ३. |
| (३) | चित्राव सिध्देश्वरशास्त्री - भारतवर्षीय प्राचीन चरित्रकोष (प्रथम खंड), भारतीय चरित्रकोश मंडळ प्रकाशन, पुणे - ४. |
| (४) | डॉ. देशमुख बी. ए. - ट्रायबल एज्युकेशन, सोनाली प्रकाशन, नवी दिल्ली. |
| (५) | डॉ. देशमुख बी. ए.- कोकणा - कोकणी इतिहास आणि जीवन, सुगावा प्रकाशन, पुणे ३०. |


* * *

# भारतीय वन कायद्यामुळे आदिवासींच्या हक्कांवर आलेल्या मर्यादा- एक परिक्षणात्मक अध्ययन

* प्रा. रविंद्रसिंह चंदेल

## प्रस्तावना

नेमके कोणाला आदिवासी म्हणावे याबाबत मानवशास्त्र विचार पाहण्याआधी आदिवासी या शब्दाबाबत काही समज, गेरसमज पाहणे केवळ मनोरंजक नव्हे तर आदिवासींचा अभ्यास करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरेल. अगदी परवा परवापर्यंत म्हणजे शंभर वर्षापर्यंत खुद्द युरोपातील विद्वान लोकांची आदिवासी समाजाबद्दलची मते अत्यंत टोकाची होती. त्यात शास्त्रीयता नव्हती तर कल्पनेची भरारी होती. काहींना आदिवासी म्हणजे अत्यंत रानटी, नरमांसभक्षक व सतत युध्दे करणारा, नरकप्राय जीवन जगणारा समाज म्हणजे कोणतेही बंधन न पाळणारा, खावे-प्यावे, भोगावे असे स्वर्गीय जीवन जगणारा वाटायचा. काहींच्या मते एखाद्या देशातील आदिवासी अगर आदिम समाज म्हणजे त्या देशात अतिप्राचीन काळापासून वास्तव्य करीत आलेला समाज आहे. यास्तव ते आदिवासींना मूळचे रहिवासी अगर अगदी प्राचीन काळातील समाज मानतात. परंतू हे खरे नाही. कारण ग्रामीण नागरी असे मनविले जाणारे समाज देखील आदिवासी समाजाएवढेच दीर्घकालीन इतिहास लाभलेले आहेत.

शहरी समाजाने व त्यांचे बोट धरुन ग्रामीण समाजाने विविध क्षेत्रात जी भौतिक प्रगती केलेली आहे तिच्याशी तुलना करुन आदिवासी लोकांना सर्वथैव गौण, निकृष्ट व अत्यंत अप्रगत मानण्याकडे देखील बऱ्याच जणांचा कल आहे. परंतू आदिवासी समाजाची सत्य परिस्थिती अशी की, बऱ्याच बाबतीत तो इतर समाजापेक्षा कितीतरी पटीने श्रेष्ठ आहे.

आदिवासी समाजाबद्दल प्रगतांच्या प्रतिक्रीया देखील अतिशय गंमतीच्या पण अत्यंत अपुऱ्या ज्ञानावर आधारीत आहेत. काहींना त्यांची भिती वाटते तर काहींना किळस. तर काहींना त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटते. अर्धनग्नावस्था, अनोळखी चेहरा, हातात भाला किंवा धनुष्यबाण अशी त्यांची रेखाटलेली चित्रे पाहून अगर वर्तमानपत्रातील संदर्भविरहित बातम्या वाचून प्रतिक्रिया झालेली असते.

*अधिव्याख्याता, आठवले कॉलेज ऑफ सोशल वर्क, भंडारा

अशा प्रकारचे गैरसमज, चुकीचे ग्रह अगर विकृत कल्पना प्रगत समाजात आहेत. याचे कारण म्हणजे प्रत्यक्ष आदिवासिंच्या जीवनात दीर्घकाळ राहून शास्त्रशुध्दरित्या केलेले निरीक्षण व त्यावर आधारीत मानवशास्त्रीय लिखाणांचा परिचय नसणे हे आहे. सामाजिक मानवशास्त्र व मानवशास्त्राच्या शाखेत आदिवासी समाजाच्या मात्र शास्त्रशुध्द अभ्यास करुन आदिवासी समाजाचे वास्तव चित्र समाजापुढे आणले आहे.

**उद्देश :-**

१. आदिवासींची सामाजिक व आर्थिक परिस्थिती जाणून घेणे.

२. भारतीय वन हक्क कायद्याचे अध्ययन करणे.

३. आदिवासींवर वन कायद्यामुळे आलेल्या मर्यादा याविषयीचे अध्ययन करणे.

४. वनहक्क कायद्यामुळे आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत झालेले परिवर्तन जाणून घेण.

५. वनहक्क कायद्यांविषयी आदिवासींचे मत जाणून घेणे.

६. वनहक्क कायद्यामुळे येणाऱ्या अडचणीबद्दल आदिवासींची मते जाणून घेणे.

**प्रश्न :**

१. आदिवासींची आर्थिक व सामाजिक परिस्थिती कशी आहे ?

२. वनहक्क कायद्याची आदिवासींना कितमत माहिती आहे ?

३. वनहक्क कायदा आदिवासींना माहित व्हावा यासाठी शासनाचे कोणते प्रयत्न आहेत व ते प्रभावी आहेत किंवा नाही ?

४. वनहक्क कायद्यामुळे आदिवीसंच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीवर कोणता परिणाम झाला ?

५. आदिवासींना वनहक्क कायद्याचा लाभ योग्य प्रमाणात मिळतो किंवा नाही ?

६. वनहक्क कायदा व त्यासाठी अंमलबजावणी व त्यामधील असणाऱ्या त्रुटी याकड अधिकारी वर्गाचा पाहण्याचा दृष्टीकोन कसा आहे ?

७. वनहक्क कायद्यामध्ये आदिवासी संघटनेचा कितपत सहभाग आहे ?

**उपकल्पना :-**

१. आदिवासींना वनहक्क कायद्याविषयी माहिती नाही.

२. वनहक्क कायद्यामुळे आदिवासींची आर्थिक परिस्थिती सुधारलेली नाही.

३. आदिवासींना कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे कायद्याचा लाभ योग्य प्रमाणात मिळत नाही.

४. अधिकारी वर्गाची उदासिनता यामुळे पुनर्वसनाचा अभाव दिसतो.

५. पुनर्वसनाकरिता आदिवासी संघटनेचा प्रत्यक्ष किंवा अपत्यक्ष प्रभाव दिसत नाही.

६. योजनांचा लाभ घेताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

**अध्ययन क्षेत्र व विश्व :-**

संशोधनाच्या अध्ययनामध्ये गोंदिया जिल्हयातील सडक अर्जुनी तालुक्यातील निवडक गावाचा समावेश करुन तेथील आदिवासींची प्रत्यक्ष मुलाखत घेऊन माहिती प्राप्त झाली. प्रत्यक्ष मुलाखतीच्या सहाय्याने सूची भरण्यात आली. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष पाहणी करुन अनुभवावरुन कथनावरुन चर्चामधून बरीच माहिती प्राप्त झाली.

**नमुना निवड :-**

सामाजिक तथ्य गोळा करण्यासाठी नमुना निवडीच्या तीन प्रकल्पामधून १) संभाव्य नमुना निवड पध्दती २) गैरसंभवता नमुना निवड पध्दती या दोन पध्दतीपैकी गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दतीचा अवलंब करुन तथ्य संकलन केलेले आहे.

**तथ्य संकलन :-**

प्रस्तुत अध्ययन हे प्रत्यक्ष आदिवासी क्षेत्रात जाऊन प्रत्यक्ष मुलाखती घेऊन केली असल्यामुळे तथ्य संकलनासाठी प्राथमिक तथ्यामधील मुलाखत अनुसूचीचा वापर करुन माहिती संकलित केलेली आहे.

त्याचप्रमाणे अध्ययनासाठी आवश्यक असणारे काही दस्तऐवज हे संबंधित शासकीय कार्यालयामार्फत प्राप्त केले. त्याचप्रमाणे आदिवासीसंबंधी माहिती जाणून घेण्यासाठी ग्रंथालयातील साहित्यांचा सुध्दा उपयोग करण्यात आला. त्यामुळे द्वितीय तथ्य संकलनाची पध्दती वापरुन माहिती गोळा केली आहे.

**तथ्य प्रक्रिया व तथ्य संस्करण :-**

प्रस्तुत अध्ययनात निवडण्यात आलेल्या उत्तरदात्यांकडून मिळालेल्या विस्कळीत माहितीला व्यवस्थाबध्द करुन माहितीचे वर्गीकरण करण्यात आले. त्याचप्रमाणे अनुसूचित असणाऱ्या त्रुटी सुधारुन माहिती प्रक्रियान्वित करण्यात आले.

**निष्कर्ष :-**

१. आदिवासी व अजूनही आपल्या पारंपारिक रितीनुसार आपले जीवन कंठत आहे.

२. आदिवासी इतर लोकांच्या सानिध्यात येत असल्यामुळे आदिवासींच्या विचारधारेत बदल होताना दिसतो.

३. आदिवासींचा प्रमुख व्यवसाय शेती व मजूरी असून शेती ही अजूनही पारंपारिक पध्दतीने केली जाते.

४. आदिवासींची शेती निसर्गावर अवलंबून असल्याने आणि सिंचनाच्या अद्ययावत सुविधा नसल्याने त्यांच्या उत्पादनात पुरेशी वाढ झालेली नाही.

५. आदिवासींची आर्थिक बाब ही जंगल व जमिनीवर अजूनही अवलंबून आहे.

६. वनहक्क कायद्यामुळे आदिवासींच्या सहजीवनावर व स्वातंत्र्यावर मर्यादा आलेल्या आहेत.

७. वनहक्क कायद्यामुळे आदिवासी हा निसर्गापासून दुरावला जात आहे.

८. वनहक्क कायद्यामुळे आदिवासींच्या आर्थिक सामाजिक स्थितीवर बऱ्याच मर्यादा आलेल्या आहेत.

९. वनहक्क कायद्यामुळे पूर्वजापासून कसत आलेली जमीन अजूनही त्यांच्या नांवे करता आली नाही.

१०. आदिवासींचे वनावर अबाधित असलेले अधिकार नष्ट झालेले आहेत. त्यामुळे त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण होताना दिसून येत नाही.

११. वनहक्क कायद्याची परिपूर्ण माहिती नसल्याने आदिवासी आपले मत या कायद्याविषयी दर्शवू शकले नाहीत.

* * *

# आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप / तेलपंप तसेच एच.डी.पी.ई. पाईपचा पुरवठा योजनेचा मूल्यमापन अहवाल

* श्री. रविंद्रनाथ लक्ष्मण कोल्हार

## प्रस्तावना

आदिवासी जमातीचे शेतकरी हे शेतीवर व शेतमजुरीवर जीवन जगत असतात. शेती असलेल्या शेतकऱ्यांना सिंचनाची सोय उपलब्ध करुन देणे, पाण्याचा उपसा करण्यासाठी विजपंप / तेलपंप उपलब्ध करुन देणे, तसेच दारिद्रय रेषेखालील शेतकऱ्यांना एच.डी.पी.ई. पाईप चा पुरवठा करणे, या योजना राज्यशासनाकडून राबविण्यात येत आहे. मा. अध्यक्ष, अनुसूचित जाती जमाती आयोग, यांचे अध्यक्षतेखाली नाशिक येथे दिनांक ५ मार्च,२०१० रोजी बैठक झाली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्तामध्ये असे नमूद करण्यात आले होते की, ज्या आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप / तेलपंप तसेच एच.डी.पी.ई. पाईप चा पुरवठा करण्यात आला आहे, अशा आदिवासी लाभार्थी शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली किंवा कसे, या करिता आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे ने आदिवासी प्रकल्पांमधील काही गावांची मूल्यमापनाकरिता निवड करण्यात येवून पाहणी करण्यात आली आहे.

## मूल्यमापनाची कार्यपध्दती

तेलपंप व एच.डी.पी.ई. पाईप्स वाटप या योजनेचे मूल्यमापन करण्यासाठी एक प्रश्नावली तयार करण्यात आली होती. या प्रश्नावलीमध्ये कुटूंबाची वैयक्तिक माहिती, कुटूंबाचा मुख्य व दुय्यम व्यवसाय, कुटूंबाने धारण केलेले जमिनीचे क्षेत्र, पशुधन, कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न त्याचबरोबर कुटूंब प्रमुखाचे शिक्षण व त्यांची जमात इत्यादी माहिती गोळा करण्यात आली आहे.

खालील प्रकल्प कार्यालयांची निवड करण्यात आली.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. डहाणू | २. शहापूर | ३. घोडेगाव | ४. नाशिक | ५. कळवण |
| ६. राजूर | ७. देवरी | ८. नागपूर | ९. किनवट | १०. पांढरकवडा |

* प्रभारी उपसंचालक (एक्षेविका), आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे १

| अ. क्र. | जिल्हयाचे नाव | प्रकल्प कार्यालय | तालुक्याचे नाव | गावांची संख्या | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे | घोडेगाव | आंबेगाव | १८ | १८ |
| | | | जुन्नर | ३ | ११ |
| | | | खेड | १६ | १६ |
| | अहमदनगर | राजूर | अकोले | ८ | ३० |
| | | | संगमनेर | ३ | १३ |
| | गोंदिया | देवरी | देवरी | २९ | ५४ |
| | नागपूर | नागपूर | रामटेक | १३ | ४८ |
| | नांदेड | किनवट | किनवट | ६ | ३२ |
| | | | हिमायतनगर | ३ | ११ |
| | यवतमाळ | पांढरकवडा | घाटंजी | ८ | २५ |
| | | | केळापूर | ४ | १६ |
| २. | ठाणे | डहाणू | डहाणू | २ | १२ |
| | | | तलासरी | ३ | १५ |
| | | | पालघर | १ | ९ |
| | | शहापूर | शहापूर | ५ | १८ |
| | | | मुरबाड | १ | ९ |
| | नाशिक | नाशिक | त्र्यंबकेश्वर | ४ | १८ |
| | | | नाशिक | २ | १६ |
| | | | इगतपूरी | १ | ७ |
| | | कळवण | कळवण | २ | ४७ |
| | ०८ | १० | २० | १३२ | ४२५ |

या मूल्यमापनाचे काम एकूण ०८ जिल्हयांमधील १० प्रकल्पांमध्ये करण्यात आले आहे. या १० प्रकल्पांमध्ये एकूण २० तालुके असून १३२ गावांचा समावेश आहे. या १३२ गावांमध्ये एकूण (४२५) लाभार्थ्यांना प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचेकडून या योजनेबाबतची माहिती प्रपत्राद्वारे संकलीत करण्यात आली. सदर माहितीचे पृथ:करण करुन याबाबत मूल्यमापन करण्यात आले आहे

मूल्यमापन पाहणीनुसार अनुसूचित जमातनिहाय लाभार्थ्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | जिल्हा | प्रकल्प | तालुका | जमातीचे नाव | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे | घोडेगाव | आंबेगाव | महादेव कोळी | १८ |
| | | | जुन्नर | महादेव कोळी | ११ |
| | | | खेड | महादेव कोळी | १५ |
| | | | | ठाकर | ०१ |
| २. | अहमदनगर | राजूर | अकोले | महादेव कोळी | २९ |
| | | | संगमनेर | महादेव कोळी | १२ |
| | | | | भिल | ०१ |
| | | | | ठाकर | ०१ |
| ३. | गोंदिया | देवरी | देवरी | गोंड | २८ |
| | | | | हलबी | २४ |
| | | | | माना | ०२ |
| ४. | नागपूर | नागपूर | रामटेक | गोंड | ४८ |
| ५. | नांदेड | किनवट | किनवट | आंध | २८ |
| | | | | परधान | ०२ |
| | | | | गोंड | ०२ |
| | | | हिमायतनगर | आंध | ११ |
| ६. | यवतमाळ | पांढरकवडा | घाटंजी | गोंड | १९ |
| | | | | कोलाम | ०६ |
| | | | केळापूर | गोंड | ०१ |
| | | | | परधान | १३ |
| | | | | कोलाम | ०२ |

| अ.क्र. | जिल्हा | प्रकल्प | तालुका | जमातीचे नाव | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ७. | ठाणे | डहाणू | डहाणू | कातकरी | ०८ |
| | | | | वारली | ०३ |
| | | | | मल्हार कोळी | ०१ |
| | | | तलासरी | कातकरी | ० |
| | | | | वारली | १५ |
| | | | | मल्हार कोळी | ० |
| | | | पालघर | कातकरी | ० |
| | | | | वारली | ०८ |
| | | | | मल्हार कोळी | ०१ |
| ८. | ठाणे | शहापूर | शहापूर | ठाकर | १२ |
| | | | | म. ठाकूर | ०३ |
| | | | | कातकरी | ०३ |
| | | | मुरबाड | म.ठाकूर | ०३ |
| | | | | म. कोळी | ०६ |
| ९. | नाशिक | नाशिक | त्र्यंबकेश्वर | कोकणा | ०८ |
| | | | | महादेव कोळी | ०९ |
| | | | नाशिक | कोकणा | ०८ |
| | | | | महादेव कोळी | १० |
| | | | इगतपुरी | कोकणा | ० |
| | | | | महादेव कोळी | ०६ |
| | | कळवण | कळवण | कोकणा | ४५ |
| | | | | महादेव कोळी | ०२ |
| | | | | एकूण | ४२५ |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की , पुणे व अहमदनगर जिल्हयांमध्ये महादेव कोळी, गोंदिया जिल्हयामध्ये गोंड व हलबी, नागपूर जिल्हयामध्ये गोंड व आंध, नांदेड जिल्हयात आंध, यवतमाळ जिल्हयामध्ये गोंड व कोलाम, ठाणे जिल्हयातील डहाणू प्रकल्पामध्ये वारली व कातकरी, शहापूर प्रकल्पात ठाकर व म.ठाकूर, आणि नाशिक जिल्हयामध्ये कोकणा व महादेव कोळी या अनुसूचित जमातीचे लाभार्थींचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते.

**पृथ:करण**

**लाभ घेतलेल्या लाभार्थींची लिंगानुसार (पुरुष व स्त्रिया) वर्गीकरण पुढीलप्रमाणे :-**

| अ. क्र. | जिल्हा | लाभार्थी संख्या | लिंग | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| १. | पुणे | ४५ | ४३ | ०२ | ४५ |
| २. | अहमदनगर | ४३ | २५ | १८ | ४३ |
| ३. | गोंदिया | ५४ | ४८ | ०६ | ५४ |
| ४. | नागपूर | ४८ | ३७ | ११ | ४८ |
| ५. | नांदेड | ४३ | ३६ | ०७ | ४३ |
| ६. | यवतमाळ | ४१ | ३० | ११ | ४१ |
| ७. | ठाणे | ६३ | ५३ | १० | ६३ |
| ८. | नाशिक | ८८ | ७८ | १० | ८८ |
| | एकूण | ४२५ | ३५० | ७५ | ४२५ |

एकूण ४२५ लाभार्थींपैकी ३५० (८२%) पुरुष तर ७५ (१८%) स्त्रिया असल्याचे दिसून येते.

**सर्व्हेक्षण करण्यात आलेल्या एकूण आठ जिल्हयांमधील शैक्षणिक माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

| अ. क्र. | जिल्हा | निरक्षर | १ली ते ४ थी | ५वी ते ७वी | ८वी ते १० वी | ११वी ते १२ वी | १२वी ते पुढील | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे | १२ | ०८ | ०५ | १८ | ०१ | ०१ | ४५ |
| २. | अहमदनगर | १० | १७ | ०७ | ०३ | ०२ | ०४ | ४३ |
| ३. | गोंदिया | १२ | २२ | ०६ | ०८ | ०२ | ०४ | ५४ |
| ४. | नागपूर | १६ | १३ | ११ | ०२ | ०३ | ०३ | ४८ |

| अ. क्र. | जिल्हा | निरक्षर | १ली ते ४ थी | ५वी ते ७वी | ८वी ते १० वी | ११वी ते १२ वी | १२वी ते पुढील | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | नांदेड | १७ | ११ | ०५ | ०८ | ०० | ०२ | ४३ |
| ६. | यवतमाळ | १९ | १२ | ०५ | ०१ | ०४ | ०० | ४१ |
| ७. | ठाणे | ४२ | ०९ | ०६ | ०२ | ०१ | ०३ | ६३ |
| ८. | नाशिक | ६५ | ११ | ०५ | ०४ | ०२ | ०१ | ८८ |
| | एकूण | १९३ | १०३ | ५० | ४६ | १५ | १८ | ४२५ |

शैक्षणिक माहितीचे अवलोकन केले असता या ८ जिल्हयांमध्ये वास्तव्यास असलेल्या अनुसूचित जमातींची शैक्षणिकदृष्टया आवश्यक त्या प्रमाणात सुधारणा अल्प प्रमाणात असल्याचे दिसून येते. एकूण ४२५ लाभार्थीपैकी १९३ (४५%) लाभार्थी निरक्षर आहेत. १ ली तें ४ थी पर्यंत शिक्षण झालेले १०३ (२४%), ५ वी ते ७ वी पर्यंत शिक्षण झालेले ५० (१२%), ८ वी ते १० वी पर्यंत शिक्षण झालेले ४६ (११%) व उर्वरीत लाभार्थी (८%) हे १० वी च्या पुढील शिक्षण घेतलेले आहेत.

लाभार्थ्यांचे वयोमानानुसार वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | जिल्हा | वयोमानानुसार वर्गीकरण | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ३० पर्यंत | ४५ पर्यंत | ६० पर्यंत | ६० च्या पुढे | |
| १. | पुणे | ०३ | १९ | १० | १३ | ४५ |
| २. | अहमदनगर | ० | २३ | १३ | ०७ | ४३ |
| ३. | गोंदिया | ०१ | २१ | २१ | ११ | ५४ |
| ४. | नागपूर | ०१ | १५ | २३ | ०९ | ४८ |
| ५. | नांदेड | १० | २० | १२ | ०१ | ४३ |
| ६. | यवतमाळ | ० | १६ | १६ | ०९ | ४१ |
| ७. | ठाणे | ०६ | २१ | २८ | ०८ | ६३ |
| ८. | नाशिक | १० | २४ | ३३ | २१ | ८८ |
| | एकूण | ३१ | १५९ | १५६ | ७९ | ४२५ |

अनुसूचित जमातीच्या लाभार्थींना शासकीय योजनेतून देण्यात आलेल्या योजनांची माहिती खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | जिल्हा | तेलपंप | एच.डी.पी.ई. पाईप्स | तेलपंप व पाईप | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे | १२ | ११ | २२ | ४५ |
| २. | अहमदनगर | १८ | २१ | ०४ | ४३ |
| ३. | गोंदिया | २१ | २९ | ०४ | ५४ |
| ४. | नागपूर | १४ | २५ | ०९ | ४८ |
| ५. | नांदेड | २० | २१ | ०२ | ४३ |
| ६. | यवतमाळ | १७ | ०९ | १५ | ४१ |
| ७. | ठाणे | ३५ | ०१ | २७ | ६३ |
| ८. | नाशिक | ३१ | १६ | ४१ | ८८ |
| | एकूण | १६८ | १३३ | १२४ | ४२५ |

अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची आर्थिक उन्नती करुन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने शासनाने वरीलप्रमाणे योजनांचा लाभ अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना दिलेला असून तेलपंप लाभार्थी १६८, एच.डी.पी.ई. पाईप्स लाभार्थी १३३, तसेच तेलपंप / एच.डी.पी.ई. पाईप्स या दोन्ही योजनांचा लाभ घेतलेले १२४ लाभार्थी अशा एकूण ४२५ लाभार्थ्यांना शासकीय योजनेतून लाभ देण्यात आला आहे.

## अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांकडे स्वतःच्या मालकीची असलेल्या जमिनीची जिल्हानिहाय माहिती

( हेक्टर /आर)

| अ. क्र. | जिल्हा | लाभार्थी संख्या | लाभापूर्वी | | लाभानंतर | | वाढ झालेले बागायत क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | जिरायत | बागायत | जिरायत | बागायत | |
| १. | पुणे | ४५ | ६०.०४ | ३८.०८ | ३३.०० | ६५.०८ | २७.०० |

| अ. क्र. | जिल्हा | लाभार्थी संख्या | लाभापूर्वी | | लाभानंतर | | वाढ झालेले बागायत क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | जिरायत | बागायत | जिरायत | बागायत | |
| २. | अहमदनगर | ४३ | ८०.०० | ०.०० | ३४.७० | ४५.३० | ४५.३० |
| ३. | गोंदिया | ५४ | ६७.९९ | ०.०० | ०.०० | ६७.९९ | ६७.९९ |
| ४. | नागपूर | ४८ | १५४.५४ | २१.०० | १४६.७३ | २८.८१ | ०७.८१ |
| ५. | नांदेड | ४३ | ११६.८३ | २३.०७ | ९५.४२ | ४४.४८ | २१.४१ |
| ६. | यवतमाळ | ४१ | १००.७७ | ०.०० | ८.६२ | ९२.१५ | ९२.१५ |
| ७. | ठाणे | ६३ | ९८.९८ | २६.२४ | ६२.९३ | ३६.०५ | २.०० |
| ८. | नाशिक | ८८ | ८१.७५ | ९.१८ | ४९.५७ | ४१.३६ | ३२.१८ |
| | एकूण | ४२५ | ७६०.९ | ११७.५७ | ४३०.९७ | ४२१.२२ | २९५.८४ |

वरीलप्रमाणे अवलोकन केले असता, लाभार्थ्यांकडे असलेली जिरायत जमीन क्षेत्र हेक्टर आर ही जमीन शासनाने अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांची शेती ओलिताखाली आणण्यासाठी त्यांना तेलपंप / एच.डी.पी.ई. पाईप्स यांचा पुरवठा केल्यामुळे वरीलप्रमाणे जिरायत जमिनीचे बागायतीमध्ये रुपांतर होवून लाभार्थी भात / गहू या पारंपारिक पिकांव्यतिरिक्त हरभरा, कापूस, नागली / नाचणी व भाजीपाला अशी वेगवेगळी पिके घेवू लागला असून शासनाने त्यांना दिलेल्या योजनांमुळे त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यात मदत झाल्याचे दिसून येते.

## अनुसूचित जमातीचे लाभार्थी शेतीमध्ये घेत असलेल्या पिकांची माहिती (जिल्हानिहाय माहिती)

| अ. क्र. | प्रकल्प व जिल्हा | लाभार्थी संख्या | लाभापूर्वी | | | लाभानंतर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भात | नाचणी /नागली | हरभरा | भात | गहू | नाचणी /नागली | हरभरा | फरस बी |
| १. | घोडेगाव, जि.पुणे | ४५ | ४५ | ०४ | ०७ | ३८ | ३० | १० | २३ | ०२ |
| २. | देवरी, जि.गोंदिया | ५४ | ५४ | ०० | ०१ | ०८ | ०२ | ०३ | १४ | ०० |
| ३. | नागपूर, | ४८ | ४८ | ०० | १० | ४० | २९ | ०० | १६ | ०० |

| अ. क्र. | प्रकल्प व जिल्हा | लाभार्थी संख्या | लाभापूर्वी | | | लाभानंतर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भात | नाचणी /नागली | हरभरा | भात | गहू | नाचणी /नागली | हरभरा | फरस बी |
| | जि.नागपूर | | | | | | | | | |
| ४. | किनवट, जि.नांदेड | ४३ | ०६ | ०० | १६ | ०५ | ३१ | ०० | ३३ | ०० |
| ५. | पांढरकवडा, जि. यवतमाळ | ४१ | ०० | ०० | ०४ | ०० | १८ | ०० | २२ | ०० |
| ६. | शहापूर, जि.ठाणे | ६३ | २४ | ०० | ०० | २४ | ०० | ०० | ०० | ०० |
| ७. | डहाणू, जि.ठाणे | | ३८ | ०६ | ०१ | ३५ | ०० | ०५ | ०१ | ०० |
| ८. | नाशिक, जि.नाशिक | ८८ | ४१ | २५ | ०१ | ३५ | २६ | ०५ | १७ | ०० |
| ९. | कळवण, जि.नाशिक | | ४७ | २१ | ०५ | २६ | ४२ | ०३ | ४० | ०० |
| १०. | राजूर,जि. अहमदनगर | ४३ | ३९ | ०१ | ०० | ३३ | ३२ | ०४ | २२ | ०० |
| | एकूण | ४२५ | ३४२ | ५७ | ४५ | २४४ | २१० | ३० | १८८ | ०२ |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता, लाभार्थी हा लाभ मिळण्यापूर्वी भात, नाचणी, हरभरा अशी पारंपारिक पिके घेत होता. तेलपंप/एच.डी.पी.ई. पाईप्स या योजनेचा लाभ घेतल्यानंतर पारंपारिक पिकांव्यतिरिक्त गहू, फरसबी व भाजीपाला अशी पिके घेत असल्याचे दिसून येते. शासनाने लाभार्थ्यांना दिलेल्या योजनेनंतर विविध पिके घेण्यामध्ये लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसून येते.

**लाभार्थ्यांकडे उपलब्ध असलेल्या सिंचन स्त्रोतांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-**

| अ. क्र. | प्रकल्प | सिंचन स्त्रोत उपलब्ध लाभार्थी संख्या | सिंचनाची साधने | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | विहीर | नदी | नाला | पाझर तलाव | कॅनॉल | इतर | |
| १. | घोडेगाव | ४५ | २२ | ०६ | १० | ०५ | ०० | ०२ | ४५ |
| २. | देवरी | ५४ | ३५ | ०३ | १३ | ०३ | ०० | ०० | ५४ |

| अ. क्र. | प्रकल्प | सिंचन स्त्रोत उपलब्ध लाभार्थी संख्या | सिंचनाची साधने | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | विहीर | नदी | नाला | पाझर तलाव | कॅनॉल | इतर | |
| ३. | नागपूर | ४८ | ३६ | ०२ | ०५ | ०५ | ०० | ०० | ४८ |
| ४. | किनवट | ४३ | ३२ | ०१ | ०९ | ०० | ०० | ०१ | ४३ |
| ५. | पांढरकवडा | ४१ | २१ | ०१ | १६ | ०३ | ०० | ०० | ४१ |
| ६. | शहापूर | २७ | ०८ | ०८ | ११ | ०० | ०० | ०० | २७ |
| ७. | डहाणू | ३६ | १९ | १५ | ०१ | ०० | ०१ | ०० | ३६ |
| ८. | नाशिक | ४१ | ०७ | २३ | ०२ | ०९ | ०० | ०० | ४१ |
| ९. | कळवण | ४७ | २६ | ०३ | १८ | ०० | ०० | ०० | ४७ |
| | एकूण | ३८२ | २०६ | ६२ | ८५ | २५ | १ | ३ | ३८२ |

एकूण ४२५ लाभार्थ्यांपैकी २०६ लाभार्थ्यांकडे स्वत:च्या मालकीच्या विहीरी असून उर्वरीत २१९ लाभार्थीपैकी ६२ लाभार्थी नदी, ८५ लाभार्थी नाला, २५ लाभार्थी पाझर तलाव, ०१ लाभार्थी कॅनाल व ३ लाभार्थी ओढा व साचलेले पाणी यावर अवलंबून असल्याचे दिसून येते.

जिल्हानिहाय उत्पन्न माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | जिल्हा | उत्पन्न रु. १०,००० चे आतील | | रु. १०,००१ ते रु. २०,००० | | रु. २०,००१ ते रु. ३०,००० | | रु.३०,००१ ते रु. ४०,००० | | रु.४०,००१ ते रु. ५०,००० | | रु.५०,००१ ते रु. ६०,००० चे पुढील | | एकूण लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लाभापूर्वी | लाभानंतर | लाभापूर्वी | लाभानंतर | लाभापूर्वी | लाभानंतर | लाभापूर्वी | लाभानंतर | लाभापूर्वी | लाभानंतर | लाभापूर्वी | लाभानंतर | |
| १. | पुणे | १० | ०० | २५ | १६ | ०९ | २० | ०१ | ०५ | ०० | ०३ | ०० | ०१ | ४५ |
| २. | अहमदनगर | १९ | ०४ | १९ | २० | ०४ | १७ | ०१ | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ४३ |
| ३. | गोंदिया | २० | १५ | ३० | २८ | ०४ | ११ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ५४ |
| ४. | नागपूर | ०३ | ०२ | ३२ | ०६ | ११ | २४ | ०१ | १२ | ०१ | ०४ | ०० | ०० | ४८ |
| ५. | नांदेड | ०७ | ०० | १४ | ०५ | २० | १७ | ०२ | १० | ०० | ०५ | ०० | ०६ | ४३ |
| ६. | यवतमाळ | ०९ | ०० | ११ | १० | १६ | १२ | ०२ | ०९ | ०१ | ०२ | ०२ | ०८ | ४१ |
| ७. | ठाणे | १२ | ०३ | ३८ | २३ | १० | २८ | ०० | ०६ | ०० | ०० | ०३ | ०३ | ६३ |
| ८. | नाशिक | ०० | ०० | ६४ | १४ | २२ | ६२ | ०१ | ०९ | ०१ | ०२ | ०० | ०१ | ८८ |
| | एकूण | ८० | २४ | २३३ | १२२ | ९६ | १११ | ८ | ५३ | ३ | १६ | ५ | १९ | ४२५ |

वर निर्देशित केलेल्या तक्त्याचे अवलोकन केले असता,

*(अ) लाभापुर्वी रु. १०,०००/-आतील एकुण ८० लाभार्थी होते. या ८० लाभार्थ्यापैकी लाभानंतर रु. १०,०००/- च्या आतील फक्त २४ लाभार्थी असल्याचे दिसुन येते. म्हणजेच लाभानंतर ५६ लाभार्थ्यांचा आर्थिक स्तर उंचावल्याचे दिसुन आले आहे.*

*(ब) रु. १०,०००/- ते रु. २०,०००/- या टप्यामध्ये लाभापुर्वी एकुण २३३ लाभार्थी होते. लाभानंतर १२२ लाभार्थी राहिलेत. म्हणजेच लाभानंतर १११ लाभार्थींचा आर्थिक स्तर उंचावल्याचे दिसुन येते.*

*(क) रु.२०,००१/- ते रु.३०,०००/- या टप्यामध्ये लाभापुर्वी ९६ लाभार्थी होते मात्र लाभानंतर १९१ लाभार्थी*

*(ड) रू. ३०,००१ त रु. ४०,०००/- या टप्यामध्ये लाभापुर्वी ८ व लाभानंतर ५३ लाभार्थी*

*(इ) रु.४०,००१ ते रु.५०,०००/- या टप्यामध्ये लाभापुर्वी ३ व लाभानंतर १६*

*(ई) रु. ५०,००१ ते रु. ६०,०००/- या टप्यामध्ये लाभापुर्वी ५ व लाभानंतर १९ लाभार्थी.*

वरील प्रमाणे क ते ई चे अवलोकन केले असता लाभापुर्वीच्या लाभार्थ्यांची संख्या घटत जाऊन लाभानंतर संख्येत वाढ झाल्याचे दिसुन येते. वरील सर्व बाबींचे अवलोकन केले असता, तेलपंप पुरवठा योजना व एच.डी.पी.ई. पाईप पुरवठा या शासकीय योजनेचा लाभ घेतल्यानंतर त्यांचे उत्पन्नात वाढ झाल्याने रु. १०,०००/- ते रु.१०,००१/-ते रु.२०,०००/-, रु.२०,००१ ते रु.३०,०००/- , उत्पन्नवाढीमुळे या गटातील लाभार्थ्यांची संख्या कमी होवून वाढीव उत्पन्न गटात समाविष्ट झाली आहे. त्यामुळे वाढीव उत्पन्न गटातील लाभार्थ्यांची संख्येत वाढ झाली आहे.

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता त्यांचे लाभापूर्वी असलेले उत्पन्न व शासनाने तेलपंप योजनेचे लाभ दिल्यानंतर असलेले उत्पन्नाचे अवलोकन केले असता लाभानंतर त्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये निश्चितपणे सुधारणा झाल्याचे दिसून येते.

## निष्कर्ष व शिफारशी

१) शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी तेलपंप व एच.डी.पी.ई.पाईप्स या दोन्ही बाबींची गरज असते. मुल्यमापन पाहणीमध्ये असे दिसुन आले आहे की, काही लाभार्थ्यांना फक्त तेलपंपाचाच लाभ दिला जातो तर काही लाभार्थ्यांना फक्त एच.डी.पी.ई.पाईप्स दिल्या जातात. तेलपंप पुरवठा योजना व एच.डी.पी.ई. पाईप्स पुरवठा योजना या दोन्ही योजना एकमेकांना पुरक असल्याने शासन निकषाप्रमाणे ज्या लाभार्थ्याकडे आवश्यक त्या प्रमाणात शेती आहे, अशा लाभार्थ्यांस फक्त तेलपंप न देता एच.डी.पी.ई. पाईप्स पुरवठा या योजनेचाही लाभ देणे आवश्यक आहे.

२) अधिकाधिक लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देणे गरजेचे आहे जेणेकरुन तेलपंप व एच.डी.पी.ई. पाईप्सचा वापर करुन हे लाभार्थी आपल्या शेतीला जलसिंचनाच्या सुविधा देऊ शकतील व त्यामुळे त्यांच्या आर्थिक उत्पन्नात निश्चित वाढ होईल.

३) ब-याच आदिवासी शेतक-यांकडे विहिर असून विहिरीवर पंपसेट बसविलेला आहे. परंतू, काही वेळेस शेतीचे भिजणारे क्षेत्र पाण्याच्या स्त्रोतापासून लांब असेल तेव्हा विहिरीला भरपूर पाणी व पाणी उपसण्याचे साधन असून देखील जास्तीत जास्त प्रमाणात बागायती करणे शक्य होत नाही. अशावेळेस, आदिवासी शेतक-यांना शेतीचे भिजणारे क्षेत्र व पाण्याचा स्त्रोत यांतील अंतर बघून जास्तीत जास्त पाईप देणे आवश्यक आहे. पाईपांची कमाल संख्या किती असावी, हा निर्णय प्रकल्प स्तरावर घेण्याबाबत शासन स्तरावर विचार व्हावा.. जेणेकरुन, बागायती क्षेत्रात जास्तीत जास्त वाढ होईल.

४) सध्या आदिवासी शेतक-यांना प्रत्येकी जास्तीत जास्त रुपये १५,०००/- चे पाईप दिले जातात. परंतू, शेतीचे भिजणारे क्षेत्र व पाण्याचा स्त्रोत यातील अंतर जास्त असल्याने शेतीला पाणी देण्यावर मर्यादा पडतात. म्हणून आदिवासी शेतक-यांना शेतीचे भिजणारे क्षेत्र व पाण्याचा स्त्रोत यांतील अंतर बघून जास्तीत जास्त पाईप ( कमाल मर्यादा - रुपये ३०,०००/- चे पाईप प्रती लाभार्थी ) देणे आवश्यक आहे.

५) आदिवासी लाभार्थी शेतकरी हे अत्यंत दारिद्र्यात जीवन जगतात. त्यांना तेलपंपाचा पुरवठा केल्यानंतरही त्याच्या इंधनाचा म्हणजेच डिझेलचा होणारा खर्च त्यांना परवडत नाही. त्यामुळे शेतीच्या हंगामाच्या काळात म्हणजेच माहे नोव्हेंबर ते माहे जून या ८ महिन्यांच्या काळात प्रती लाभार्थी प्रती महिना क्षेत्रानुसार रुपये ६००/- इतके **इंधन अनुदान (Fuel Subsidy)** देण्यात यावे, जेणेकरुन आदिवासी शेतक-यांना तेलपंपाचा अधिकाधिक वापर करणे शक्य होईल.

६) आदिवासी लाभार्थी शेतक-यांना एकदा तेलपंप दिल्यानंतर तो तेलपंप नादुरुस्त झाल्यास किंवा बिघडल्यास त्याची दुरुस्ती करणे आर्थिदृष्ट्या फार अवघड जाते. याचा स्थानिक लोक व मोटार मॅकेनिक गैरफायदा घेतात व आदिवासी शेतक-यांना लुबाडतात. त्यांची ही पिळवणूक टाळण्यासाठी आदिवासी समाजातील बेरोजगार युवकांना तेलपंप व विद्युतपंप संच दुरुस्तीचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे, जेणेकरुन स्थानिक पातळीवरच तेलपंपाची दुरुस्ती होईल, बेरोजगार युवकांनाही रोजगार मिळेल व आदिवासी शेतक-यांची पिळवणूकही टाळता येईल.

७) आदिवासी लाभार्थी शेतक-यांकडे भांडवलाची कमतरता असते. तसेच संपूर्ण आदिवासी लाभक्षेत्रामध्ये पाण्याची उपलब्धता असली तरी सिंचन योजना नसल्यामुळे पिक उत्पादनक्षमता कमी आहे.

त्यासाठी उपसा जलसिंचन योजनेद्वारे १० ते १५ आदिवासींना या योजनेचा लाभ दिल्यास त्याचा फायदा सर्व आदिवासी लाभार्थींना मिळून उत्पन्नात भरीव वाढ होऊ शकेल.

**समारोप-**

तेलपंप/एच.डी.पी. पाईप पुरवठा या योजनेची परिणामकारक फलश्रुती ही कार्यक्षम प्रकल्प कार्यालयातील प्रकल्प अधिकारी/कर्मचारीवर्ग यांच्यावर अवलंबून आहे. या योजनेतील दोष/त्रुटी व उणिवा दूर करण्यास प्राधान्य व मूल्यमापनातील शिफारशीची अंमलबजावणी केल्यास आदिवासी उपयोजनेच्या माध्यमातून आदिवासी लाभार्थी आपल्या शेतीला जलसिंचनाच्या सुविधा देऊ शकतील व त्यामुळे त्यांच्या आर्थिक उत्पन्नात निश्चितच वाढ होईल.

* * *

# शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थी व शिक्षकांच्या समस्या आणि त्याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणारा परिणाम : एक अध्ययन

* प्रा. सुनिल कोडापे

प्राचीन काळी राजपूत, क्षत्रिय व ब्राम्हणपूत्र गुरुच्या आश्रमामध्ये राहून शिक्षण घेत असत. त्यालाच गुरुकूल म्हणत. गुरुकुलात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना सांकृतिक, शारिरीक, नितीमत्ता,व्यावहारिक, राजकीय, युध्द कौशल्याचे शिक्षण दिले जात असे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सामाजिक व बौध्दिक विकास गुरुकुलातून होत असे.

गुरुकूल पध्दतीचा पाया प्राचीन काळातच घातला गेला. शिक्षणाचा पाया घालणाऱ्या ऋषीमुनीनीच हा पाया घातला. ज्ञानार्जानासाठी शिष्याला गुरुच्या घरी जावे लागत असे. त्यामुळे शिष्य सतत ऋषीमुनीच्या गोतावळयात सर्व प्रकारचे विद्यार्थी असत. संदिपनी ऋषीच्या आश्रमात श्रीकृष्णासारख्या राजमान्यासोबत गरीब सुदामाही होता. त्या काळात समाजस्तराची विभागणी ही गरीब-श्रीमंतांत नव्हती ती वर्ण व्यवस्था पाहत होती. गुरुगृही आलेल्या सतत गुरुच्या साधिन्यात असलेल्या शिष्याला गुरु सातत्याने जवळून पाहत असल्याने गुरुला आपल्या शिष्यातील गुणदोष त्यांच्यातच असणारे कलाकौशल्य याचेही ज्ञान होत असे. त्यामुळे आपल्या शिष्याला कोणत्या विषयाची गोडी, आवड आहे, त्याला कोणत्या प्रकारच्या ज्ञानात आपण परिपूर्ण करु शकू, यांच्यातील कौशल्याचा कसा उपयोग होईल असा सर्वागाने विचार करुनच गुरु, शिष्य तयार करीत असे. शिष्याला शिकविताना गुरुलाही शिष्याकडून शिकता येत होते. याचा गुरुला अभिमान तर वाटेच, शिवाय त्याला शिकविण्यात गुरु स्वतःला धन्य समजत असे.

आपल्या माता-पित्याला, सोडून गुरुगृही आलेल्या शिष्यावर गुरु मातृ-पितृ भावनेनीच प्रेमाची पाखरण करीत असत. शिक्षण काळात शिष्यांना काहीही कमी पडू दिले जात नसे. गुरुकूल पध्दतीत केवळ गुरु व शिष्य एवढेच नातेसंबध किंवा शिक्षण हा एकच भाव नव्हता. तर सर्वच विचारांच्या आचारांच्या कक्षा रुंदावलेल्या होत्या. त्या वेळी शिक्षणासाठी आलेल्यांचाही एक समुदाय तयार होत असे. त्यामुळे ही शिक्षण पध्दती सामुदायिक श्क्षिण पध्दती हाती. त्यात अनेक संस्कार नकळत शिष्यावर हात असे. त्या संस्कराचा त्याना भविष्यकाळातही उपयोग हात असे.

*अधिव्याख्याता, आठवले कॉलेज ऑफ सोशल वर्क, भंडारा

सहवासाचे प्रेम चिरंतन असते हेच यावरुन समजते. **एकमेकां सहाय्य करु अवघे धरु सुपंथ** ही आपणात त्याच काळात मानवी मनात रुजलेली दिसते. गुरुकुल पध्दतीला अनुसरुन त्याची ध्येय उदिष्टय लक्षात घेऊन आदिवासींच्या विकासासाठी शासकीय आदिवासी आश्रमशाळेची निर्मिती करण्यात आली. भारतीय संविधानाच्या ४६ व्या अनुच्छेदत मागासलेल्या जमातीकडे विशेष लक्ष देण्यास सुचविलेले आहे. त्याप्रमाणे सरकारने केलेली तरतूद म्हणजे आश्रमशाळा होय. १९५३-५४ साली महाराष्ट्रात पहिली आश्रमशाळा सुरु झाली. आरंभीच्या शाळांमध्ये पहिली ते सातवीपर्यंत शिक्षणाची सोय होती. आता दहावीपर्यंत या शाळा शिक्षण देतात. १९७० साली महाराष्ट्रात ६८ आश्रमशाळा होत्या. तर २००१ मध्ये एकूण ४३३ पोस्टबेसिक आश्रमशाळा व ७३४ आश्रमशाळा आणि २३५ समाज कल्याण शासकीय वसतिगृह व १९० आदिवासी शासकीय वसतिगृहे आहेत.

सद्यस्थितीत आज आश्रमशाळेची वाढती लोकसंख्या लक्षात घेता आदिवासींचा शैक्षणिक स्तर निश्चितच उंचावला पाहिजे होता. आश्रम व्यवस्थेमध्ये ज्याप्रमाणे शिष्याला पूर्ण जीवन जगण्याचे ज्ञान प्राप्त होत असे, त्याचा सर्वांगीण विकास साधला जात असे. तो स्वतःच्या कर्तृत्वावर जीवन जगण्यास सक्षम बनत असे. शिक्षण निम्न होते. आजच्या आश्रमशाळेत विद्यार्थी हा गुरुच्या साधिन्यात राहत असतो. परंतू त्यांच्यावर संस्कार मात्र गुरुचे दिसून येत नाही किंवा गुरु सुध्दा आपले आदर्श व्यक्तीमत्व निर्माण करु शकत नाही. शिष्याला पाहिजे तेवढया प्रमाणात सक्षम घडवु शकत नाही. त्याला आपल्या सामर्थ्यांवर उभे राहण्याएवढी क्षमता त्यांच्यामध्ये निर्माण करु शक नाही. या सर्व बाबींचा सखोल विचार होणे आवश्यक आहे. आज आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची गळती, त्यांचे नापास होण्याचे प्रमाण, त्यांची शैक्षणिक गुणवत्ता, त्यांच्यातील कौशल्य, ज्ञान या सर्व गोष्टी आदिवासींच्या शैक्षणिक विकासला आळा घालताना दिसते. आश्रमशाळा योजनामुळे केवळ शाळांची किंवा आदिवासींचे शैक्षणिक विकासाचे लक्षण आहेत काय ? या सर्व बाबींकडे गांभीर्याने पाहणे आज काळाची गरज आहे.

प्रत्यक्षात शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या कितीतरी समस्या आहेत ज्या शासनापुढे आल्या नाही. जसे शाळेच्या इमारतीचे बांधकाम, शाळेतील सेवा-सुविधा, तेथील पात्रताधारक शिक्षक इ.सर्व बाबींचा आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर परिणमा घडत आहे आणि हे लक्षात घेऊन व त्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास करुन त्यामध्ये ही सुधारणा करता येईल यासाठी संशोधकाने शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थी व शिक्षकांच्या समस्या आणि त्यांचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणारा परिणाम - एक अध्ययन या विषयाची निवड करुन अध्ययन करण्याचे ठरविले आहे.

## समाजाची शिक्षणाकडून अपेक्षा

शिक्षण आणि समाज यांचा संबंध सखोल असावा. कारण निकोप समाजासाठी निकोप व्यक्तीमत्व घडविणे हे शिक्षणाचे ध्येय असते. कर्तृत्ववान, देशभक्त, चारित्र्यवान, संघटीत नागरिक घडविला की, वैभव संपन्न, कर्तृत्ववान, विश्वगुरुपदी विराजमान होऊ शकेल, असा समाज आपोआपच निर्माण होतो. म्हणूनच समाजाला शिक्षणाकडून उच्च दर्जाच्या अपेक्षा असतात. सामाजिक इतिहासाकडे नजर टाकली तर पानोपानी उत्तुंग व्यक्तीमत्वे शिक्षणाने घडविलेली दृष्टीस पडतील. वेदाचे दहा खंड लिहिणारा दशानन रावण, प्रतिसृष्टी निर्माण करणारा विश्वामित्र, वेद अभ्यास पारंगत गार्गी व मैत्रेयी, हजारो पिडीत महिलांचा उध्दारकर्ता श्रीकृष्ण ही आदर्श शिक्षणातून समाजाला मिळालेली बहुमूल्य देणगीच आहे. त्याचप्रमाणे चंद्रगुप्त गुरु चाणक्य, हर्षवर्धन हे राजकीय क्षेत्रातील मेरुमणी ठरतात. भाबाण, कालिदास ही वाङ्:मयीन क्षेत्रातील रत्ने होत. आर्यभट्ट, भास्कराचार्य यांनी वैज्ञानिक दृष्टीने सोनेरी पाने लिहिलेली आहेत. यावरुन असे लक्षात येते की, समाजाच्या शिक्षणापासून अपेक्षा म्हणजे निरनिराळया क्षेत्रातील सर्वोत्तर आदर्श व्यक्तीमत्वे घडवा. आभाळाऐवढी कर्तृत्वान माणसे जास्तीत जास्त कशी घडतील असा प्रयत्न करा. एक सभ्य, सुसंस्कृत, यशदायी, दैदिप्यमान समाज घडेल. आर्य संस्कृतीत हे घडले कारण त्यावेळेचे ज्ञानी पुरुष अरण्यात राहुन चिंतन करीत. समाज घडविण्यासाठी शिक्षणाकडून नेमक्या गोष्टी समाजापर्यंत गुरु शिष्य नात्यातून पोहोचायला हव्यात.

## उद्देश

१. आश्रमशाळेतील उपलब्ध सेवा व साधनांची माहिती जाणून घेणे.

२. आश्रमशाळेतील विद्यार्थी आणि शिक्षक यांची कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी जाणून घेणे

३. आश्रमशाळेतील विद्यार्थी व शिक्षकांच्या शैक्षणिक, मानसिक, आरोग्य व भौतिक समस्या जाणून घेणे.

४. विद्यार्थी व शिक्षकांच्या समस्यांचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे.

उपकल्पना

१. शासकीय आश्रमशाळेतील अपुऱ्या सोयी सवलतीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर प्रभाव पडतो.

२. विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक व आर्थिक समस्यांचा त्यांच्या शिक्षणावर परिणाम घडतो.

३. आदिवासींच्या बोलीभाषेचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर परिणाम होतो.

४. शासकीय आश्रमशाळेतील शिक्षकांना मिळणाऱ्या अपुऱ्या सेवा सुविधांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत.

५. शिक्षकांच्या कौटुंबिक व वैयक्तिक समस्यांचा विद्यार्थ्यांच्या शिकवणीवर परिणाम होतो.

६. आश्रमशाळेतील अप्रशिक्षित शिक्षकांचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जावर परिणाम घडतो.

७. आश्रमशाळेतील प्रशासनावर शासनाचा प्रभाव नसलयाने तेथील समस्यांची दखल घेतली जात नाही.

**संशोधन प्रश्न**

१. शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची कौटुंबिक, सामाजिक स्थिती कशी आहे.

२. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या कुटुंबांची आर्थिक स्थिती कशी आहे.

३. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शाळेकडून कोणकोणत्या सेवा पुरविल्या जातात.

४. विद्यार्थ्यांच्या गरजा भागविण्यासाठी कोणती साधने शासनाकडे उपलब्ध आहेत.

५. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या कोणत्या आहेत.

६. आश्रमशाळेतील विद्यार्थी कोणत्या मानसिक अवस्थेत आहेत.

७. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना आरोग्याच्या कोणत्या समस्या आहेत.

८. विद्यार्थ्यांना कोणकोणत्या भौतिक समस्यांना तोंड द्यावे लागते.

९. आश्रमशाळेतील शिक्षकांना कोणकोणत्या कौटुंबिक समस्या आहेत.

१०. आश्रमशाळेतील शिक्षकांची कोणत्या प्रकारची आर्थिक समस्या आहे.

११. आश्रमशाळेतील शिक्षकांना कोणत्या आरोग्याच्या समस्य जाणवतात.

१२. आश्रमशाळेतील शिक्षकांना कोणत्या मानसिक समस्यांना तोंड द्यावे लागते.

१३. आश्रमशाळेतील शिक्षकांच्या प्रशासकीय समस्या कोणत्या आहेत.

१४. आश्रमशाळेची प्रशासकीय प्रक्रिया कशी आहे.

१५. आश्रमशाळेतील शिक्षकांच्या वैयक्तिक समस्यांचा त्यांच्या शिकवणीवर कोणता परिणाम घडून येतो.

१६. आश्रमशाळेतील शिक्षकांच्या प्रशासकीय समस्यांचा त्यांच्या शिकवणीवर कोणता परिणाम होतो.

१७. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या भौतिक समस्यांचा त्यांच्या शिक्षण प्रक्रियेवर कसा परिणाम घडून येतो.

१८. विद्यार्थ्यांच्या मातृभाषेचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर कोणता आणि कसा परिणाम घडतो.

१९. आश्रमशाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी यांचे संबंध कसे आहेत.

२०. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने शाळा कोणते प्रयत्न करीत आहेत.

## अध्ययन पध्दती

संशोधकाने प्रस्तुत अध्ययन क्षेत्र नागपूर जिल्हा घेतला आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर अंतर्गत चालविलेल्या माध्यमिक स्तरावरील सात आश्रमशाळा घेतल्या आहेत. प्रत्येक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे स्तर पाडण्यात आले आहे. त्यामध्ये प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, स्तर पाडलेले आहेत. प्रत्येक स्तरातून विद्यार्थ्यांची अध्ययनासाठी निवड केली आहे. विद्यार्थी निवडताना समप्रमाणात मुला-मुलींची निवड केली आहे. प्रत्येक शाळेतून उपस्थित सर्व शिक्षकांकडून आणि निवड केलेल्या सर्व विद्यार्थ्यांकडून मुलाखत अनुसूचीद्वारा माहिती प्राप्त केली आहे. सोबत सामूहिक पध्दतीने मुला-मुलींची वेगवेगळी सभा आयोजित करुन सामूहिक माहिती मिळविली आहे. त्याप्रमाणे सर्व उपस्थितीत शिक्षकांशी सामूहिक चर्चा केली आहे. मुख्याध्यापक आणि अधीक्षक यांच्याशी चर्चा करुन माहिती घेतली आहे. त्याचबरोबर आश्रमशाळा असलेल्या गांवातील प्रमुख व्यक्तीशी चर्चा करुन माहिती मिळविली आहे.

प्रस्तुत माहिती मिळविण्यासठी संशोधनकर्त्याने एक अध्ययन गट स्थापित करुन त्यांना सुरुवातीला प्रशिक्षण दिले आहे. संशोधक हा समाजकार्य अभ्यासक्रमाचा प्राध्यापक असल्याने आणि यू.जी.सी.कडून संशोधन प्रकल्प मान्य करुन घेतल्याने समाजकार्य महाविद्यालयातील पदवी अंतिम वर्षाला असलेले विद्यार्थी, विद्यार्थीनी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाला असलेल्या निवडक विद्यार्थ्यांची निवड करुन एक अध्ययन गट तयार करण्यात आला होता. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून व आदिवासींच्या शैक्षणिक विकासाकरिता शासनाकडून होत असलेल्या प्रयत्नांची माहिती समाजकार्य विद्यार्थ्यांना मिळावी हा हेतू ठेवून विद्यार्थ्यांना संशोधन प्रकल्पामध्ये सहभागी केले होते. प्रस्तुत अध्ययनामध्ये एकूण आश्रमशाळेतील १४३ मुले व १४३ मुली आणि प्रत्येकी ७ मुख्याध्यापक आणि अधीक्षक यांची निवड करुन प्रस्तुत विषयाची माहिती प्राप्त केली आहे. उपरोक्त माहितीच्या आधारावर संशोधनाचे निष्कर्ष काढण्यात आले आहे व संबंधित विभागाला त्या संदर्भात सूचना व शिफारशी केल्या आहेत.

## अध्ययन निष्कर्ष :-

१. आश्रमशाळेतील बहुसंख्य विद्यार्थ्यांचे आई, वडिल अशिक्षित आहेत. त्यांच्या कुटुंबांत उच्च शिक्षण घेतलेले व्यक्ती आढळले नाही.

२. त्यांच्या कुटुंबांचा मुख्य व्यवसाय मजुरी हा दिसून आला. फारच कमी कुटुंबांकडे शेती आहे. शेतीचे प्रमाण पाच एकर पेक्षा कमी आहे. शेतीमध्ये ओलिताची सोय नाही.

३. विद्यार्थ्यांचे पालक शिक्षणाप्रती जागृत असले तरी शैक्षणिक गुणवत्ता याबाबत काही कल्पना नाही. मुलांना शिक्षणानंतर नोकरी मिळावी अशी अपेक्षा व्यक्त करतात.

४. मुलांना आश्रमशाळेत पुरविण्यात येणारे शैक्षणिक साहित्य अपुरे आहे. तसेच त्यांचा पुरवठा वेळेवर होत नाही. अभ्यासक्रम सुरु झाला तरी विद्यार्थ्यांना संबंधित पुस्तकाचा पुरवठा झालेला नाही.

५. विषयाशी संबंधित पुस्तकांचा साठा आश्रमशाळेकडे नाही. अभ्यासाव्यतिरिक्त वाचनासाठी उदा.कथा, कादंबरी, थोर महात्मे यांचे चारित्र्य, स्पर्धा परीक्षा इ.ग्रंथालयात उपलब्ध नाही. विद्यार्थ्यांसाठी वाचनकक्ष उपलब्ध नाहीत.

६. विद्यार्थ्यांच्या करमणुकीकरिता टी.व्ही. संच, संगणक इ. दिले आहेत. परंतू त्याचा उपयोग कधी विद्युत पुरवठा अभावी, तर कधी पुरेशा जागे अभावी, तर पुरेश्या मार्गदर्शन खोल्या उपलब्ध नसल्याने ते बंद अवस्थेत पडलेले आहेत. त्यामुळे मुलांना मैदानी खेळाशिवाय पर्याय नाही. बुध्दीला चालना देणारे बुध्दीमत्ता वाढविणारे खेळ होत नाहीत.

७. आजचे युग संगणकाचे युग मानले जाते. परंतू आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थी वेगवेगळया कारणांनी संगणक ज्ञानापासून इंटरनेट सेवा, ई- सेवा इ.पासून वंचित आहेत.

८. आश्रमशाळा अति दुर्गम क्षेत्रात असल्याने वाहतूक सेवा, आवश्यक वस्तुंच्या उपलब्धतेपासून वंचित आहे. अशा ठिकाणी चांगले शिक्षक जाण्यास तयार नाही. इतर जगाच्या संपर्कात नियमित नसल्याने त्यांच्या ज्ञानात जेवढी भर व्हावी तेवढी पडताना दिसून येत नाही. विद्यार्थ्यांप्रमाणे शिक्षकसुध्दा संगणक शिक्षण व इतर माहितीपासून अलिप्त आहे.

९. शिक्षकांना संबंधित विषयाचे सखोल ज्ञानाकरिता आवश्यक सेवा सुविधा उपलब्ध नसल्याने ते आपल्या संबंधित विषयात अपडेट राहू शकत नाहीत.

१०. आश्रमशाळा मुख्य कार्यालयापासून दूर असल्याने विद्यार्थ्यांना अथवा शिक्षकांना उद्‌भवलेल्या समस्यांचे तत्परतेने निवारण होत नाही.

११. विद्यार्थ्यांना पुरेशी निवास व्यवस्था उपलब्ध नाही. अजूनही विद्यार्थी अंगणवाडी, बालवाडी अवस्थेत असल्यासारखे आहेत. अभ्यासाकरिता पोषक असे वातावरण आश्रमशाळेत अजूनही निर्माण होऊ शकले नाही.

१२. विद्यार्थ्यांची बोलीभाष व मातृभाषा शिक्षणाच्या माध्यमापासून वेगळी असल्याने विदयार्थांना शिकविण्यासाठीच शिक्षकांना अडचणी येत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांची विचारशक्ती, आकलन शक्ती प्रभावशील नाही. विद्यार्थ्यांना आपले मत मांडता येत नाही.

१३. विद्यार्थ्यांच्या कुटुंबांच्या स्थितीचा समाजाचा स्थितीचा विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रक्रियेवर परिणाम दिसतो. अजूनही आश्रमशाळा विद्यार्थ्यांच्या कुटुंब व सामाजिक समस्येंच्या प्रभावापासून दूर करु शकली नाही.

१४. विद्यार्थी व शिक्षकांच्या वैयक्तिक व सामाजिक समस्यांचा प्रभाव दिसतो.

आवश्यक सेवा सुविधा पुरेपुर उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर त्याचा परिणाम होत आहे. स्पर्धेच्या युगात आश्रमशाळेतील विद्यार्थी कसा टिकेल हा मोठा प्रश्न समाजासमोर आहे.

**संदर्भ :-**


| | |
|---|---|
| डॉ. गारे जी. एम. (१९९८) | महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, अमृत प्रकाशन, औरंगाबाद |
| डॉ. गारे जी. एम. (१९७८) | आदिवासी समस्या-विचार आणि विश्लेषण, आदिवासी साहित्य प्रकाशन, पुणे |
| डॉ. गारे जी. एम. (१९९७) | आदिवासींचे शिक्षण- संकेत प्रकाशन,औरंगाबाद |
| डॉ. गारे जी. एम. (१९७६) | आदिवासी प्रश्न, आदिम साहित्य, पुणे |
| डॉ. गारे जी. एम. (१९७६) | आदिवासी समाज आणि संस्कृती, आदिवासी साहित्य,पुणे |
| डॉ. गारे जी. एम. (२०००) | बदलत्या उंबरठयावरील कोकणा आदिवासी, श्री विद्या प्रकाशन, पुणे |
| डॉ. गारे जी. एम. (२००१) | आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ, सुगावा प्रकाशन, पुणे |
| डॉ. गारे जी. एम. (२००१) | रौप्य महोत्सवी ग्रंथ- आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे |
| दिवेकर एम. के. (२००८) | आदिवासी जमिनी विषयक कायदे, मुकुल प्रकाशन, ठाणे |
| डॉ. धर्माधिकारी (१९८६) | शिक्षकांचा धर्म, श्री विद्या प्रकाशन, पुणे |
| थोपटे के. एम (२००५) | इंग्रजी माध्यमाच्या शासकीय आश्रमशाळेत मिळणाऱ्या लाभाविषयी लाभार्थ्यांचे मत, समाज कार्य (एम.एस.डब्ल्यू.) परीक्षेस सादर, नागपूर विद्यापीठ, नागपूर |
| महाराष्ट्र शासन (२००२-०३) | वार्षिक आदिवासी उपयोजा पुस्तिका |
| महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग (२०१२-१३) | दहावी पंचवाषिक उपयोजना |
| महाराष्ट्र शासन (२००६-०७ | वार्षिक आदिवासी उपयोजा पुस्तिका |
| मराठे कालीदास बा (१९०८) | शालेय पातळीवर गुणवत्तेचे मानांकन, अभिनव बुक डेपो, कोल्हापूर |
| डॉ.मांडवकर भाऊ (१९९७) | आदिवासी सेवा प्रकाशन, अमरावती |
| डॉ.मुनघाटे प्रमोद (२००७) | आदिवासी मराठी साहित्य : स्वरुप आणि समस्या, अरुण पारगांवकर, पुणे |
| भारत सरकार (२००७-२००८) | वार्षिक रिपोर्ट (२००७-०८), जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार, (२००२) भारताचे संविधान, विधी व न्याय कंपनी कार्य मंत्रालय. |


* * *

# महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकासाच्या योजना आणि योजनांचे मूल्यमापन

* डॉ. जे. एस. इंगळे

## प्रास्ताविक :-

भारतात ४२५ आदिवासी जमाती असून महाराष्ट्रातील जमातीची संख्या ४७ इतकी आहे. सन १९७१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासींची लोकसंख्या ३८.४१ लाख इतकी होती. सन २००१ च्या जनगणनेनुसार ती ८५.५७ लाख होती. १९७१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ७.३२ टक्के होते. तर, २००१ च्या जनगणनेनुसार राज्यातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ८.८५ टक्के होते.

## उदिष्टये

या शोधनिबंधाची प्रमुख उद्दिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

१) शासनाच्या आदिवासी विकासाच्या योजनांचा अभ्यास करणे.

२) योजनांच्या परिणामाचा अभ्यास करणे.

३) आदिवासी विकास योजनांची उपयुक्तता वाढावी यासाठी उपाय सुचविणे

## व्याप्ती व मर्यादा

या शोधनिबंधात घोडेगांव (जि.पुणे) येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या कार्यालयातून मिळालेल्या माहितीच्या आधारे शोधनिबंधाची मांडणी केली आहे. तसेच नोकरीच्या निमित्ताने आदिवासी भागात अनेक वर्षे केलेल्या वास्तव्यातून आलेल्या अनुभवांचा आणि निरीक्षणाचा आधार घेतला आहे.

* प्राध्यापक - व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख आणि ॲसोशिएट प्रोफेसर, शरदचंद्र पवार कॉलेज, लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा

अभ्यास क्षेत्रातील आदिवासी लोकसंख्या

'महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकासाच्या योजना आणि योजनांचे मूल्यमापन' या विषयाचा अभ्यास करण्यासाठी घोडेगांव (जि.पुणे) येथील एकात्मिक आदिवीस विकास विकास प्रकल्पाच्या कार्यालया अंतर्गत येणाऱ्या विविध पाच जिल्हयाचां विचार केला आहे. म्हणून या पाच जिल्हयातील एकूण लोकसंख्या आणि आदिवासींची लोकसंख्या पाहणे आवश्यक आहे. याची माहिती या विभागात दिलेली आहे.

घोडेगांव एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पात समाविष्ट असणाऱ्या विविध जिल्हयातील आदिवासींची लोकसंख्या

पुणे जिल्हयातील आंबेगांव तालुक्यातील घोडेगांव या ठिकाणी आदिवासींच्या विकासाचे कार्यक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचे कार्यालय सुरु केले आहे. घोडेगांव एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर हे पाच जिल्हे येतात. सन २००१ च्या जनगणनेनुसार या पाच जिल्हयातील आदिवासींची लोकसंख्या खालील तक्त्यात दर्शविली आहे.

तक्ता क्र. १

घोडेगांव एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पात समाविष्ट असणाऱ्या विविध जिल्हयातील आदिवासींची लोकसंख्या

| अ. क्र. | जिल्हयाचे नांव | तालुक्यांची संख्या | गांवाची संख्या | एकूण लोकसंख्या | आदिवासींची लोकसंख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे | १४ | १८८२ | ७२,३२,५५५ | २,६१,७२२ | ३.६१ |
| २. | सातारा | ११ | १७३८ | २८,०८,९९४ | २१,८९६ | ०.७७ |
| ३. | सांगली | ०९ | ७९९ | २५,८३,५२४ | १७,८५५ | ०.६९ |
| ५. | सोलापूर | ११ | १०३० | ३८,४९,५४३ | ६८,९८९ | १.७९ |
| ६. | कोल्हापूर | १२ | १२०७ | ३५,२३,१६२ | २१,३८७ | ०.६० |
| | एकूण | ५७ | ६६५६ | १,९९,९७,७७८ | ३,९१,८४९ | १.९५ |

*(१) स्त्रोत : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगांव*

तक्ता क्र.१ वरुन असे दिसते की, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर या पाच जिल्हयातील आदिवासी लोकसंख्या ३,९१,९४९ इतकी असून या पाच जिल्हयातील एकूण १,९९,७७,७८



R-29
5

असून आदिवासी लोकसंख्येचे शेकडा प्रमाणे अवघे १.९५ आहे.

तक्ता क्र.१ वरुन असे दिसते की, आदिवासी लोकसंख्या सर्वात जास्त पुणे जिल्हयात असून ती २.१,७२२ इतकी आहे. पुणे जिल्हयातील आदिवासी लोकसंख्येचे जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण ३.६९ इतके आहे. सोलापूर जिल्हयातील आदिवासी लोकसंख्या ६८,९८९ इतकी असून जिल्हयाच्या एकूण ३८,४९,५४३ लोकसंख्येाी शेकडा प्रमाण १.७९ इतके आहे. सांगली जिल्हयातील आदिवासी लोकसंख्या ३१,८९६ आहे. तर कोल्हापूर जिल्हयातील आदिवासी लोकसंख्या २१,३८७ इतकी आहे.

### आदिवासी विकासाच्या योजना-

शोधनिबंधाच्या तिसऱ्या भागात महाराष्ट्र शासन घोडेगांव येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर इत्यादी विविध जिल्हयातील आदिवासींच्या विकासासाठी राबवित असलेल्या विकासाच्या विविध योजनांची माहिती दिली आहे.

### आदिवासी विद्यार्थ्याच्या शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्कासाठी केलेला खर्च -

आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण घेता यावे यासाठी जे आदिवासी विद्यार्थी मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेत शिक्षण घेतात त्या विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क शासनाकडून भरले जाते. तक्ता क्र. २ मध्ये २००६-०७ व २००८-०९ या काळात शासनाने आदिवासी विद्यार्थ्याच्या शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्कासाठी कलेल्या खर्चाची माहिती दिली आहे.

**तक्ता क्र.२**

**आदिवासी विद्यार्थ्याच्या शिक्षण शुल्क आणि परीक्षाशुल्कासाठी केलेला खर्च**

| अ. क्र. | वर्ष | तरतूद (रुपये) | खर्च (रुपये) | खर्चाचे तरतूदीशी प्रमाण | विद्यार्थी संख्या | महाविद्यालयाची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २००६-०७ | ३७६३००० प्लॅन | ३७६१६४१ | ९९.९६ | ५५८ | ७८ |
| २. | २००७-०८ | ६१४०००० प्लॅन | १६८१३४२ | २७.३८ | ४१२ | ७५ |
| ३. | २००८-०९ | २६००००० प्लॅन | २०१८६१० | ७७.६३ | ९४ | ३१ |

| अ. क्र. | वर्ष | तरतूद (रुपये) | खर्च (रुपये) | खर्चाचे तरतूदीशी प्रमाण | विद्यार्थी संख्या | महाविद्यालयाची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ४. | २००७-०८ | ७८९२००० नॉनप्लॅन | ७६९२०६५ | ९७.४६ | ८०० | ४७ |
| ५. | २००८-०९ | ७५००००० नॉनप्लॅन | ७४५००४६ | ९९.३३ | ९०४ | ६२ |

*(१) स्त्रोत : तक्ता क्र.१ प्रमाणे*

तक्ता क्र.२ वरुन असे दिसते की, महाराष्ट्र शासनाने पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर इत्यादी पाच जिल्हयातील आदिवासी विद्याथ्याचे शिक्षण शिल्क आणि परीक्षा शुल्क भरण्यासाठी सन २००६-०७ पासून २००८-०९ पर्यंत मोठा खर्च केलेला आहे.

**व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या निर्वाहभत्त्यावर महाराष्ट्र शासनाने केलेला खर्च**

वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, पशुवैद्यकीय, वास्तुशास्त्र, एम.बी.ए. एम.एस.डब्ल्यू. बी.एड.आणि डी.एड.इत्यादी शिक्षण घेणाऱ्या पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा इत्यादी जिल्हयातील आदिवीस विद्यार्थ्याच्या निर्वाहभत्त्यावर शासनाने केलेल्या खर्चाची माहिती तक्ता क्र.३ मध्ये दिली आहे.

**तक्ता क्र. ३**

**व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या निर्वाहभत्त्यावर महाराष्ट्र शासनाने केलेला खर्च**

| अ. क्र. | वर्ष | तरतूद (रुपये) | खर्च (रुपये) | खर्चाचे तरतूदीशी प्रमाण | विद्यार्थी संख्या | महाविद्यालयाची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २००६-०७ | ३२०००० | ३१९५०० | ९९.८४ | ५३ | ०८ |
| २. | २००७-०८ | १२२०००० | १११६७०० | ९१.५३ | १८० | ३५ |
| ३. | २००८-०९ | २२५२००० | १५५५६०० | ६९.०७ | २४२ | ४८ |

*(१) स्त्रोत : तक्ता क्र.१ प्रमाणे*

तक्ता क्र.३ वरुन असे दिसते की, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर इत्यादी पाच जिल्हयातील व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या निर्वाहभत्त्यावर महाराष्ट्र शासनाने सन २००६-०७ पासून २००८-०९

पर्यंत मोठा खर्च केला आहे. वरील तक्त्यावरुन असे दिसते की, २००८-०९ या वर्षात महाराष्ट्र शासनाने आदिवासी विद्यार्थ्यांच्या निर्वाहभत्त्यावर निधीची जेवढी तरतूद केली होती, त्यापेक्षा कमी म्हणजे केवळ ६९.०७ टक्केच खर्च केला होता.

३.१ आदिवासी युवकांना पोलीस व लष्कर भरती पूर्व प्रशिक्षण योजना

आदिवासी तरुण-तरुणींना सैन्यदल, पोलीस दल, राज्य राखीव दल, औद्योगिक सुरक्षा दल आणि इतर संरक्षण दलामध्ये नोकरी मिळावी यासाठी महाराष्ट्र शासनाकडून त्यांना शिक्षण व प्रशिक्षण दिले जाते. निवास, भोजन, गणवेश इत्यादी त्यांना मोफत पुरविले जाते. तक्ता क्र. ३ मध्ये सन १९८९-९० ते २००८-२००९ या काळात आदिवासी युवकांच्या प्रशिक्षणावर महाराष्ट्र शासनाने केलेल्या खर्चाची माहिती दिली आहे.

**तक्ता क्र. ४**

**आदिवासी युवकांच्या प्रशिक्षणावर केलेला खर्च**

| अ.क्र. | घटक | संख्या व प्रमाण |
|---|---|---|
| १. | प्रवेश घेतलेले प्रशिक्षणार्थी (संख्या) | १७५३ |
| २. | प्रशिक्षण पूर्ण केलेले प्रशिक्षणार्थी (संख्या) | १३६७ |
| ३. | प्रशिक्षण पूर्ण कैलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचे प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थींशी प्रमाण (%) | ७७.९८ |
| ४. | नोकरीस लागलेले प्रशिक्षणार्थी (संख्या) | २२६ |
| ५. | नोकरीस लागणलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांशी प्रमाण (%) | १६.५३ |
| ६. | प्रशिक्षणासाठी केलेली तरतूद (लाख रुपये) | ११४.७७ |
| ७. | प्रशिक्षणावर प्रत्यक्षात केलेला खर्च (लाख रु.) | ५२.५४ |
| ८. | प्रशिक्षणावर केलेल्या खर्चाचे प्रशिक्षणासाठी केलेल्या तरतूदीशी प्रमाण (%) | ४५.७७ |

*(१) स्त्रोत तक्ता क्र.१ प्रमाणे*

तक्ता क्र.४ वरुन असे दिसते की, सन १९८९-९० ते २००८-०९ या काळात १७५३ आदिवासी युवकांनी सैन्य दल, पोलीस दल, इत्यादीसाठी प्रशिक्षणार्थींनी म्हणून प्रवेश घेतला होता. त्यापैकी १३६७ (७७.९८ टक्के) प्रशिक्षणार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले. २२.०२ टक्के आदिवासी प्रशिक्षणार्थींचे प्रशिक्षण पूर्ण झालेले नाही.

प्रशिक्षण पूर्ण केलेल्या १३६७ आदिवासी युवकांपैकी २२६ प्रशिक्षणार्थ्यांना नोकरी प्राप्त झाली असून नोकरी मिळालेल्या आदिवासी प्रशिक्षणार्थ्यांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. हे प्रमाण अवघे १६.५३ टक्के आहे. प्रशिक्षण पूर्ण झालेल्यापैकी ८३.४७ टक्के प्रशिक्षित आदिवासी नोकरीपासून वंचित आहेत. शासनाने आदिवासी युवकांच्या प्रशिक्षणासाठी ११४.७७ लाख रुपये खर्चाची तरतूद केली होती. प्रत्यक्षात शासनाने प्रशिक्षणावर ५२.५४ लाख रु.एवढा खर्च केला. म्हणजे प्रशिक्षणासाठी खर्चाची जेवढी तरतूद केलेली होती, त्या तरतूदीच्या केवळ ४५.७७ टक्के एवढाच खर्च केला. प्रशिक्षणावर खर्च न केलेल्या खर्चाचे प्रशिक्षणासाठी तरतूद केलेल्या खर्चाशी प्रमाण ५४.२३ टक्के इतके आहे.

**सेवायोजन विभागात नांवनोंदणी केलेल्या आणि नोकरीस लागलेल्या आदिवासी उमेदवारांची माहिती-**

तक्ता क्र. ५ मध्ये घोडेगांव येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील सेवायोजन विभागात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर जिल्हयातील नोकरीसाठी नांवनोंदणी केलेल्या आदिवासी उमेदवारांची संख्या आणि त्यापैकी नोकरी प्राप्त झालेल्या आदिवासी उमेदवारांची संख्या व प्रमाण दर्शविले आहे.

**तक्ता क्र. ५**

**सेवायोजन विभागात नांवनोंदणी केलेल्या आणि नोकरीस लागलेल्या आदिवासी उमेदवारांची माहिती**

| अ.क्र. | घटक/तपशील | संख्या व प्रमाण |
|---|---|---|
| १. | नांवनोंदणी केलेल्या आदिवासी उमेदवारांची संख्या | ४५५०५ |
| २. | नोकरीस लागलेल्या आदिवासी उमेदवारांची संख्या | २९१७ |
| ३. | नोकरीस लागलेल्या आदिवासी उमेदवारांचे नांवनोंदणी केलेल्या आदिवासी उमेदवारांशी प्रमाण (टक्के) | ६.४१ |

*स्त्रोत तक्ता क्र.१ प्रमाणे*

तक्ता क्र.५ वरुन असे दिसते की, आदिवासी समाजात बेरोजगार तरुणांचे प्रमाण मोठे आहे. कारण नोकरीसाठी घोडेगांव येथील प्रकल्प कार्यालयात नांवनोंदणी केलेल्या आदिवासी उमेदवारांची संख्या ४५५०५ इतकी असून त्यापैकी केवळ २९१७ म्हणजे ६.४१ टक्के आदिवासी उमेदवारांना रोजगार किंवा नोकरी मिळालेली आहे. ९३.५९ टक्के आदिवासी उमेदवार बेरोजगार आहेत.

### न्युक्लिअस बजेट योजना :-

न्युक्लिअस बजेट योजनेस केंद्रवर्ती अर्थसंकल्प असे म्हणतात. ज्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पनात नसतो, परंतू ज्या योजना आदिवासींच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाच्या असतात. अशा योजनांचा समावेश न्युक्लिअस बजेट योजनेत होतो. उत्पन्न वाढ, प्रशिक्षण, मानव साधन संपत्ती विकास व कल्याणात्मक योजनांकरिता एका आदिवासी कुटुंबांकरिता शासनाकडून जास्तीत जास्त रु. पंधरा हजार पर्यंत अर्थसहाय्य दिले जाते. खालील तक्त्यात सन २००६-०७ ते २००७-०८ या काळात शासनाने न्युक्लिअस बजेटमध्ये आदिवासींच्या विकासासाठी केलेल्या खर्चाची तरतूद व प्रत्यक्ष केलेला खर्च दर्शविला आहे.

**तक्ता क्र.६**

**न्युक्लिअस बजेट योजनांतर्गत खर्चाची तरतूद व प्रत्यक्ष केलेला खर्च**

| अ.क्र. | वर्ष | तरतूद रक्कम (लाख रुपये) | प्रत्यक्ष केलेला खर्च (लाख रुपये) | योजनांवर केलेल्या खर्चाचे तरतूद केलेल्या रक्कमेची प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|
| १. | २००६-०७ | ८४.०१ | ७९.४३ | ९४.५४ |
| २. | २००७-०८ | १२०.२० | ११६.७६ | ९७.१३ |

*स्त्रोत तक्ता क्र.१ प्रमाणे*

तक्ता क्र.६ वरुन असे दिसते की, सन २००६-०७ आणि २००७-०८ या वर्षात न्युक्लिअस बजेट योजनेंतर्गत विविध योजनांवर महाराष्ट्र शासनाने केलेल्या खर्चाचे तरुद केलेल्या रकमेशी प्रमाण अनुक्रमे ९४.५४ टक्के आणि ९७.१३ टक्के इतके आहे.

### आदिवासी मुलीमधील गळतीचे प्रमाण थांबविण्यासाठी शिष्यवृत्तीवर केलेला खर्च

आदिवासी विद्यार्थीनीची गळती थांबविण्यासाठी सरकार त्यांना शिष्यवृत्ती देते. खालील तक्त्यात इयत्ता ५ वी ते दहावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या आदिवासी मुलींच्या शिष्यवृत्तीवर शासनाने केलेल्या खर्चाची माहिती दिली आहे.

तक्ता क्र.७

आदिवासी मुलींमधील गळतीचे प्रमाण थांबविण्यासाठी शिष्यवृत्तीवर केलेला खर्च

| अ.क्र. | वर्ष | केलेली तरतूद (लाख रुपये) | केलेला खर्च (लाख रुपये) | केलेल्या खर्चाचे प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|
| १. | २००५-०६ | ६३.२१ | ६३.१२ | ९९.८५ |
| २. | २००६-०७ | ६०.०० | ५२.०२ | ८६.७० |
| ३. | २००७-०८ | ५६.७६ | ५५ज०९ | ९७.०५ |

*स्त्रोत तक्ता क्र.१ प्रमाणे*

तक्ता क्र. ७ वरुन असे दिसते की, सन २००५-०६ च्या तुलनेत सन २००६-०७ मध्ये आणि २००७-०८ मध्ये शासनाच्या आदिवासी मुलींच्या शिष्यवृत्तीवरील खर्च घटला आहे. उदाहरणार्थ सन २००५-०६ मध्ये आदिवासी मुलीमधील गळती थांबविण्यासाठी ६३.१२ लाख रुपये शिष्यवृत्तीवर खर्च केले होते. सन २००६-०७ मध्येही रक्कम रु. ५३.०२ लाख रुपयापर्यंत तर २००७-०८ मध्ये ही रकम रु. ५५.०९ लाख रुपयापर्यंत घटली. तसेच शिष्यवृत्तीवर केलेल्या खर्चाचे शिष्यवृत्तीसाठी तरतूद केलेल्या रक्कमेची प्रमाण सन २००६-०७ मध्ये ८६.७० टक्के इतके आहे. सन २००५-०६ आणि २००७-०८ मध्ये हे प्रमाण अनुक्रमे ९९.८५ टक्केव ९७.०५ टक्के इतके आहे.

**व्यवसाय प्रशिक्षण योजना -**

आदिवासी बेरोजगार तरुणांना रोजगार मिळावा यासाठी शासनाने पुणे जिल्हयातील आंबेगांव तालुक्यातील गोहे बु. येथे व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरु केले आहे. या ठिकाणी शिलाई काम, सुतार काम, गवंडी काम, इलेक्ट्रीशियन, डिझेल मॅकेनिक, रेडिओ व टी.व्ही. कामाचे प्रशिक्ष्ण इ.व्यवसायासाठी चार महिने कालावधीसाठी प्रशिक्षण देण्यात येते. खालील तक्त्यात विविध वर्षात या प्रशिक्षणसाठी केलेल्या खर्चाची तरतूद आणि प्रत्यक्षात केलेला खर्च या बाबींची माहिती दिली आहे.

### तक्ता क्र.८

### व्यवसाय प्रशिक्षण योजनांवरील खर्च

| अ.क्र. | वर्ष | केलेली तरतूद (लाख रुपये) | केलेला खर्च (लाख रुपये) | केलेल्या खर्चाचे प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|
| १. | २००५-०६ | ३.३४ | ३.३४ | १०० |
| २. | २००६-०७ | ५.०० | ५.०० | १०० |
| ३. | २००७-०८ | १७.६५ | १४.८७ | ८४.२४ |

*स्त्रोत तक्ता क्र.१ प्रमाणे*

तक्ता क्र. ९ वरुन असे दिसते की, सन २००५-०६ च्या तुलनेत २००६-०७ आणि २००७-०८ मध्ये व्यवसाय प्रशिक्षण वरील खर्चासाठी केलेल्या तरतूदीमध्ये आणि प्रत्यक्ष खर्चामध्ये शासनाने मोठी वाढ केली आहे. सन २००७-०८ मध्ये व्यवसाय प्रशिक्षणसाठी केलेल्या खर्चाचे तरतूद केलेल्या रकमेशी प्रमाण ९४.२४ टक्के होते. तर २००५-०६ आणि २००६-०७ मध्ये हे प्रमाण १०० टक्के होते.

## ३.८ शेतजमीन खरेदीसाठी कर्ज आणि अनुदान

भूमीहिन आदिवासी शेतमजूर कुटुंबांना बागायती दोन एकर किंवा जिरायती चार एकर जमीन घेण्यासाठी ५० टक्के शासनाचे अनुदान व ५० टक्के बिनव्याजी कर्ज देण्यात येते. खालील तक्त्यात लाभार्थ्यांची संख्या आणि वाटप करण्यता आलेले क्षेत्र दर्शविले आहे.

### तक्ता क्र.-९

### शेतजमीन खरेदीसाठी कर्ज व अनुदान

| तपशील | २००५-०६ |
|---|---|
| आदिवासी लाभार्थ्यांची संख्या | ०३ |
| वाटप करण्यात आलेले क्षेत्र (एकर) | १० एकर १९ गुंठे |
| जमिनीची किंमत (रुपये) | २,९०,९१६ |

*स्त्रोत तक्ता क्र.१ प्रमाणे*

तक्ता क्र. ९ वरुन असे दिसते की, सन २००५-०६ या वर्षात शासनाने ०३ भूमीहिन आदिवासींना २,९०,९१६ रुपये किंमतीची १० एकर १९ गुंठे शेतजमीन ५० टक्के अनुदानावर आणि ५० टक्के बिनव्याजी कर्जावर दिली होती.

**ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजना**

आदिवासी वस्तीचे विद्युतीकरण, मार्ग दीप बसविणे, समाजमंदिर बांधणे, व्यायामशाळा बांधणे, मुख्य वस्तीपर्यत जोड रस्ते, बंद गटारे बांधणे, सार्वजनिक शौचकुप बांधणे इत्यादी सामूहिक विकासाच्या सुविधावर **ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा** कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र शासन खर्च करते. या योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या योजनांची आणि खर्चाची माहिती तक्ता क्र. १० मध्ये दिली आहे.

तक्ता क्र.१०

ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा अंतर्गत केलेला खर्च

| अ.क्र. | वर्ष | केलेली तरतूद (लाख रुपये) | केलेला खर्च (लाख रुपये) | कामाची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | २००७-०८ | ४०० | ४०० | ६१ |
| २. | २००८-०९ | २८३.२३ | २८३.२३ | ३२ |

*स्त्रोत तक्ता क्र.१ प्रमाणे*

तक्ता क्र.१० वरुन असे दिसते की, सन २००७-०८ मध्ये ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनांतर्गत ६१ कामावर ४ कोटी रुपये खर्च केले होते. तर २००८-०९ मध्ये ३२ कामावर २८३.२३ लाख रुपये खर्च केले होते. अशाप्रकारे २००७-०८ च्या तुलनेत २००८-०९ मध्ये शासनाने ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा अंतर्गत खूपच कमी कामे आहेत व खूपच कमी खर्च केला आहे.

**कन्यादान योजना**

आदिवासींना लग्नासाठी कर्ज काढावे लागू नये यासाठी शासनाने कन्यादान योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत एका जोडप्यास रु.१०००० पर्यंतची भांडी व मंगळसूत्र दिले जाते. सन २००४-०५ पासून या योजनेवर सरकारने खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

तक्ता क्र.११

कन्यादान योजनेतील सहभागी जोडप्यांची संख्या आणि त्यासाठी केलेला खर्च

| अ.क्र. | वर्ष | केलेली तरतूद (लाख रुपये) | केलेला खर्च (लाख रुपये) | कामाची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | २००४-०५ | २.६० | २.६० | २५ |

| अ.क्र. | वर्ष | केलेली तरतूद (लाख रुपये) | केलेला खर्च (लाख रुपये) | कामाची संख्या |
|---|---|---|---|---|
| २. | २००५-०६ | २.५० | २.५० | २४ |
| ३. | २००६-०७ | २.५० | २.५० | २४ |
| ४. | २००७-०८ | १२.०० | १२.०० | ११५ |
| ५. | २००८-०९ | ६०.०० | २.२० | ६०० |

*स्त्रोत तक्ता क्र.१ प्रमाणे*

तक्ता क्र.११ वरुन असे दिसते की, सन २००४-०५ च्या तुलनेत सन २००८-०९ मध्ये शासनाच्या कन्यादान योजनेत भाग घेतलेल्या जोडप्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे.

### ३.११ धान्य कोष योजना

शासनाने धान्य कोष योजना सन १९९५ पासून सुरु केली आहे. या योजनेचे प्रवेश शुल्क ५ ते १० रु. इतके नाममात्र आहे. सेवाभावी संस्था, ग्रामपंचायत, सहकारी संस्था यांच्या मदतीने धान्यकोष स्थापन करता येते. सन २००५-०६ या वर्षातील धान्य कोष योजनेची प्रगती तक्ता क्र.१२ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र.१२**

**धान्यकोष योजना**

| अ.क्र. | घटक/तपशील | संख्या किंमत इ. |
|---|---|---|
| १. | धान्यकोष संख्या | ०९ |
| २. | धान्यकोषाचे सभासद | ५२१ |
| ३. | धान्याचा प्रकार | तांदूळ |
| ४. | धान्य (क्विंटल) वाटप | ५२९.८६ क्विंटल |
| ५. | धान्याची किंमत रु. | ३,१७,९१४ |

*स्त्रोत तक्ता क्र.१ प्रमाणे*

तक्ता क्र.१२ वरुन असे दिसते की, सन २००५-०६ मध्ये धान्यकोषांची संख्या नऊ होती. या धान्यकोषांचे सभासद ५२१ होते व ३.१७,९१४ रु.किंमतीचे ५२९.८६ क्विंटल तांदूळ आदिवासींना वितरीत करण्यात आले होते.

### खावटी कर्ज योजना

गरीब आदिवासींची पावसाळ्यात उपासमार होऊ नये यासाठी शासनाकडून खावटी दिली जाते. या खावटीमध्ये धान्य, कडधान्य, गोडेतेल आणि रोख रक्कमेचा समावेश असतो. ही खावटी चार व्यक्तींच्या कुटुंबाला २००० रुपये आठ व्यक्तींच्या कुटुंबांला रु.३००० तर आठपेक्षा जास्त व्यक्तींच्या कुटुंबांना रु.४००० इतकी दिली जाते. तक्ता क्र. १४ मध्ये खावटी कर्ज वाटपाची माहिती दिली आहे.

तक्ता क्र. १३

खावटी कर्ज वाटप

| अ.क्र. | वर्ष | वस्तु स्वरुपात (लाख रुपये) | रोख स्वरुपात (लाख रुपये) | एकूण (लाख रुपये) |
|---|---|---|---|---|
| १. | २००६-२००७ | ३३.७४ | १४३.१८ | १७६.९२ |
| २. | २००७-२००८ | ६४.६२ | २७.५८ | ९२.२० |
| ३. | २००८-२००९ | २०.९३ | ८.९८ | २९.९२ |

*स्त्रोत तक्ता क्र.१ प्रमाणे*

तक्ता क्र.१३ वरुन असे दिसते की, सन २००६-२००७ च्या तुलनेत सन २००७-२००८ आणि २००८-२००९ मध्ये शासनाकडून आदिवासींना मिळणाऱ्या खावटी कर्जाच्या रक्कमेत खूपच घट झालेली आहे.

### विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या योजना

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) अंतर्गत/विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत आदिवासींच्या विकासासाठी विविध योजना राबविल्याजातात. उदा. घरकुले बांधणे, केरोसिन पंप पुरवठा, लघु उपसा जलसिंचन योजना, गांडुळ खत, मशरुम, नर्सरी, शिलाईकाम, द्रोण व पत्रावळी, वनौषधासाठी नर्सरी तयार करण्याचे प्रशिक्षण देणे, वीट भट्टीसाठी अर्थसहाय्य, आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतात शेवगा लागवड करणे, शेळी गटाचे वाटप, दुधाळ म्हशीचा पुरवठा, संकरित गाईंचा पुरवठा, एल.पी.जी. गॅस युनिटचा पुरवठा, डिझिटल फोटोग्राफीचे प्रशिक्षण तयार कपडे शिवण्याचे प्रशिक्षण, हवाई सुंदरीचे प्रशिक्षण, फिल्म ॲनिमेशन अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण, संगणक हार्डवेअर प्रशिक्षण, मोबाईल फोन दुरुस्तीचे प्रशिक्षण, कलाकसुरीचे दागिने बनविण्याचे प्रशिक्षण, घरगुती वायरिंग, पर्यटन व्यवसायाचे प्रशिक्षण, रिटेल मार्केटींग अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण, नवीन विहिरी खोदणे इत्यादी बाबीवर शासनाकडून खर्च केला जातो. खालील तक्त्यात विशेष केंद्रीय सहाय्य अंर्तगत राबविण्यात येत असलेल्या वरील विविध योजनावर शासनाने केलेल्या खर्चाची माहिती दिली आहे.

## तक्ता क्र.१४
## विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांवर शासनाने केलेला खर्च

| अ.क्र. | वर्ष | केलेली तरतूद (लाख रुपये) | केलेला खर्च (लाख रुपये) |
|---|---|---|---|
| १. | २००४-२००५ | १४८.०२ | १४८.०२ |
| २. | २००५-२००६ | ११३.७५ | १०२.७५ |
| ३. | २००६-२००७ | १७५.६० | १६१.९७ |
| ४. | २००७-२००८ | २३७.७६ | १८.८० |

*स्त्रोत तक्ता क्र.१ प्रमाणे*

तक्ता क्र.१४ वरुन असे दिसते की, २००५-२००५ पासून २००७-२००८ पर्यंत विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत राबविण्यात ये असलेल्या विविध योजनांवर मोठया प्रमाणात खर्च केला आहे.

## आदिवासी विकास योजनांचे मूल्यमापन

महाराष्ट्र शासना मार्फत आदिवासींच्या विकासासाठी वरीलप्रमाणे विविध योजना राबविलया जातात. या योजनांचे मूल्यमापन थोडक्यात खालीलप्रमाणे केले जाते.

## योजनांचे सुपरिणाम

शासनाकडून आदिवासींच्या विकासासाठी ज्या विविध योजना राबविल्या जातात त्याचे काही चांगले परिणाम दिसून येत असून ते थोडक्यात खालीलप्रमाणे दिले आहेत.

### १. दारिद्रय रेषेच्या वर येण्यास मदत

शासनाच्या आदिवासींच्या विकासाच्या विविध योजनामुळे काही आदिवासींचे दारिद्रय हटले असून ते दारिद्रय रेषेच्यावर आलेले आहेत.

### २. शेतीपूरक व्यवसायांचा विकास

शासनाने शेळीगट, दूधाळ म्हशी आणि संकरित गाईचा पुरवठा केल्याने आदिवासी भागात शेतीपूरक व्यवसायांचा विकास होण्यास मदत झालेली आहे.

### ३. रोजगारात वाढ

शासनाच्या विविध प्रशिक्षण योजनामुळे आदिवासी युवक-युवतीना नोक-या मिळत आहेत. त्यामुळे रोजगारवृध्दी घडून आली.

### ४. स्वयंरोजगार निर्मिती

मोबाईल दुरुस्ती, फोटोग्राफी, सुतारकाम इत्यादी विविध प्रकारचे प्रशिक्षण

शासनाकडून आदिवासी युवकांना विनामूल्य दिले जाते. त्यामुळे आदिवासी भागात स्वयंरोजगार निर्माण होण्यास मदत झालेली आहे. त्याचा फायदा संबधित आदिवासी कुटुंबाला होत आहे.

**५. उपासमारीचा कालावधी कमी**

अतिदुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींना आजही पुरेसे अन्न मिळत नाही. अशा आदिवासींना शासनाकडून खावटी कर्ज दिले जाते. तसेच त्यांच्यासाठी धान्यकोष योजना राबविली जाते. त्यामुळे उपासमारीचा कालावधी कमी होण्यास मदत झालेली आहे.

**६. गळतीचे प्रमाण कमी होण्यास मदत**

आदिवासी मुला-मुलींची शाळा कॉलेजमधील गळती थांबावी यासाठी उपस्थिती भत्ता तसेच इतर सवलती शासनाकडून पुरविल्या जातात. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यामधील गळतीचे प्रमाण कमी होत आहे.

**७. शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ**

महाराष्ट्र शासनाकडून आदिवासी शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी अनेक योजना राबविल्या जातात. त्यामुळे आदिवासी शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ घडून आलेली आहे.

**८. शिक्षणाच्या सोयीत वाढ**

आदिवासी भागात शैक्षणिक वकिास व्हावा यासाठी शासनाने आश्रमशाळा काढलेल्या आहेत, त्यामुळे आदिवासी भागात शिक्षणाच्या सोयीत वाढ घडून आलेली आहे.

**९. ओलिताखालील जमिनीच्या क्षेत्रात वाढ**

शासनाकडून आदिवासी भागात लघुजलसिंचनाच्या योजना राबविल्या आहेत. त्यामुळे आदिवासीच्या कोरडवाहू शेतीला पाणी मिळून वर्षात दोन-चार पिक घेता येणे शक्य झाले आहे.

**१०. साक्षरतेच्या प्रमाणात वाढ**

आदिवासी भागात बालवाडी, प्राथमिक व माध्यमिक शाळा, आश्रमशाळा यांची उभारणी शासनाने केल्यामुळे आदिवासी समाजातील साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे.

**११. कुपोषणाच्या प्रमाणात घट**

शासन आदिवासी भागात बाल विकासाच्या योजना राबवित असल्याने आणि दवाखान्याच्या सुविधा उपलब्ध करुन देत असल्याने पूर्वीच्या तुलनेत कुपोषणाचे प्रमाण खूपच कमी झाले आहे.

**१२. कुटुंबावरील मुलांचा बोजा कमी होण्यास मदत**

शासनाने आदिवासी भागात आश्रमशाळा, वसतिगृहे यांची सोय केली आहे. तसेच आदिवासी भागांच्या बाहेर मोठया शहरातही निवासी वसतिगृहाची सुविधा केली आहे. या वस्तीगृहात भोजनाची, राहण्याची, अंथरुण, पांघरुणाची, कपडयाची, शिक्षण खर्चाची मोफत सोय

शासनानोमार्फत केली जात असल्याने आदिवासी कुटुंबावरील मुलांच्या पालन पोषणाचा बोजा कमी होण्यास मदत झाली आहे.

### १३. आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत

शासन आदिवासींच्या विकासाठी अनेक योजना राबवित असून त्यापैकी बऱ्याचश्या योजना आदिवासी तरुणांना स्वावलंबी किंवा स्वतःच्या पायावर उभ्या राहण्यास उपयुक्त ठरत आहेत. या योजनामुळे आदिवासी तरुणामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला असून शासनाच्या मदतीने स्वावलंबी होण्याचा प्रयत्न ते करीत आहेत.

### १४. नक्षलवाद्यांचे आकर्षण नाही

प्रस्तुत ओयासकाने ठाणे, रायगड आणि पुणे जिल्हयातील आदिवासी भागात अनेक वर्षे नोकरीनिमित्त वास्तव्य केले असून तेथील आदिवासीमध्ये शासनाबद्दल असंतोष असल्याचे किंवा नक्षलवाद्यांबद्दल आकर्षण असल्याचे अजिबात जाणवले नाही.

### १५. आदिवसी मानवी भांडवलाचा विकास

आदिवासी मानवी भांडवलाचा किंवा मानवी साधन संपत्तीचा फारसा विकास झालेला नाही. आदिवासी मानवी भांडवलाचा दर्जा निकृष्ट आहे. परंतू आदिवासी तरुणांसाठी अभियांत्रिकी, वैद्यकीय, वास्तुशास्त्र, पशुवैद्यकीय, एम.बी.ए., एम.एस.डब्ल्यू., बी.एड., डी.एड. इत्यादी शिक्षण्एासाठी तसेच अन्य तांत्रिक शिक्षणाची सुविधा मोफत उपलब्ध करुन दिल्यामुळे हळू हळू आदिवासी मानवी भांडवलाचा विकास होण्यास मदत होत आहे.

### १६. आधुनिक दृष्टीकोन निर्माण होण्यास मदत

माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षणाच्या सुविधामुळे आणि काही आदिवासी युवकांना सैन्यदल, पोलीसदल, राज्य राखीव दल, औद्योगिक सुरक्षा दल इत्यादीमध्ये नोकऱ्या मिळाल्यामुळे त्यांच्यामध्ये सकारात्मक किंवा आधुनिक दृष्टीकोन निर्माण होण्यास मदत होत आहे.

### १७. पायाभूत सुविधांची निर्मिती

आदिवासी भागात रस्त्यासारख्या पायाभूत सुविधांची निर्मिती होत आहे. अनेक आदिवासींचे पाडे मुख्य रस्त्यांशी जोडले गेले आहत. अनेक ठिकाणी पक्के रस्ते निर्माण करण्याचे काम चालू आहे.

### १८. भूमिहीन आदिवासी मजूरांना जमिनीचे वाटप

भूमिहिन आदिवासी शेतमजूरांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे यासाठी उत्तम पिकाऊ जमीन खरेदी करण्यासाठी शासनाकडून ५० टक्के रक्कम बिनव्याजी व ५० टक्के रक्कम अनुदान म्हणून दिलेली आहे. त्याचा फायदा आदिवासी मजुरांनी घेतला आहे. त्यामुळे त्यांना स्वतःचे हक्कांचे, चरितार्थाचे साधन प्राप्त झाले आहे.

## १९. पिण्याच्या पाण्याची सोय

शासनाने आदिवासी भागात पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी हातपंप, बोअरिंग, जुन्या विहिरीची दुरुस्ती, विहिरीचे खोलीकरण, गाळ काढणे इत्यादी उपाययोजना केलेल्या आहेत. त्यामुळे आदिवासी गांवाना पिण्याच्या पाण्याची चांगली व्यवस्था झाली आहे.

## २०. रोगांच्या साथीचे नियंत्रण

शासनाने आदिवासी भागात आरोग्यविषयक सुविधांचे जाळे निर्माण केले असल्याने ग्रेस्ट्रो, मलेरिया इत्यादी रोगांच्या साथीस बऱ्याच प्रमाणात अटकाव झालेला आहे.

## विकास योजनांचे दोष उणिवा/टीका

आदिवासी विकासाच्या योजना आदिवासींसाठी उपयुक्त ठरत असल्या तरी या योजनांचे काही दोष सुध्दा आहेत. ते पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेले आहेत.

(१) शासकीय योजनामुळे आदिवासी समाजातील दारिद्रय काहीसे कमी झाले असले तरी संपूर्ण दारिद्रय हटलेले नाही. अद्याप बहुसंख्य आदिवासी गरीब आहेत.

(२) आदिवासींना पुरविल्या जाणाऱ्या शेळा, म्हशी, गाई यांना पोषक वातावरण आदिवासी भागात नाही. त्यामुळे आदिवासींना शासनाकडून देण्यात आलेली जनावरे दगावतात. या जनावरांकरिता पुरेसा चाराही आदिवासीकडे नाही. त्यामुळे फारच थोडे आदिवासी ही जनावरे शासनाकडून घेत असल्याचे दिसून आले.

(३) शासकीय योजनामुळे रोजगारात वाढ झाली असली तरी ही वाढ फारशी समाधानकारक नाही. सुशिक्षित बेरोजगार आदिवासी तरुण-तरुणीचे प्रमाण मोठे आहे.

(४) आदिवासींना भेडसावणारा प्रश्न अद्यापही टिकून आहे. कोरडवाहू शेतीचे मोठे प्रमाण, पूरक किंवा जोडधंद्याच्या विकासाला कमी वाव ही आदिवासींच्या उपासमारीची कारणे आहेत. अजूनही कित्येक आदिवासींना वर्षातील काही दिवस उपाशी, अर्धपोटी रहावे लागते.

(५) शासनाने आदिवासींच्या शैक्षणिक विकासासाठी मोठे प्रयत्न केले आहेत. तरीही गळतीचा प्रश्न अद्याप गंभीरच आहे. गळतीचे प्रमाण कमी झाले आहे. परंतू ते समाधानकारक नाही.

(६) बहुसंख्या आदिवासी कुटुंबांचा आकार अद्यापही मोठा आहे. शासन आदिवासींसाठी अनेक योजना राबवित आहे. तरी कुटुंबाचा आकार लहान ठेवण्यास बहुसंख्य आदिवासी उद्युक्त नाहीत.

## काही उपाय

शासनाच्या आदिवासी विकासाकरिता राबविण्यात येत असलेल्या योजना अत्यंत चांगल्या आहेत. या योजनामुळे आदिवासींना अधिकाधिक लाभ

व्हावा यासाठी प्रस्तुत अभ्यासकाने काही उपाय खालीलप्रमाणे सुचविले आहेत.

### (१) खर्चामध्ये वाढ करणे आवश्यक

आदिवासीं लोकसंख्येचा विचार करता विविध योजनांवर केला जाणारा खर्च अपुराच दिसतो. जास्तीत जास्त आदिवासींना योजनांचा लाभ व्हावा यासाठी शासनाने योजनांवरील खर्चात वाढ करणे आवश्यक आहे.

### (२) योजनांची अंमलबजावणी प्रामाणिकपणे आवश्यक

योजनांच्या अंमलबजावणीत काही कर्मचाऱ्याकडून भ्रष्टाचार होतो. गरीब आदिवासींना लाच मागण्यसारखे प्रकार होतात. त्यामुळे आदिवासींना शासकीय योजनाबद्दल आस्था वाटत नाही. म्हणून आदिवासींसाठी असलेल्या शासकीय योजनांची अंमलबजावणी प्रामाणिकपणे होणे आवश्यक आहे.

### (३) कर्जवाटपाकडे लक्ष देणे आवश्यक

आदिवासींना दिलेल्या कर्जाच्या वापराकडे लक्ष देणे आवश्यक आहे. काही आदिवासी शेळया-मेंढया न सांभाळता विकून किंवा खाऊन टाकतात, असे प्रस्तुत संशोधकाला सर्वेक्षणात आढळून आले. म्हणून आदिवासीना पैशाच्या अथवा वस्तुच्या स्वरुपात दिलेल्या कर्जाच्या वापरावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

### (४) दारिद्रय निर्मूलनावर भर देणे आवश्यक

अद्यापही आदिवासी समाजात दारिद्रयाचे प्रमाण मोठे आहे. आदिवासीमधील दारिद्रयाचे निराकरण होईल अशा प्रकारच्या योजना आखून या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे केली पाहिजे.

### (५) आदिवासी भागातच रोजगार निर्मितीस प्राधान्य

शासनाने शिक्षित, प्रशिक्षित आदिवासींना त्यांच्या भागातच नोकऱ्या कशा मिळतील हे पाहिजे पाहिजे. बिगर आदिवासी भागात बहुसंख्य आदिवासींना चांगली वागणूक मिळत नाही. त्यामुळे मिळालेल्या नोकऱ्या सोडून दिल्या जातात. म्हणून आदिवासी भागात विविध प्रकारचा रोजगार निर्माण होईल असे प्रयत्न शासनाकडून होणे आवश्यक आहे. तसेच बिगर आदिवासी भागात आदिवासींना संरक्षण मिळाले पाहिजे.

### (६) शिक्षणाचा दर्जा उंचावणे आवश्यक

पूर्वीच्या तुलनेत आदिवासी भागात शिक्षणाच्या सोयीत वाढ झाली असली तरी शिक्षणाचा गुणात्मक दर्जा कमीच आहे. अनेक शिक्षक मन लावून, प्रामाणिकपणे शिकवित नाहीत. शहराकड तसेच चांगल्या गांवात बदली करुन घेण्याच्या खटाटोपात ते असतात. म्हणून शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

* * *

# नक्षलग्रस्त क्षेत्रातील उच्चशिक्षित आदिवासी युवकांच्या समस्या आणि शासनाची भूमिका

* प्रा. सुनिल कोडापे

**प्रस्तावना :-**

विकासाच्या वाटचालीत शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व आहे. मग तो विकास व्यक्तीचा असो व समाजाचा असो. वाढ निसर्ग क्रमाने होत राहते. होता होता थांबते व संपतेही. विकास मात्र अखंडपणे होऊ शकतो. सातत्याने करत राहण्याची ही मानवनिर्मित प्रक्रिया आहे. त्याचं प्रयोजन व दृष्टी शिक्षणाने मिळू शकते. बालवाडीपासून पदव्युत्तर शिक्षणापर्यंत औपचारिक शिक्षण व्यवस्थेचे कार्याच्या सोयीसाठी टप्पे मानण्यात आले आहेत त्यात प्राथमिक शिक्षणाकडे अग्रक्रमाने लक्ष देण्याची गरज आहे. इमारतीचा पाया दोषमुक्त, कच्चा व दुर्लक्षित राहिला तर संपूर्ण इमारत कमकुवत व धोकादायक बनते हा सर्वसंमत सिध्दांत शिक्षणाला लागू पडतो. आपला देश स्वतंत्र होऊन चौसष्ट वर्षे झाली तरी लोकशाही व्यवस्थेत नागरिक हा पायाभूत घटक मानला जाणारा. तोच जर शिक्षणापासून वंचित राहिला तर त्याचे दुष्परिणाम समाजावर होतात. उच्चस्तरावर विविध क्षेत्रामध्ये नेत्रदिपक कार्य करणाऱ्या काही मूठभर व्यक्तीमुळे किंवा एका विशिष्ट क्षेत्राच्या यशामुळे भौतिक प्रगती होऊ शकली तरी समाजाच्या सांस्कृतिक स्थैयासाठी व सर्वकष विकासासाठी तळागाळातील नागरिकांचा विकास आवश्यक ठरतो. अन्यथा आहेरे व नाहीरे यांच्यातील दरी वाढत राहते. भारतीय संविधानाने स्विकारलेली मूल्य साकार होण्यासाठी पायाभूत अशा प्राथमिक शिक्षणाचा अपेक्षित संख्यात्मक विस्तार होणे व गुणात्मक विकास होणे अत्यावश्यक ठरते. समाजातील वंचितांची, आदिवासींची मुले यांची खऱ्या अर्थाने शंभर टक्के नोंदणी होणे ही शालेय शिक्षणाच्या अंतिम टप्प्यापर्यंत टिकून राहणे व त्यांना गुणवत्तापूर्ण उपयुक्त शिक्षण मिळणे ही काळाची गरज आहे.. शिक्षण ही व्यक्तीगत तसेच समाजाच्या स्तरावर व्यक्तीची गुणवत्ता उंचावणारी एक किल्ली आहे.

* सहाय्यक प्राध्यापक, बी. पी. नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ सोशल वर्क, नागपूर-०९

उत्तम गुणवत्तापूर्ण शिक्षण हे व्यक्तीला व समाजाला गतीमान मानवी विकासाच्या प्रक्रियेस शक्ती मिळवून देते. ते व्यक्तीची त्यांच्या स्वत:च्या त्यांच्या उपजिविकेच्या मिळकतीची क्षमता वाढविते. तसेच राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विकासात भर घालतो. शिक्षण ही व्यक्तीला साकाराकडून सदाकाराकडे वाटचाल करते ते शिक्षण. सगुणाकडून सदगुणाकडे घेऊन जाते ते शिक्षण. विकृतीकडून संस्कृतीकडे घेऊन जाते ते शिक्षण. प्रेयसाकडून श्रेयसाकडे घेऊन जायला मदत करते ते शिक्षण. मुक्त जीवनाकडून जीवनमुक्तीकडे जाण्याचा मार्ग दाखविते ते खरं शिक्षण.

शिक्षणापासून व्यक्तीचा विकास घडविता येतो. आणि व्यक्ती, कुटुंब, समाज यांचा विकास म्हणजे देशाचा विकास. देशाचा विकास अर्थात देशात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकांचा मग तो कुठल्याही जाती, धर्माचा, वंशाचा असेल. एक व्यक्ती म्हणून त्याला जीवन जगण्याचा अधिकार आहे. चांगले जीवन जगण्यासाठी व्यक्तीला आवश्यक असलेल्या गरजा, सोयी, सुविधा प्राप्त होणे महत्वाचे आहे. त्यासाठी व्यक्तीला स्वातंत्र्य, अधिकार आणि हक्क मिळाले पाहिजे. त्याला संधी मिळाली पाहिजे. तेव्हाच एखादी व्यक्ती आपले जीवन व्यवस्थित चालू शकते. देशाचा एक नागरिक म्हणून मिळालेले त्याचे अधिकार, हक्क तो तेव्हाच मागू शकतो. जेव्हा त्याला त्याची जाणीव आहे, माहिती आहे. शिक्षण हे व्यक्तीला आपल्या संपूर्ण जीवनाची ओळख करुन देतो. स्वत:मध्ये जाणीव जागृती निर्माण करण्याचे कार्य शिक्षणापासून होते. शिक्षणातून व्यक्तीला दिशा मिळते. एक विकासाचा मार्ग मिळतो. म्हणून भारतातील प्रत्येक नागरिकाला शिक्षण मिळाले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला दर्जेदार गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध असावे. शिक्षणातून केवळ लिहिता वाचता येणे म्हणजे शिक्षण ही कल्पनाच चुकीची आहे. शिक्षणातूनच विचार, आचार, ध्येय, साहस, समता प्राप्त झाली पाहिजे.

## अध्ययनाचे महत्व

भारतीय राज्य घटनेने भारतातील प्रत्येक नागरिकाला भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य बहाल केले आहे. घटनेच्या कलम १९ (घ) (क) नुसार भारताच्या राज्य क्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचा, कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य आहे. त्याचप्रमाणे कलम २१ अंतर्गत व्यक्तीचे जिवित किंवा व्यक्तीगत स्वातंत्र्य यापासून वंचित केले जाणार नाही असे स्पष्ट म्हटले आहे. प्रत्येक नागरिकाला जीवित राहण्याचा अधिकार आहे. काही कारणवश त्यावर परिस्थिती ओढावली तरी त्यापासून संरक्षण देण्याची जबाबदारी संघ राज्याची व संबधित राज्याची आहे. असे असताना

अति दुर्गम भागात वसलेल्या आदिवासींना हे अधिकार स्वातंत्र लागू झाले नाही ही खेदाची बाब हया ठिकाणी म्हणावी लागेल. आदिवासींच्या विकासाकरिता शासन प्रत्येक योजना निर्माण करुन त्या राबविण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यासाठी आदिवासींना लहानपणापासूनच शिक्षणाचे महत्व जाणवनू देणे आवश्यक आहे. त्याकरिता या विषयाची निवड संशोधकाने केलेली आहे.

**उद्देश**

१. युवकांची वैयक्तिक, कौटुंबिक व शैक्षणिक स्थिती जाणून घेणे.

२. युवकांच्या समस्या आणि वैयक्तिक विकासावर त्यांचा परिणाम जाणून घेणे.

३. युवकांच्या शैक्षणिक विकासाकरिता शासनाचे प्रयत्न आणि परिणामकता जाणून घेणे

४. युवकांची शासनाकडून अपेक्षा आणि पूर्ततावियषी मत जाणून घेणे.

**संशोधन प्रश्न**

- आदिवासी युवकांचे शिक्षण किती झाले आहे
- त्यांची मातृभाषा, बोलीभाषा कोणती आहे
- सद्यस्थितीत युवकांची दैंनदिनी कशी आहे.
- युवकाला भाषा वाचता, लिहिता व बोलता येतात
- युवकांचे व्यक्तीमत्व कसे आहे.
- युवकांची शैक्षणिक स्थिती कशी आहे.
- युवकांच्या कुटुंबात शिक्षणा प्रती काय आस्था आहे.
- युवकांच्या कुटुंबांत शिक्षणाचे प्रमाण किती आहे.
- युवकांच्या कुटुंबांचा मुख्य व्यवसाय काय आहे.
- युवकांकडून कुटुंबांच्या काय अपेक्षा आहेत.
- युवकांचे प्राथमिक शिक्षण कुठे झाले
- युवकांचे शिक्षणाचे माध्यम कोणते आहे.
- युवकांने कोणत्या वर्गापर्यंत शिक्षण घेतले आहे.
- उच्च शिक्षणाकरिता त्याला कोणी प्रोत्साहित केले.

- युवक सद्यस्थितीत काय करतो.
- उच्च शिक्षण घेतल्यानंतर काय करायचे ठरविले होत.
- शिक्षणाद्धारे त्याला काय अपेक्षित होते.
- युवकांना शिक्षण घेताना कोणत्या समस्या जाणवत होत्या.
- युवकांच्या वैयक्तिक कोणत्या व कशा समस्या आहेत.
- युवकांच्या कौटुंबिक समस्या कोणत्या व कशा आहेत.
- युवकांच्या सामाजिक समस्या कशा आहेत.
- युवकांच्या आर्थिक समस्या कशा आहेत.
- यवुकांची रोजगारविषयक समस्या कोणती आहे.
- युवकांच्या सर्व समस्यामुळे व्यक्तीमत्व विकासावर कोणता परिणाम होत आहे.
- युवकांच्या शैक्षणिक विकासाकरिता शासनाकडून कोणते प्रयत्न केले.
- शासनाकडून केलेल्या प्रयत्नांचा युवकांवर काय परिणाम झाला.
- युवकांच्या अपेक्षाची पूर्तता कशी करता येईल.

### उपकल्पना

१. आदिवासी युवकांचे व्यक्तीमत्व पुरेशा प्रमाणात विकसित नाही.

२. युवकांची कौटुंबिक स्थिती दयनीय अवस्थेत आहे.

३. शिक्षण पूर्ण झाले तरी त्याची उपयोगिता नाही.

४. युवकांना वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व रोजगार विषयक समस्या आहे.

५. युवकांच्या समस्यांचा त्यांच्या व्यक्तीमत्व विकासावर परिणाम होत आहे.

६. शासनाच्या प्रयत्नातून उच्चशिक्षित आदिवासी युवकांची संख्या वाढत आहे.

७. गुणवत्तापूर्ण व रोजगाराभिमुख्र शिक्षण मिळावे व सध्याच्या शैक्षणिक कार्यक्रमात बदल घडवून येणे आवश्यक आहे.

### संशोधन आराखडा

अध्ययनाचा हेतू लक्षात घेता संशोधनासाठी संशोधनात्मक व निदानात्मक संशोधन आराखडा वापरण्यात

आला. संशोधन विश्वाची व्याख्या व महत्व लक्षात घेता समस्यांची विस्तृत माहिती प्राप्त करुन त्यावर निदान काढावे लागत असल्याने शासनाने आदिवासींच्या शैक्षणिक विकासाकरिता सध्या आस्तित्वात असलेल्या धोरणाची व योजनांची माहिती प्राप्त करणे, त्यांच्या आदिवासींच्या शैक्षणिक विकासावर कसा परिणाम होत आहे हे बघत असताना आदिवासी विद्यार्थ्यांना कोणत्या समस्या निर्माण होत आहे, त्यांची सध्याची स्थिती कशी आहे, याची माहिती घेऊन शासनाच्या योजनेत काही बदल घडवून आणता येईल काय ? अशा प्रकारे हया समस्या कमी करता येईल. याकरिता प्रस्तुत अध्ययनाचे क्षेत्र, विश्व आणि नमुन्यांचा आधार कितपत राहील. अध्ययनाकरिता तथ्य कसे व कोठून गोळा करता येईल याविषयी माहिती आराखडयामध्ये ठरविण्यात आली.

### अध्ययनाचे क्षेत्र व विश्व

अध्ययनाचे क्षेत्र नागपूर हे ठरविण्यात आले. नागपूर शहर हे विभागीय कार्यालयाचे केंद्र असून अति दुर्गम नक्षलग्रस्त भागातून नागपूरमध्ये शिकण्यासाठी आलेले व नागपूरमध्ये आदिवासी विकास विभागाद्वारे चालविणारे चार वसतिगृहातील आदिवासी विद्यार्थी जे गडचिरोली, गोंदिया व भंडारा या तीन जिल्हयामधून आलेले आहेत ज्यांना आपले शिक्षण पूर्ण करुन नोकरी किंवा रोजगार मिळालेला नाही. अशा ५० विद्यार्थ्यांचा समावेश या संशोधनामध्ये केलेला आहे.

### तथ्य संकलन व प्रक्रियन

प्रस्तुत अध्ययनाकरिता आवश्यक माहिती आदिवासी विकास विभागाकडून आणि वसतिगृहातील विद्यार्थ्यांकडून प्राप्त करण्यात आली. विद्यार्थ्यांकडून मुलाखत अनुसूचिद्वारा प्रत्यक्ष भेटीमधून मिळविलेली आहे. नागपूर मधील चार वसतिगृहातील विद्यार्थी घेण्यात आले. विद्यार्थी निवडताना जे विद्यार्थी नक्षलग्रस्त व अति दुर्गम भागातील आहेत ज्यांना वसतिगृहात प्रवेश मिळालेला आहे आणि दुसरा गट असा निवडण्यात आला की, ज्यांचे पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण झालेले आहे आणि रोजगार मिळालेला नाही. परंतू माजी विद्यार्थी म्हणून वसतिगृहात राहतात, ज्यांच्याकडे रुम करुन राहण्याची सोय नाही, अशाही विद्यार्थ्यांकडून माहिती प्राप्त केली आहे. प्रस्तुत माहिती व्यवस्थित मांडणी करुन माहितीचे विश्लेषण आणि निष्कर्ष काढण्यात आलेले आहे.

### संशोधन निष्कर्ष

१. आदिवासी युवकांची वैयक्तिक योग्यता, क्षमता आणि पात्रता कमकुवत आढळली.

२. आदिवासी युवकांची कौटुंबिक स्थिती हलाखीची, मजबुरीची

आणि दयनीय अवस्था दिसून येते.

३. बहुसंख्य आदिवासी युवक हे द्वि पदवीधर आहेत.

४. सर्वच आदिवासी युवकांची मातृभाषा व बोलीभाषा माडिया व गोंडी आहे. बहुसंख्य युवक आश्रमशाळेतून प्राथमिक शिक्षण घेतलेले आहेत.

५. बहुसंख्य आदिवासी युवकांची राज्य राष्ट्रभाषा कमकुवत आहे.

६. बहुसंख्य आदिवासी युवकांना इंग्रजी व राष्ट्रभाषा लिहिण्याचा सराव नाही.

७. सर्व युवकांच्या कुटुंबियांची शिक्षणाप्रती चांगली प्रतिष्ठा आहे.

८. बहुसंख्य युवकांच्या कुटुंबियांचा शैक्षणिक स्तर हे अशिक्षित व प्राथामिक स्वरुपाचे आहे.

९. बहुसंख्य आदिवासी कुटुंबांचा व्यवसाय वनमजुरी व काही प्रमाणात शेती हा आहे.

१०. सध्याच्या स्थितीत सर्वच आदिवासी युवकांची स्थिती दयनीय आहे.

११. सर्वच युवकांना वैयक्तिक समस्या आहे. त्यात विशेषत: निवास, भोजन आणि अभ्यास साहित्य पुस्तक, इंटनरेट माहिती इ.

१२. सर्वच युवकांना रोजगार प्राप्ती व रोजगार मार्गदर्शनाची समस्या आहे.

१३. सर्वच युवकांना कौटुंबिक समस्या आहेत. विशेष म्हणजे त्यांचे गांव अति दुर्गम क्षेत्रात आहे. त्यामुळे त्यांना वारंवार जाता येत नाही. गेलेच तर मनमोकळेपणे फिरता येत नाही.

१४. सर्वच युवकांना शिक्षणापासून मिळाली जागृती घटनेने दिलेले अधिकार, हक्क उपभोगता येत नाही. त्यांच्या स्वातंत्र्याला वाव नाही. दुसरे महत्वाचे म्हणजे राज्य व केंद्र सरकार त्यांच्या जीवन रक्षणाची हमी देत नाही किंवा सुरक्षा पुरवू शकत नाही.

१५. बहुसंख्या आदिवासी युवक हे आपल्या मूळ गांवी जाण्याचे टाळतात. त्यामुळे आपल्या समूहापासून दूर राहतांना दिसतात.

१६. सर्वच युवकांना रोजगार विषयक समस्या आहेत, सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे

आणि स्पर्धा परीक्षा मध्ये हा युवक असफल होत आहे.

१७. सर्वच युवकांना शालेय शिक्षणाबरोबर स्पर्धा युगांचे ज्ञान हे साधन सामुग्री अभावी मिळाली नाही.

१८. सर्वच आदिवासी युवकांच्या समस्याचा त्यांच्या व्यक्तीमत्वावर परिणाम झाला आहे, प्राथमिक शिक्षणापासून भाषेची समस्या असल्याने त्यांच्या विचारांना चालना मिळालेली नाही.

१९. सध्याच्या वैयक्तिक व कौटुंबिक समस्यामुळे अभ्यासाकडे एकाग्रतेने पाहता येत नाही. आवश्क गरजा अन्न, वस्त्र, निवारा, प्राथमिक मूलभूत गरजा पूर्ण होत नाही. यवुकांचे पदवी, पदव्युत्तर शिक्षण झाले पण रोजगार नाही. शिक्षण पूर्ण झाल्याने वसतिगृहात प्रवेश नाही.

२०. अतिदुर्गम भागातील युवकांना पोलीसाची नोकरी मिळते ती ते करु शकत नाही. पोलीसाची नोकरी केली तर गांवातील त्यांचे कुटुंबं गांवात टिकू शकत नाही. अशा बिकट स्थितीत आदिवासी युवकांच्या समस्या त्यांच्या सर्वांगीण विकासाला मारक ठरत आहेत.

२१. युवकांना प्राथमिक शिक्षणासाठी आश्रमशाळा तर उच्च शिक्षणासाठी वसतिगृह चालविले जाते. परंतू उच्च शिक्षणानंतर काय ? हा प्रश्न युवकांपुढे आहे. एकात्मिक आदिवीस विकास प्रकल्पाद्वारे बेरोजगार युवकांसाठी विविध प्रशिक्षण दिले जाते. त्यात चौथी ते पदव्युत्तर शिक्षण घेतलेले युवक असतात. विशेष म्हणजे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग चालविले जातात. त्या वर्गात प्रवेशित विद्यार्थ्याला निवास, भोजन, अध्ययन व्यवस्था केली असते. त्यामुळे तो विद्यार्थी विभागीय किंवा जिल्हा स्तरावर राहू शकतो. प्रशिक्षणवर्ग त्याला पूर्ण करता येते.

२२. अति दुर्गम नक्षलग्रस्त भागातील आदिवासी युवकांच्या शासनाकडून अपेक्षा आहे, प्राथमिक स्तरावरुन शिक्षण हे राज्य भाषेसोबत मातृभाषा मधून घ्यावे. आश्रमशाळामध्ये अभ्यासा व्यतिरिक्त अवांतर वाचनासाठी

आधुनिक तंत्रज्ञानाचा साधन सामुग्रीचा वापर करुन सुसज्ज ग्रंथालयाची निर्मिती करावी. आश्रमशाळेमधून स्पर्धा परीक्षा, व्यक्तीमत्व विकासाचे मार्गदर्शन, व्यवसाय मार्गदर्शन विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन द्यावे जिल्हा व विभागीय स्तरावरील वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा, मार्गदर्शन वर्ग, व्यक्तीमत्व विकासवर्ग, वेगवेगळ्या परीक्षांची तयारी इ. बाबी वसतिगृहात असताना विद्यार्थ्यांना मिळावी तो एक अभ्यासक्रमाचा भाग म्हणून तशी अंदाजपत्रकात तरतूद करुन व उच्च शिक्षणाला रोजगारासंबंधी मार्गदर्शन तसेच पूरक व्यवस्था निर्माण करावी.

२३. वसतिगृहामध्ये शिक्षण पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना एक ते दोन वर्ष रोजगार प्राप्ती करिता मार्गदर्शन वर्ग, म्हणून वसतिगृहात प्रवेश ठेवावे व वसतिगृहाच्या सर्व सोयी सुविधा अशा विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन द्याव्यात. अति दुर्गम व नक्षलग्रस्त भागातील विद्यार्थ्यांकरिता ही योजना दोन वर्षे अधिक वाढवून द्यावी, जेणेकरुन आज समस्याग्रस्त असलेल्या युवकांना एक आधार मिळेल. आपले भावी जीवन चांगल्या प्रकारे घडवू शकेल. अशा आदिवासी युवकांच्या शासनाकडून अपेक्षा आहेत.

## सूचना व शिफारशी

१. शासनाने प्राथमिक स्तरावरील शिक्षणाकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. आश्रमशाळेच्या इमारतीमध्ये मुलांची निवासाची व्यवस्था, भोजनगृह, विद्यार्थी सभागृह, ग्रंथालय, ज्यामध्ये अभ्यासा व्यतिरिक्त पुस्तके असतील, जे सामान्य ज्ञान, स्पर्धा परीक्षा, वेगवेगळी शिष्यवृत्ती परीक्षा यांना उपयोगी पडेल असे पुस्तक ग्रंथालयात उपलब्ध असावे. तसेच त्यामध्ये संगणक व इंटरनेटची व्यवस्था असावी.

२. माध्यमिक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना असलेले तालुका, जिल्हा व विभागीय स्तरावरील वसतिगृह हे शासनाच्या स्वत:च्या मालकीच्या इमारतीमध्ये असावे. ज्यामध्ये ग्रंथालय, संगणक सेवा, इंटरनेट सेवा, वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांची पुस्तके उपलब्ध

असतील, निवास व्यवस्था ही विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाच्या दृष्टीने पोषक असेल. वसतिगृहाला स्वत:च्या मालकीची इमारत असावी.

३. शासनाने आदिवासींच्या मुलांकरिता केवळ पदवी अथवा पदव्युत्तर अभ्यासक्रम शिक्षणासाठी सोय केली आहे.

* * *

# महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या घराचा दर्जा

* प्रा डॉ. जयवंत शंकरराव इंगळे

## प्रास्ताविक

घराचा दर्जा आणि घरगुती वस्तू हे व्यक्तीच्या किंवा कुटुंबाच्या राहणीमानाचा दर्जा ठरविणारे महत्त्वाचे निकष आहेत, चांगल्या आर्थिक स्थितीतील कुटुंबांच्याच घराचा दर्जा चांगला असलेला आढळतो. तसेच अशा कुटुंबाकडे आधुनिक आणि सुखसोयीच्या वस्तूही पुरेशा प्रमाणात असतात. म्हणून आदिवासींच्या घराचा दर्जा आणि वस्तू यांचा अभ्यास केला. प्रस्तूत अभ्यासकाने ऑगस्ट २००८ मध्ये शिवाजी विद्यापीठास जो प्रबंध सादर केला, त्या प्रबंधासाठी मोखाडा तालुक्यातील आदिवासींची जी पाहणी केली त्या पाहणीवर आधारित हा शोधनिबंध आहे. आदिवासी बहुल आणि दुर्गम व अतिदुर्गम तालुका म्हणून ओळखला जाणाऱ्या मोखाडा तालुक्यातील विविध गावातील विविध सात जमातीतील ४२० आदिवासी कुटुंबाची त्यांच्या घरोघरी जाऊन मुलाखत पध्दतीने माहिती घेतली. त्या माहितीवर आधारित प्रस्तुतचा शोधनिबंध तयार केला आहे.

## आदिवासींच्या घराचा दर्जा-:

शोधनिबंधाच्या या भागात मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांच्या घरांचा प्रकार, घरातील जमिनीचा दर्जा, घरातील उपलब्ध सुखसोयी इत्यादी बाबींची माहिती दिली आहे.

## आदिवासींच्या घरांचे प्रकार-:

सर्व्हेक्षिण केलेल्या ४२० आदिवासी कुटुंबापैकी सर्व म्हणजे १०० टक्के कुटुंबे स्वत:च्या मालकीच्या घरात राहतात. आदिवासी ज्या घरात राहतात त्या घरांचा दर्जा किंवा घरांचे प्रकार खालील तक्त्यात दिले आहेत.

* प्राध्यापक - व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख आणि ॲसोशिएट प्रोफेसर, शरदचंद्र पवार कॉलेज, लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, कौलारु व सिमेंटच्या घरात राहणाऱ्या आदिवासी कुटुंबाचे सर्वाधिक प्रमाण महादेव कोळी या जमातीत असून ते ३२.२० टक्के आहे. तर सर्वात कमी प्रमाण कातकरी या जमातीत असून ते ५.०८ टक्के आहे.

**जमातीनुसार स्पष्टीकरण.**

**१. महादेव कोळी.**

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, महादेव कोळी जमातीत सर्वाधिक प्रमाण कौलारु व कुडाच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे असून ते ६०.०० टक्के आहे. त्या खालोखाल हे प्रमाण साधे छप्पर व कुडाच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे असून ते ३.३३ टक्के आहे. तर कौलारु व मातीच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ५.०० टक्के इतके आहे.

**२. ढोरकोळी.**

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, ढोरकोळी जमातीत कौलारु व कुडाच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण सर्वाधिक असून ते ६८.३३ टक्के आहे. तर सर्वात कमी प्रमाण कौलारु व मातीच्या घरात राहणाऱ्या कुटुंबाचे असून ते १.६७ टक्के आहे.

**३. कातकरी.**

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, कातकरी जमातीत सर्वाधिक प्रमाण कौलारु व कुडाच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे असून ते ७३.३३ टक्के आहे. तर साधे छप्पर व कुडाच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण २१.६७ टक्के आहे. या जमातीत कौलारु व मातीच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण शून्य आहे.

**४. वारली.**

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, वारली जमातीत सर्वाधिक प्रमाण कौलारु व कुडाच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे असून ते ६०.०० टक्के आहे. तर साधे छप्पर व कुडाच्या घरात राहाणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण २१.६७ टक्के आहे. या जमातीत कौलारु व मातीच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण शून्य आहे.

**५. कोकणा.**

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, कोकणा जमातीत सर्वाधिक प्रमाण कौलारु व कुडाच्या घरात राहणाऱ्य कुटुंबांचे असून ते ९०.०० टक्के आहे. तर कौलारु व सिमेंटच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ८.३३ टक्के आहे. साधे छप्पर व कुडाच्या घरात राहणाऱ्य कुटुंबांचे प्रमाण शून्य असून कौलारु व मातीच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण १.६७ टक्के आहे.

**६. म ठाकूर.**

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, म ठाकूर जमातीत सर्वाधिक प्रमाण कौलारु व कुडाच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे असून ते ५३.३३ टक्के आहे. तर साधे छप्पर व कुडाच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ३१.६७ टक्के आहे. या जमातीत सर्वात कमी प्रमाण कौलारु व मातीच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे असून ते ५.०० टक्के आहे.

## तक्ता क्रमांक १.१
## घरांच्या प्रकारानुसार आदिवासी कुटुंबांचे प्रमाण

| अ. क्र. | घराचे प्रकार | म.कोळी | ढोर कोळी | कातकरी | वारली | कोकणा | म ठाकूर | क ठाकूर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | साध छप्परे/ कुडाच | 02(3.07) (3.33) | 13 (20.00) (21.67) | 13 (20.00) (21.67) | 13 (20.00) (21.67) | 0 | 19 (29.23) (31.67) | 05 (7.70) (8.33) | 65(100 ) (15.48) |
| २ | कौलारु व कुडाचे | 36(12.5) (60.00) | 41(14.23 ) (68.33) | 44(15.2) (13.33) | 36(12.5 0) (60.00) | 54(18.7) (90.00) | 32(11.1) (53.33) | 45(15.63 )(75.00) | 288 (100) (68.58) |
| ३ | कौलारु व मातीचे | 03(37.50) (5.00) | 01(12.50 ) (1.67) | 0 | 0 | 01 (12.50) (1.67) | 03(37.5) (5.00) | 0 | 08(100 )(1.90) |
| ४ | कौलारु व सिमेंट | 19(32.20) (31.67) | 05(8.48) (8.33) | 03(5.08) (5.00) | 11(18.6 5) (18.33) | 05(8.48) (8.33) | 06(16.95) (16.67) | 10 (16.95) (16.67) | 59(100 ) (14.04) |
| | **एकूण** | **60(100)** | **60(100)** | **60(100)** | **60(100)** | **60(100)** | **60(100)** | **60(100)** | **420 (100)** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी कौलारु व कुडाचे घर असलेल्याकुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ६८.५८टक्के एवढे आहे. छप्पर (बिनकौलारु) व कुडाचे घर असलेल्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते १५.४८ टक्के इतके कौलारु व मातीचे घर असलेल्या कुटुंबांचे प्रमाण १.९० टक्के आहे. तर कौलारु व सिमेंटचे घर असलेल्या कुटुंबांचे प्रमाण १४.०४ टक्के आहे.

विविध जमातींचा तुलनात्मक दृष्टया विचार करता वरील तक्त्यावरुन असे दिसते की, साधे छप्पर/ कुडाचे घरात राहणाऱ्या कुटुंबाचे सर्वाधिक प्रमाण म ठाकूर या जमातीत असून ते २९.२३ टक्के आहे. त्या खालोखाल हे प्रमाण ढोरकोळी, कातकरी आणि वारली या जमातीत असून ते प्रत्येकी २०.०० टक्के आहे. छप्पर व कुडाच्या राहणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण कोकणा जमातीत शून्य आहे. महादेव कोळी जमातीत हे प्रमाण ३.०७ टक्के आहे.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, कौलारु व कुडाचे घर असलेल्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कोकणा या जमातीत असून ते १८.७६ टक्के आहे. क ठाकूर जमातीत हे प्रमाण १५.६३ टक्के, कातकरी जमातीत १५.२७ टक्के तर ढोरकोळी जमातीत ते १४.२३ टक्के आहे. म ठाकूर जमातीत हे प्रमाण सर्वात कमी असून ते ११.११ टक्के आहे.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, कौलारु व मातीच्या घरात राहणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे सर्वाधिक प्रमाण महादेव कोळी आणि म ठाकूर या जमातीत असून ते प्रत्येकी ३७.५० टक्के आहे. कातकरी, वारली आणि क ठाकूर या जमातीत असून ते प्रत्येकी ३७.५० टक्के आहे. कातकरी, वारली आणि क ठाकूर जमातीत हे प्रमाण शून्य आहे.

### ७. क ठाकूर

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, क ठाकूर जमातीत सर्वाधिक प्रमाण कौलारु व कुडाच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे असून ते ७५.०० टक्के आहे. तर कौलारु व सिमेंटच्या घरात राहणाऱ्य कुटुंबांचे प्रमाण १६.६७ टकके आहे. या जमातीत कौलारु व मातीच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण शुन्य आहे.

सारांश, वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सर्व्हेक्षित सर्व जमातीतील ४२० आदिवासी कुटुंबांपैकी कच्या किंवा साध्या घरात राहणाऱ्य कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ८५.९६ टक्के आहे. तर पक्या घरात राहणाऱ्य कुटुंबांचे प्रमाण अत्यल्प असून ते १४.०४ टक्के आहे.

## १.२ घरातील जमिनीचा दर्जा किंवा जमिनीचा प्रकार-

खालील तक्त्यात सर्व्हेक्षण केलेल्या ४२० आदिवासी कुटुंबांच्या घरातील जमीन कोणत्या प्रकाराची आहे याची माहिती.

**तक्ता क्रमांक :- १.२**

**घरातील जमिनीचा दर्जा**

| अ.क्र | जमातीचे नाव | घरातील जमीन मातीची व शेणाची असलेल्या कुटुंबांची संख्या व प्रमाण | घरात फरशी असलेल्या कुटुंबांची संख्या व प्रमाण | कुटुंबांची एकूण संख्या व प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | महादेव कोळी | ४९(८१.६७) (१२.०३) | ११(१८.३३) (८४.६२) | ६०(१००) |
| २ | ढोर कोळी | ६०(१००) (१४.७४) | ० | ६०(१००) |
| ३ | कातकरी | ६०(१००) (१४.७४) | ० | ६०(१००) |
| ४ | वारली | ६०(१००) (१४.७४) | ० | ६०(१००) |
| ५ | कोकणा | ६०(१००) (१४.७४) | ० | ६०(१००) |
| ६ | म ठाकूर | ६०(१००) (१४.७४) | ० | ६०(१००) |
| ७ | क ठाकूर | ५८(९६.६७) (१४.२५) | ०२(३.३३) (१५.३८) | ६०(१००) |
| | **एकुण** | **४०७(९६.९०) (१००)** | **१३(३.१०) (१००)** | **४२०(१००)** |

१. स्तंभ क्र.३ मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील जमीन मातीची व शेणाची असलेल्या जमातीतील सर्व्हेक्षिण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

२. स्तंभ क्र ४ मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका

जमातीतील घरात फरशी असलेल्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबाशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

३. स्तंभ क्र.३ मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील घरातील जमीन मातीची व शेणाची असलेल्या कुटुंबांचे सर्व्हेक्षित सर्व सात जमातींच्या घरातील जमीन मातीची व शेणाची असलेल्या एकूण ४०७ कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

४. स्तंभ क्र. ४ मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील घरात फरशीयुक्त जमीन असलेल्या कुटुंबांचे सर्व्हेक्षित सर्व सात जमातींच्या घरातील फरशीयुक्त जमीन असलेल्या एकूण १३ कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, घरातील जमीन मातीची व शेणाची असलेल्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ९६.९० टक्के इतके आहे. तर फरशीयुक्त जमीन असलेल्या कुटुंबांचे प्रमाण अत्यल्प असून ते ३.१० टक्के आहे.

विविध जमातींचा तुलनात्मक दृष्टया विचार करता वरील तक्त्यावरुन असे दिसते की, घरातील जमीन मातीची व शेणाची असलेल्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण ढोरकोळी, कातकरी, वारली, कोकणा आणि म ठाकूर या जमातीत असून ते प्रत्येकी १४.७४ टक्के आहे. त्याखालोखाल हे प्रमाण क ठाकूर या जमातीत असून ते १४.२५ टक्के आहे. जमीन मातीची व शेणाची असलेल्या कुटुंबाचं सर्वात कमी प्रमाण महादेव कोळी या जमातीत असून ते १२.०३ टक्के एवढे आहे.

घरातील जमीन फरशीयुक्त असलेल्या कुटुंबाचे सर्वात जास्त प्रमाण महादेव कोळी या जमातीत असून ते ८४.६२ टक्के आहे. क ठाकूर जमातीत हे १५.३८ टक्के आहे. ढोरकोळी, कातकरी, कोकणा आणि म ठाकूर या जमातीत फरशीयुक्त जमीन असलेल्या कुटुंबांचे प्रमाण शून्य आहे.

एकेका जमातीचा स्वंतत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरुन असे दिसते की, महादेव कोळी जमातीत जमीन मातीची व शेणाची असलेल्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ८१.६७ टक्के आहे. तर फरशीयुक्त जमीन असलेल्या कुटुंबांचे प्रमाण अत्यल्प असून १८.३३ टक्के आहे.

ढोरकोळी, कातकरी, वारली, कोकणा आणि म ठाकूर या जमातीत जमीन मातीची व शेणाची असलेल्या कुटुंबांचे प्रमाण १०० टक्के आहे. तर फरशीयुक्त जमीन असलेल्या कुटुंबांचे प्रमाण शून्य आहे.क ठाकूर जमातीत जमीन मातीची व शेणाची असलेल्या कुटुंबांचे प्रमाण ९६.६७ टक्के आहे. तर फरशीयुक्त जमीन असलेल्या कुटुंबांचे प्रमाण अत्यल्प असून ते ३.३३ टक्के आहे.

### ३. घरातील उपलब्ध सुखसोयी-

खालील विविध तक्त्यात सर्व्हेक्षण केलेल्या ४२० आदिवासी कुटुंबातील घरात आढळून आलेल्य सुखसोयींची माहिती खाली दिली आहे.

## ३.१ घरातील एकूण खोल्या

खालील तक्त्यात आदिवासी कुटुंबांच्या घरातील खोल्यांची माहिती दिली आहे.

### तक्ता क्रमांक ३.१
### घरातील एकूण खोल्या

| अ. क्र | जमातीचे नाव | ०१ खोली असणाऱ्या कुटुंबांची संख्या | ०२ खोल्या असणा | ०३ खोल्या असणाऱ्या कुटुंबांची संख्या | ४ खोल्या असणाऱ्या कुटुंबांची संख्या | ५ खोल्या असणाऱ्या कुटुंबांची संख्या | कुटुंबांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | महादेव कोळी | ० | ४९(८१.६७) (१४.४) | ०८(१३.३३) (२१.०५) | ०२(.३३) (५०.००) | ०१(१.६७) (५०.००) | ६०(१००) |
| २ | ढोर कोळी | ०८(१३.३३) (२९.६३) | ४९(८१.६७) (१४.०४) | ३(५.००) (७.९०) | ० | ० | ६०(१००) |
| ३ | कातकरी | ० | ५८(९६.६७) (१६.४) | २(३.३३) (५.२६) | ० | ० | ६०(१००) |
| ४ | वारली | ० | ५६(९३.३४) (१६.६२) | ३(५.००) (७.९०) | ०१(१.६६) (२५.००) | ० | ६०(१००) |
| ५ | कोकणा | ३(५.००) (११.११) | ५३(८८.३४) १५.१८ | ४(६.६६) (१०.५३) | ० | ० | ६०(१००) |
| ६ | म ठाकूर | ० | ५०(८३.३४) (१४.३३) | १०(१६.६६) (२६.३१) | ० | ० | ६०(१००) |
| ७ | क ठाकूर | १६(२६.६७) (५९.२६) | ३४(५६.६६) (९.७५) | ८(१३.३३) (२१.०५) | १(१.६७) (२५.००) | १(१.६७) (५०.००) | ६०(१००) |
| | **एकूण** | **२७(६.४३) (१००)** | **३४९(८३.१०) (१००)** | **३८(९.०५) (१००)** | **२(०.९५) (१००)** | **२(०.४७) (१००)** | **४२०(१००)** |

१. वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील घरातील खोल्यांच्या संख्येनुसार त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

२. खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील विशिष्ट खोल्यांच्या सर्व्हेक्षित सर्व सात जमातीतील त्याच एका विशिष्ट खोल्यांच्या संख्येनुसार असलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

वरील तक्यावरुन असे दिसते की, सर्व्हेक्षित सात जमातीतील ४२० कुटुंबांपैकी ज्या कुटुंबांतील घरात ०२ खोल्या आहेत अशा कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ८३.१० टक्के आहे. १ खोली असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ६.४३ टक्के आहे. ०३ खोल्या आसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ९.०५ टक्के आहे.घरात ०४ खोल्या असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ०.९५ टक्के तर ०५ खोल्या असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ०.४७ टक्के आहे वरील तक्त्यावरुन असे दिसते की,

ज्यांच्याकडे १ ते २ खोल्यांचे घर आहे अशा कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ८९.५३ टक्के आहे. तर ०३ ते ५ खोल्या असणाऱ्या घरांचे किंवा कुटुंबाचे प्रमाण १०.४७ टक्के इतक अत्यल्प आहे.

विविध जमातींचा तुलनात्मक दृष्टया विचार करता वरील तक्त्यावरुन असे दिसते की, एका खोलीचे घर असलेल्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण क ठाकूर या जमातीत असून ते ५९.२६ टक्के आहे. ढारेकोळी जमातीत हे प्रमाण २९.६३ टक्के आहे. महादेव कोळी, कातकरी, वारली आणि म ठाकूर या जमातीत एका खोलीच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण शून्य आहे.

दोन खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कातकरी या जमातीत असून ते १६.६२ टक्के आहे. त्याखालोखाल हे प्रमाण वारली (१६.०४ टक्के) कोकणा (१५.१८ टक्के) आणि म ठाकूर (१४.५३ टक्के) या जमातीत आहे. ०२ खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबांचे सर्वात कमी प्रमाण क ठाकूर जमातीत असून ते ९.७५ टक्के आहे.

वरील तक्यावरुन असे दिसते की, ०३ खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त म ठाकूर या जमातीत असून ते २६.३१ टक्के आहे. त्या खालोखाल हे प्रमाण महादेव कोळी आणि क ठाकूर या जमातीत आहे (२१.०५ टक्के) ०३ खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबांचे सर्वात कमी प्रमाण कातकरी या जमातीत असून ते ५.२६ टक्के आहे.

०४ खोल्यांचे घर असणाऱ्य कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण महादेव कोळी या जमातीत असून ते ५०.०० टक्के आहे. तर ढोरकोळी, कातकरी, कोकणा आणि म ठाकूर या जमातीत हे प्रमाण शून्य आहे.

महोदव कोळी आणि क ठाकूर या जमातीत ०५ खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबांची संख्या प्रत्येकी ०१ इतकी आहे.तर ढोरकोळी,कातकरी,वारली,कोकणा आणि म ठाकूर या जमातीत ०५ खोल्यांचे घर असणाऱ्य कुटुंबांचे प्रमाण शून्य आहे.

**जमातीनुसार स्पष्टीकरण -**

**१. महादेव कोळी.-**

एकेका जमतीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरुन असे दिसते की, महादेव कोळी जमातीत ०२ खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण मोठे असून ते ८१.६७ टक्के आहे. ०४ खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ३.३३ टक्के तर ०५ खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण १.६७ टक्के आहे. या जमातीत एका जमातीत एका खोलीचे घर असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण शून्य आहे.

**२. ढोरकोळी.**

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, ढोरकोळी जमातीत ०२ खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ८१.६७ टक्के आहे. ०१ खोलीचे घर असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण १३.३३ टक्के आहे. ०३ खोल्यांचे घर असणाऱ्य कुटुंबांचे प्रमाण ५.०० टक्के आहे. या जमातीत ०४

आणि ०५ खोल्यांचे घर असणाऱ्य कुटुंबांचे प्रमाण शून्य आहे.

### ३. कातकरी.

कातकरी जमातीत ०२ खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ९३.३४ टक्के आहे. ०३ खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ३.३३ टक्के आहे. ०१ खोली ०४ खोल्या आणि ०५ खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण कातकरी जमातीत शून्य आहे.

### ४. वारली.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की,वारली जमातीत ०२ खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ९३.३४ टक्के आहे. ०३ खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ५.०० टक्के आहे. तर ०४ खोल्या असणाऱ्य कुटुंबांचे प्रमाण १.६६ टक्के आहे. ०१ खोली आणि ०५ खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण शून्य आहे.

### ५. कोकणा.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, कोकणा जमातीत ०२ खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ८८.३४टक्के आहे.०३खोल्यांचे घर असणाऱ्य कुटुंबांचे प्रमाण ६.६६ टक्के आहे. तर ०१ खोलीचे घर असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ५.०० टक्के आहे. या जमातीत ०४ आणि ०५ खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण प्रत्येकी शून्य आहे.

### ६. म ठाकूर

वरील तक्त्यावरुन असे दिसते की,म ठाकूर जमातीत ०२ खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ८८.३४ टक्के आहे. तर ०३ खोल्यांच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण १६.६६ टक्के आहे. ०१ खोली, ०४ खोल्य आणि ०५ खोल्यांच्या घरात राहणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण या जमातीत शून्य आहे.

### ७. क ठाकूर

वरील तक्त्यावरुन असे दिसते की,क ठाकूर जमातीत ०२ खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ५६.६६ टक्के आहे. ०४ खोल्या आणि ०५ खोल्यांचे घर असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अत्यल्प असून ते प्रत्येकी १.६७ टक्के एवढे आहे.

### १.१३.२ स्वयंपाकाची व्यवस्था -:

खालील तक्त्यात सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांच्या घरातील स्वयंपाक घर स्वंतत्र आहे की खोलीतच एका बाजूला आहे याची माहिती दिली आहे.

## स्वयंपाकाची व्यवस्था

| अ.क्र | जमातीचे नाव | स्वयंपाकाची स्वतंत्र व्यवस्था असलेल्या कुटूंबाची संख्या | स्वयंपाकाची व्यवस्था खोलीतच एका बाजूला असलेल्या कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षित कुटुंबांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | महादेव कोळी | ० | ६० | ६० |
| २ | ढोरकोळी. | ० | ६० | ६० |
| ३ | कातकरी. | ० | ६० | ६० |
| ४ | वारली. | ० | ६० | ६० |
| ५ | कोकणा. | ० | ६० | ६० |
| ६ | म ठाकूर | ० | ६० | ६० |
| ७ | क ठाकूर | ० | ६० | ६० |
| | **एकूण** | **०** | **४२०(१००)** | **४२०(१००)** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी एकाही कुटुंबातील घरात स्वयंपाकाची स्वतंत्र व्यवस्था नाही. सर्व ४२० आदिवासी कुटुंबे खोलीतच किंवा घरातच एका बाजूस स्वयंपाक करतात. स्वतंत्र असे स्वयंपाक घर एकाही कुटुंबाजवळ नाही. स्वयंपाक चालू असताना किंवा झाल्यानंतर तेथेच आदिवासी विश्रांती घेतात किंवा झोपण्यासाठी त्या जागेचा वापर करतात. स्वयंपाक घरात धान्य, भांडी, कोंबडयांची डालगी इत्यादी वस्तूसुध्दा एका बाजूला असतात.

### १.१.३.३ स्नानगृहाची व्यवस्था

खालील तक्त्यात किती आदिवासी कुटुंबाकडे कयाप्रकारची स्नानगृहाची व्यवस्था आहे, याची माहिती दिली आहे. ---

## तक्ता क्रमांक ३.३
## स्नानगृहाची व्यवस्था

| अ.क्र | जमातीचे नाव | घरात अंघोळीची व्यवस्था असणाऱ्या कुटुंबांची संख्या | घराच्या बाहेर अंघोळीची व्यवस्था असणाऱ्या कुटुंबांची संख्या | घरात आणि बाहेर आंघोळीची व्यवस्था असणाऱ्या कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षित कुटुंबांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | महादेव कोळी | १६(२६.६७)<br>(३२.६६) | ४४(७३.३३)<br>(१८.१८) | ० | ६०(१००) |
| २ | ढोरकोळी. | ० | ६०(१००)<br>(२४.८०) | ० | ६०(१००) |
| ३ | कातकरी. | ० | २१(३५.००)<br>(८.६८) | ३९(६५.००)<br>(३०.६२) | ६०(१००) |
| ४ | वारली. | ० | ११(१८.३३) | ४९(८१.६७) | ६०(१००) |

| अ.क्र | जमातीचे नाव | घरात अंघोळीची व्यवस्था असणाऱ्या कुटुंबांची संख्या | घराच्या बाहेर अंघोळीची व्यवस्था असणाऱ्या कुटुंबांची संख्या | घरात आणि बाहेर आंघोळीची व्यवस्था असणाऱ्या कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षित कुटुंबांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | | (४.५४) | (३७.९९) | |
| ५ | कोकणा. | २०(३३.३३) (४०.८२) | २४(४०.००) (९.४२) | १६(२६.६७) (१२.४०) | ६०(१००) |
| ६ | म ठाकूर | ०२(३.३३) (४.०८) | ३३(५५.००) (१३.६४) | २५(४१.६७) (१९.३८) | ६०(१००) |
| ७ | क ठाकूर | ११(१८.३३) (२२.४४) | ४९(८१.६७) (२०.२४) | ० | ६०(१००) |
| | एकूण | ४९(११.६७) (१००) | २४२(५७.६२) (१००) | १२९(३०.७१) (१००) | ४२०(१००) |

१. वरील कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील आंघोळीची विशिष्ट व्यवस्था असलेल्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील आंघोळीची सर्व प्रकारची व्यवस्था असलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

२. खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील आंघोळीची विशिष्ट व्यवस्था असलेल्या कुटुंबांचे सर्व्हेक्षित सर्व जमातीतील आंघोळीची तीच विशिष्ट व्यवस्था असलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी ५७.६२ टक्के कुटुंबे घराच्या बाहेर आंघोळ करतात. घरात अंघोळ करण्याची व्यवस्था किंवा सुविधा त्यांच्याकडे नाही. घरात आंघोळीची सुविधा असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ११.६७ टक्के आहे. तर ३०.७१ टक्के कुटुंबे घरातही आंघोळ करतात आणि बाहेर आंघोळ करतात. प्रामुख्याने पावसाळयात ही कुटुंबे घरात आंघोळ करतात. एरवी बाहेर आंघोळ केली जाते. अतिगरीब कुटुंबांना पावसाळयातही घराबाहेर आंघोळ करावी लागते. ज्यांच्याकडे घरात आंघोळीची सुविधा आहे त्या कुटुंबातील प्रामुख्याने स्त्रिया घरात आंघोळ करतात आणि लहान मुले व पुरुष बाहेर आंघोळ करतात. बाहेर आंघोळीची व्यवस्था फारशी चांगली नसते. विशिष्ट प्रकारच्या लांबट काटक्या जमिनीत रोवून आडोसा केला जातो व तेथे आंघोळ केली जाते.

वरील जमातींचा तुलनात्मकदृष्टया विचार करता वरील तक्त्यावरुन असे दिसते की, घरातच एका बाजूला आंघोळीची व्यवस्था असणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कोकणा या जमातीत असून ते ४०.८२ टक्के आहे. त्या खालोखाल हे प्रमाण महादेव कोळी जमातीत आहे. (३२.६६ टक्के) कातकरी, वारली या जमातीत हे*

प्रमाण ढोरकोळी या जमातीत असून ते २४.८० टक्के आहे. त्या खालोखाल हे प्रमाण क ठाकूर (२०.२४ टक्के) आणि महादेव कोळी (१८.१८ टक्के) या जमातीत आहे. घराबाहेर आंघोळ करणाऱ्या कुटुंबांचे सर्वात कमी प्रमाण वारली या जमातीत असून ते ४.५४ टक्के आहे.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, घरात आणि घराच्या बाहेर अंघोळीची व्यवस्था असणाऱ्य कुटुबांचे प्रमाण वारली या जमातीत मोठे असून ते ३७.९९ टक्के आहे. त्या खालोखाल हे प्रमाण कारकरी या जमातीत आहे (३०.२३ टक्के) महादेव कोळी, ढोरकोळी आणि क ठाकूर या जमातीत हे प्रमाण शून्य आहे.

**जमातीनुसार स्पष्टीकरण :-**

**१. महादेव कोळी -**

एकेका जमातीचा स्वंतत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरुन असे दिसते की, महादेव कोळी जमातीत सर्वात मोठे प्रमाण घराच्या बाहेर आंघोळ करणाऱ्या कुटुंबांचे आहे (७३.३३ टक्के). तर घरात आंघोळीची व्यवस्था असणाऱ्य कुटुंबांचे प्रमाण अत्यल्प असून ते २६.६७ टक्के आहे.

**२. ढोरकोळी -**

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, ढारेकोळी जमातीतील सर्व कुटुंबे घराच्या बाहेर आंघोळ करतात. घरात आंघोळीची व्यवस्था असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण शून्य आहे.

**३. कातकरी -**

कातकरी जमातीत घरात आणि बाहेर आंघोळ करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ६५ टक्के आहे. तर केवळ बाहेर आंघोळ करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ३५.०० टक्के आहे. कातकरी जमातीत घरात आंघोळीची व्यवस्था असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण शून्य आहे.

**४. वारली -**

वारली जमातीत घरात आणि बाहेर आंघोळ करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण मोठे आहे (८१.६७ टक्के) घराबाहेर आंघोळीची व्यवस्था असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण १८.३३ टक्के आहे. तर घरात आंघोळीची व्यवस्था असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण शून्य आहे.

**५. कोकणा -**

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, कोकणा जमातीत घराच्या बाहेर अंघोळ करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ४०.०० टक्के आहे. घरातच अंघोळीची व्यवस्था असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ३३.३३ टक्के आहे. तर घरात आणि बाहेर आंघोळ करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण २६.६७ टक्के आहे.

**६. म ठाकूर -**

म ठाकूर जमातीत घराच्या बाहेर आंघोळ करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ५५.०० टक्के आहे. घरात आणि बाहेर आंघोळीची व्यवस्था असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ४१.६७ टक्के आहे. तर केवळ घरात आंघोळीची सोय असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ३.३३ टक्के आहे.

**७. क ठाकूर -**

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, क ठाकूर जमातीत घराच्या बाहेर आंघोळ करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ८१.६७ टक्के आहे.घरात आंघोळीची व्यवस्था असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण अत्यल्प असून ते ८.३३ टक्के आहे.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, बहुसंख्य आदिवासी बाहेर आंघोळ करणे पसंत करतात. गरीबीमुळे घरात स्वतंत्र स्नान व्यवस्था निर्माण करण्याची ऐपत त्यांच्यात नाही.

## ३.४ शौचालयाची सुविधा -

खालील तक्त्यात किती आदिवासी कुटुंबाकडे संडासाची व्यवस्था आहे याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक ३.४**

**शौचालयाची सुविधा**

| अ.क्र | जमातीचे नाव | स्वतःच्या मालकीचे संडास असणाऱ्य कुटुंबांची संख्या | संडास नसल्याने माळावर किंवा उघडयावर शौचास जाणाऱ्या कुटुंबांची संख्या | कुटुंबांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | महादेव कोळी | ०२(३.३३) (४०.००) | ५८(९६.६७) (१३.००) | ६०(१००) |
| २ | ढोरकोळी. | ० | ६०(१००) (१४.४५) | ६०(१००) |
| ३ | कातकरी. | ० | ६०(१००) (१४.४५) | ६०(१००) |
| ४ | वारली. | ० | ६०(१००) (१४.४५) | ६०(१००) |
| ५ | कोकणा. | ० | ६० (१००) (१४.४५) | ६०(१००) |
| ६ | म ठाकूर | ० | ६०(१००) १४.४५ | ६०(१००) |
| ७ | क ठाकूर | ०३(५.००) (६०.००) | ५७(९७.००) १३.७३ | ६०(१००) |
| | **एकूण** | **०५(१.१९)** | **४१५(९८.८१)** | **४२०(१००)** |

१. स्तंभ क्र ३ मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील स्वतःच्या मालकीचे संडास असणाऱ्या कुटुंबाचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

२. स्तंभ क्र ४ मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील स्वतःच्या मालकीचे संडास

नसणाऱ्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

३. स्तंभ क्र ३ मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील स्वतःच्या मालकीचे संडास असणाऱ्या एकूण ०५ कुटुंबाची असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

४. स्तंभ क्र ४ मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील स्वतःच्या मालकीचे संडास नसणाऱ्या कुटुंबांचे सर्व्हेक्षण केलेल्या सर्व जात जमातीतील स्वतःच्या मालकीचे संडास नसलेल्या एकूण ४१५ कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, स्वतःच्या मालकीचे संडास असणाऱ्या कुटुंबांचे शेकडा प्रमाण १.१९ टक्के एवढे अल्प आहे. तर माळावर, उघडयावर किंवा शेतात शौचाला जाणाऱ्यांचे प्रमाण ९८.८१ टक्के एवढे मोठे आहे. गरीबीमुळे आणि घराच्या जवळ शौचालय बांधणे आवडत नसल्याने, शौचालयासाठी रोज पुरेसे पाणी वापरता येत नसल्याने (पाण्याची काही महिने टंचाई असल्याने) आदिवासी शौचासाठी बाहेर उघडयावर जाणे पसंत करतात, तसेच गरीब आदिवासींना शौचालय बांधण्यासाठी जागा नसल्याने शासनाने मदत केली तरी ते शौचालय बांधू शकत नाहीत. तसेच काही आदिवासी आजही शौचासाठी पाण्याचा वापर करत नाहीत. तसेच ज्यांच्याकडे शौचालये आहेत त्या कुटुंबातील काही सदस्य बाहेर उघडयावर शौचास जातात असे आढळून आले.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, ढोरकोळी, कातकरी, वारली, कोकणा, म ठाकूर या जमातीतील एकाही कुटुंबांकडे स्वतःच्या मालकीचा संडास नाही. महोदव कोळी व क ठाकूर या जमातीतील अनुक्रमे ०२ आणि ०३ कुटुंबांकडे स्वतःच्या मालकीचे संडास आहेत. हे प्रमाण अत्यंत अल्प आहे.

### ३.५ सांडपाणी व्यवस्था.

खालील तक्त्यात किती आदिवासी कुटुंबांकडे घरातील सांडपाणी आणि जनावरांचे मलमूत्र बाहेर जाण्याची व्यवस्था आहे आणि किती कुटुंबाकडे अशी व्यवस्था समाधानकारक नाही याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक ३.५**

**सांडपाणी व्यवस्था**

| अ.क्र | जमातीचे नाव | सांडपाण्याची व्यवस्था असणाऱ्या कुटुंबांची संख्या | सांडपाण्याची व्यवस्था नसणाऱ्या कुटुंबांची संख्या | कुटुंबांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | महादेव कोळी | ०२(३.३३) (६६.६७) | ५८(९६.६७) (१३.९०) | ६०(१००) |
| २ | ढोरकोळी. | ० | ६०(१००) (१४.३८) | ६०(१००) |

| अ.क्र | जमातीचे नाव | सांडपाण्याची व्यवस्था असणाऱ्या कुटुंबांची संख्या | सांडपाण्याची व्यवस्था नसणाऱ्या कुटुंबांची संख्या | कुटुंबांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|
| ३ | कातकरी. | ० | ६०(१००) (१४.३८) | ६०(१००) |
| ४ | वारली. | ० | ६०(१००) (१४.१४) | ६०(१००) |
| ५ | कोकणा. | ०१(१.६७) (३३.३३) | ५९(९८.३३) (१४.१४) | ६०(१००) |
| ६ | म ठाकूर | ० | ६०(१००) (१४.३८) | ६०(१००) |
| ७ | क ठाकूर | ० | ६०(१००) (१४.३८) | ६०(१००) |
| | **एकूण** | **०३(०.७१) (१००)** | **४१७(९९.२९) (१००)** | **४२०(१००)** |

१. स्तंभ क्रमांक ३ मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील सांडपाण्याची व्यवस्था असणाऱ्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्य एकूण कुटुंबाशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

२. स्तंभ क्रमांक ४ मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील सांडपाण्याची व्यवस्था नसणाऱ्या कुटुंबाचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

३. स्तंभ क्रमांक ३ मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील सांडपाण्याची व्यवस्था असणाऱ्या कुटुंबांचे सर्व्हेक्षण केलेल्या सर्व सात जमातीतील सांडपाण्याची व्यवस्था असणाऱ्या एकूण ०३ कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

४. स्तंभ क्रमांक ४ मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील सांडपाण्याची व्यवस्था नसणाऱ्या कुटुंबांचे सर्व्हेक्षण केलेल्या सर्व सात जमातीतील सांडपाण्याची व्यवस्था नसणाऱ्य एकूण ४१७ कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सर्व्हेक्षण केलेल्या ४२० आदिवासी कुटुंबांपैकी केवळ ०३ कुटुंबाकडे म्हणजे ०.७१ टक्के कुटुंबाकडे सांडपाण्याची चांगली व्यवस्था आहे.तर बहुसंख्य म्हणजे ९९.२९ टक्के कुटुंबाकडे सांडपाण्याची व्यवस्था चांगली नाही. खरकटे पाणी, अंघोळीचे पाणी आणि जनावरांचे मलमूत्र बाहेर गटारातून जाण्याची व्यवस्था नाही. हे सर्व सांडपाणी झोपडीच्या बाहेरच मुरवले जाते. पावसाळयात जनावरे घरातच बांधली जात असल्याने घरातील व बाहेर साठलेल्या मलमूत्राने आणि पावसाने घराच्या बाहेरच्या

बाजूला दलदल होते.दुर्गंधी पसरते. त्यामुळे डास, गोचिड निर्माण होतात. लहानांपासून मोठया व्यक्तीपर्यंत सर्वाचे आरोग्य बिघडते.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सर्व्हेक्षित सात जमातीपैकी महोदव कोळी आणि कोकणा या जमातीतील अनुक्रमे ०२ आणि ०१ कुटुबांकडे सांडपाण्याची व्यवस्था आहे. तर ढोरकोळी, कातकरी, वारली, म ठाकूर आणि क ठाकूर या जमातीतील एकाही कुटुंबांकडे सांडपाण्याची व्यवस्था नाही.

## ३.६ वीज सुविधा -

खालील तक्त्यात किती आदिवासी कुटुंबांच्या घरात वीज सुविधा आहे याची माहिती दिली आहे.-

**तक्ता क्रमांक ३.६**

**वीज सुविधा असणाऱ्या व नसणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण**

| अ.क्र | जमातीचे नाव | सांडपाण्याची व्यवस्था असणाऱ्या कुटुंबांची संख्या | सांडपाण्याची व्यवस्था नसणाऱ्या कुटुंबांची संख्या | कुटुंबांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | महादेव कोळी | ४४(७३.३३) (२१.६०) | १६(२६.६७) (७.५८) | ६०(१००) |
| २ | ढोरकोळी. | १३(२१.६७) (६.२३) | ४७(७८.३३) (७.५८) | ६०(१००) |
| ३ | कातकरी. | २७(४५.००) (१२.९२) | ३३(५५.००) (१५.६४) | ६०(१००) |
| ४ | वारली. | ३३(५५.००) (१५.७८) | २७(४५.००) (१२.८०) | ६०(१००) |
| ५ | कोकणा. | ४४(७३.३३) (२१.०६) | १६(२६.६७) (७.५८) | ६०(१००) |
| ६ | म ठाकूर | ३४(५६.६७) (१६.२६) | २६(४३.३३) (१२.३३) | ६०(१००) |
| ७ | क ठाकूर | १४(२३.३३) (६.६९) | ४६(७६.६७) (२१.८०) | ६०(१००) |
| | **एकूण** | **२०९(४९.७६)** | **२११(५०.२४)** | **४२०(१००)** |

१. स्तंभ क्रमांक ३ मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील वीज सुविधा असणाऱ्या कुटुंबाचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

२. स्तंभ क्रमांक ४ मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील घरात वीज सुविधा नसणाऱ्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

३. स्तंभ क्रमांक ३ मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील वीज सुविधा असणाऱ्या कुटुंबांचे सर्व्हेक्षित सात जमातीतील वीज सुविधा असणाऱ्या एकूण २०९ कुटुंबाशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

४. स्तंभ क्रमांक ४ मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील घरात वीज सुविधा आहे. तर ५०.२४ टक्के कुटुंबांकडे वील्ल सुविधा नाही. सर्व्हेक्षित ४२० कुटुंबांपैकी जवळ जवळ निम्या कुटुंबाकडे वीज सुविधा नाही. गरीबी हे त्यामागाचे प्रमुख कारण आहे.

विविध सात जमातींचा तुलनात्मक दृष्टया विचार करता वरील तक्त्यावरुन असे दिसते की, घरात वीज सुविधा असणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण महादेव कोळी आणि कोकणा या जमातीत असून ते प्रत्येकी २१.०५ टक्के आहे. तर वीज सुविधा असणाऱ्य कुटुंबांचे सर्वात कमी प्रमाण ढोरकोळी (६.२३ टक्के) आणि क ठाकूर (६.६७ टक्के) या जमातीत आहे.

**जमातीनुसार तक्त्याचे स्पष्टीकरण -**

१. **महादेव कोळी** - एकेका जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता वरील तक्त्यावरुन असे दिसते की, महादेव कोळी जमातीत वीज सुविधा असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ७३.३३ टक्के आहे. तर वीज सुविधा नसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण कमी असून ते २६.६७ टक्के आहे.

२. **ढोरकोळी** - ढोरकोळी जमातीत वीज सुविधा असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण अत्यंत कमी असून ते २१.६७ टक्के आहे.तर घरात वीज सुविधा नसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ७८.३३ टक्के एवढे मोठे आहे.

३. **कातकरी** - कातकरी जमातीत वीज सुविधा असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ४५.०० टक्के आहे. तर घरात वीज सुविधा नसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ५५.०० टक्के एवढे मोठे आहे.

४. **वारली** - वरील तक्त्यावरुन असे दिसते की, वारली जमातीत वीज सुविधा असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ५५.०० टक्के आहे. तर घरात वीज सुविधा नसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण४५.०० टक्के आहे.

५. **कोकणा** - कोकणा जमातीत वीज सुविधा असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ७३.३३ टक्के आहे. तर घरात वीज सुविधा नसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण २६.६७ टक्के एवढे अल्प आहे.

६. **म ठाकूर** - म ठाकूर जमातीत वीज सुविधा असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ५६.६७ टक्के आहे. तर घरात वीज सुविधा नसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ४३.३३ टक्के आहे.

**७. क ठाकूर** - वरील तक्त्यावरुन असे दिसते की, घरात वीज सुविधा असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अत्यंत कमी असून ते २३.३३ टक्के आहे.तर घरात वीज सुविधा नसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ७६.६७ टक्के आहे.

वरील तक्त्यावरुन आणि स्पष्टीकरणावरुन असे दिसते की, महादेव कोळी आणि कोकणा या जमातीत वीज सुविधा असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण इतर जमातींच्या तुलनेत मोठे आहे. म्हणून महादेव कोळी आणि कोकणा या जमाती इतर जमातीपेक्षा थोडया पुढारलेल्या आहेत असा निष्कर्ष निघतो.

## ३.७ पाण्याची सुविधा -

खालील तक्त्यात सर्व्हेक्षण केलेल्या ४२० आदिवासी कुटुंबांना पिण्याचे व वापराचे पाणी कोठून आणावे लागते याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक ३.७**

**पाण्याची सुविधा**

| अ. क्र | जमातीचे नाव | बुडक्यातुन पाणी आणणाऱ्या कुटुंबांची संख्या | स्वतंत्र पाईप लाईनने पाणी मिळणाऱ्य कुटुंबांची संख्या | बुडक्यातून व पाईपने (नळाने) पाणी मिळणाऱ्या कुटुंबांची संख्या | कुटुंबांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | महादेव कोळी | ६०(१००) (१४.३५) | ० | ० | ६० |
| २ | ढोरकोळी. | ६०(१००) (१४.३५) | ० | ० | ६० |
| ३ | कातकरी. | ५८(९६.६७) (१३.८७) | ० | ०२(३.३३) १०० | ६० |
| ४ | वारली. | ६०(१००) (१४.३५) | ० | ० | ६० |
| ५ | कोकणा. | ६०(१००) (१४.३५) | ० | ० | ६० |
| ६ | म ठाकूर | ६०(१००) (१४.३५) | ० | ० | ६० |
| ७ | क ठाकूर | ६०(१००) (१४.३५) | ० | ० | ६० |
| | एकूण | ४१८(९९.३५) (१००) | ० | ०२(३.३३) १०० | ४२०(१००) |

१. स्तंभ क्रमांक ३ मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील बुडक्यातून पाणी आणणाऱ्या कुटुंबांचे त्याच एका विशिष्ट जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण कुटुंबाशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

२. स्तंभ क्रमांक ३ मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील बुडक्यातून पाणी आणणाऱ्या कुटुंबांचे सर्व्हेक्षित सात जमातीतील बुडक्यातून पाणी आणणाऱ्या एकूण ४१८ कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

३. स्तंभ क्रमांक ५ मधील वरच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी कातकरी जमातीतील बुडक्याचे व नळाचे पाणी उपलब्ध असणाऱ्या कुटुंबाचे त्याच जमातीतील सर्व्हेक्षण केलेल्या एकूण ६० कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

४. स्तंभ क्रमांक ५ मधील खालच्या कंसातील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी कातकरी जमातीतील बुडक्याचे व नळाचे पाणी उपलब्ध असणाऱ्या कुटुंबांचे सर्व्हेक्षण केलेल्या सर्व जमातीतील बुडक्याचे व नळाचे पाणी उपलब्ध असणाऱ्य एकूण ०२ कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, स्वतंत्र पाईप लाईन / नळपाणी व्यवस्थेने एकाही आदिवासी कुटुंबाला पाणी मिळत नाही. केवळ ०.४७ टक्के आदिवासी कुटुंबांना पाईपने पाणी मिळते व ही कुटुंबे बुडक्यातून सुदधा पाणी भरतात. पाईपने किंवा नळाने जे पाणी मिळते ते पिण्यास लायक नसून ते केवळ भांडी धुण्यासाठी व आंघोळीसाठी वापरले जाते. बुडक्यातून पाणी भरणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे शेकडा प्रमाण ९९.५३ एवढे मोठे असल्याचे वरील तक्त्यावरुन दिसून येते. चार ते पाच फूट खोली असलेल्या आणि साधारणपणे तेवढाच घेर असलेल्या व विहिरीसारख्या दिसणाऱ्या अत्यंत छोटया डबक्यांना बुडके असे म्हणतात. या बुडक्यांना पावसाळयात तसेच जास्तीत जास्त होळी पर्यंत पाणी असते. त्यानंतर आदिवासींना पाण्यासाठी खूप पायवीट करावी लागते.

## ३.७ पाणी टंचाई जाणवणाऱ्य कुटुंबांचे प्रमाण-

खालील तक्त्यात सर्व्हेक्षण केलेल्या ४२० आदिवासी कुटूंबांना पिण्याचे पाणी कोठून आणावे लागाते याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक ३.७**

**पाणी टंचाई जाणवणाऱ्य कुटुंबांचे प्रमाण**

| अ.क्र | जमातीचे नाव | पाणी टंचाई जाणवणाऱ्या कुटुंबांची संख्या व प्रमाण | पाणी टंचाई न जाणवणाऱ्या कुटुंबांची संख्या व प्रमाण | कुटुंबांची एकूण संख्या व प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | महादेव कोळी | ३८(६३.३३)<br>(१५.३२) | २२(३६.६७)<br>(१२.८०) | ६०(१००) |
| २ | ढोरकोळी. | ० | ६०(१००)<br>(३४.८८) | ६०(१००) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | कातकरी. | ५९(९८.३४)<br>(२३.८०) | ०१(१.६६)<br>(०.५८) | ६०(१००) |
| ४ | वारली. | ४८(८०.००)<br>(१९.३५) | १२(२०.००)<br>(६.९७) | ६०(१००) |
| ५ | कोकणा. | २६(४३.३३)<br>(१०.४८) | ३४(५६.६७)<br>(१९.७७) | ६०(१००) |
| ६ | म ठाकूर | ३१(५१.६७)<br>() | २९(४८.३३)<br>(१६.८८) | ६०(१००) |
| ७ | क ठाकूर | ४६(७६.६७)<br>(१८.५५) | १४(२३.३३)<br>(८.१२) | ६०(१००) |
| | **एकूण** | **२४८(५९.०४)**<br>**(१००)** | **१७२(४०.९६)**<br>**(१००)** | **४२०(१००)** |

*कंसातील आकडे टक्केवारी आहे.*

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी निम्यापेक्षा जास्त म्हणजे ५९.०४ टक्के कुटुंबांना दरवर्षी पाण्याच्या टंचाईला तोंड द्यावे लागते. ४०.९६ टक्के कुटुंबांना पाण्याचा प्रश्न भेडसावत नाही.

विविध जमातींचा तुलनात्मकदृष्टया विचार करता वरील तक्त्यावरुन असे दिसते की, पाणी टंचाई जाणवणाऱ्या कुटुंबांचे सर्वात जास्त प्रमाण कातकरी या जमातीत असून ते २३.८० टक्के आहे. त्या खालोखाल हे प्रमाण वारली (१९.३५टक्के) आणि क ठाकूर (१८.५५ टक्के) या जमातीत आहे. ढोरकोळी जमातीतील एकाही कुटुंबाला पाणी टंचाईला सामोरे जावे लागत नाही असे वरील तक्त्यावरुन दिसते.

**जमातीनुसार स्पष्टीकरण -**

१. **महादेव कोळी -** एकेका जमातीचा स्वंतत्रपणे विचार करता असे दिसते की, महोदव कोळी जमातीत पाणी टंचाई जाणवणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ६३.३३ टक्के आहे.तर पाणी टंचाई न भेडसावणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ३६.६७ टक्के आहे.

२. **ढोरकोळी -** ढोरकोळी जमातीत पाणी टंचाई जाणवणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण शून्य आहे.

३. **कातकरी -** कातकरी जमातीत पाणी टंचाई जाणवणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ९८.३४ टक्के आहे. तर पाणी टंचाई न भेडसावणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अवघे १.६६ टक्के आहे.

४. **वारली -** वरील तक्त्यावरुन असे दिसते की, वारली जमातीत पाणी टंचाई जाणवणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ८०.०० टक्के आहे. तर पाणी टंचाई न भेडसावणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण २०.०० टक्के आहे.

५. **कोकणा -** कोकणा जमातीत पाणी टंचाई जाणवणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ४३.३३ टक्के आहे. तर पाणी टंचाई न भेडसावणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ५६.६७ टक्के आहे.

**म ठाकूर -** म ठाकूर जमातीत पाणी टंचाई जाणवणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ५१.६७ टक्के आहे. तर पाणी टंचाई न भेडसावणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ४८.३३ टक्के आहे.

**७.क ठाकूर -** वरील तक्त्यावरुन असे दिसते की, क ठाकूर जमातीत पाणी टंचाई जाणवणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण मोठे असून ते ७६.६७ टक्के आहे.तर पाणी टंचाई न भेडसावणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण २३.३३ टक्के आहे.

**३.७. पाणी टंचाईचे महिने -** खालील तक्त्यात पाणी टंचाई जाणवणाऱ्या ५९.०४ टक्के कुटुंबांना वर्षातील किती महिने पाणी टंचाईला तोंड दयावे लागते याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक ३.७**

**पाणी टंचाईचे महिने**

| अ.क्र | जमातीचे नाव | २ महिने पाणी टंचाई जाणवणाऱ्या कुटुंबांची संख्या | ३ महिने पाणी टंचाई जाणवणाऱ्य कुटुंबांची संख्या | ४ महिने पाणी टंचाई जाणवणाऱ्य कुटुंबांची संख्या | ५ महिने पाणी टंचाई जाणवणाऱ्य कुटुंबांची संख्या | कुटुंबांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महादेव कोळी | १३ | ० | २५ | ० | ३८ |
| २ | ढोरकोळी. | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | कातकरी. | ५३ | ०६ | ० | ० | ५९ |
| ४ | वारली. | ०४ | १६ | २५ | ०३ | ४८ |
| ५ | कोकणा. | २२ | ० | ०४ | ० | २६ |
| ६ | म ठाकूर | ० | ३१ | ० | ० | ३१ |
| ७ | क ठाकूर | ० | ० | ४६ | ० | ४६ |
| | एकूण | ९२(३७.१०) | ५३(२१.३८) | १००(४०.३२) | ०३(१.२०) | २४८(१००) |

***कंसातील आकडे टक्केवारी आहे.***

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांपैकी २४८ कुटुंबांना वर्षातील दोन ते पाच महिने पाणी टंचाईला तोंड द्यावे लागते. दोन महिने पाणी टंचाई जाणवणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ३७.१० टक्के आहे.तीन महिने पाणी टंचाई जाणवणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण २१.३८ टक्के आहे. वर्षातील चार महिने पाणी टंचाई जाणवणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ४०.३२ टक्के आहे.

**सारांश -**

अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या घराचा दर्जा अत्यंत सामान्य आहे. कच्च्या किंवा साध्या घरातील जमिनीचा दर्जा अत्यंत सामान्य आहे. ९६.९० टक्के कुटुंबांच्या घरातील

जमीन मातीची व शेणाची आहे. फरशीयुक्त जमीन असलेल्या  घरांचे प्रमाण ३.१० टक्के आहे. बहुसंख्य आदिवासी (८९.५३ टक्के) एक ते दोन खोल्या असणाऱ्या घरात राहतात. स्वयंपाकाची व्यवस्था खोलीतच एका बाजूला असून तेथेच आदिवासी विश्रांती घेतात किंवा उठबस करतात. आंघोळीची सुविधा घरात असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाणही अल्प आहे (३२.४२ टक्के) तर घराबाहेर आंघोळ करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ६७.५८ टक्के एवढे मोठे आहे. शौचालयाची सुविधा केवळ १.१९ टक्के कुटुंबांकडे असून बहुसंख्य (९८.८१टक्के ) कुटुंबांकडे संडास नाही. त्यामुळे त्यांना माळावर किंवा उघडयावर शौचास जावे लागते. सांडपाण्याची व्यवस्था नसणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण मोठे असून ते ९९.२९ टक्के आहे.घरात विजेची सुविधा नसणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ५०.२४ टक्के एवढे मोठे आहे. बहुसंख्य (९९ टक्के पेक्षा जास्त) आदिवासींना बुडक्यातून पाणी आणावे लागते. ५९.०४ टक्के कुटुंबानां पाण्याची टंचाई जाणवते. वर्षातील दोन ते पाच महिने पाणी टंचाईला तोंड द्यावे लागते. वरील सर्व बाबींचा विचार करता अभ्यास क्षेत्रातील आदिवासींच्या घराचा दर्जा अत्यंत सामान्य असल्याचे स्पष्ट होते.

****

## TRIBAL RESEARCH & TRAINING INSTITUTE'S PUBLICATIONS FOR SALE

## संस्थेची विक्रीची प्रकाशने

| Sr. No. | Name | Price Rs. |
|---|---|---|
| 1. | An Overview Of Tribal Research Studies | 100.00 |
| 2. | Strategies For Promotion & Propagation Of Tribal Arts & Handicrafts | 50.00 |
| 3. | *"Nagarikanchi Sanad"* (Marathi Publication Of TDD, Mumbai) | 16.00 |
| 4. | Bi-Annual Publication "Tribal Research Bulletin"<br><br>(Annually subscription Is Rs.100/- only) | (Rs. 50/- per Bulletin) |
| 5. | Tribal Handicrafts of Maharashtra : Cultural & Transitional Perspective. | Rs.190/- |
| 6. | Tribal Development issues and challenges | Rs.225/- |
| 7. | The Mavchies | 85/- |
| 8. | Tribal Ornaments | 50/- |

Government Photozinco Press, Pune 411 001.



रायगड जिल्ह्यातील
कातकरी जमातीची झोपडी



घराजवळ भातशेती करतांना रायगड
जिल्हयातील कातकरी समाज



वारली जमातीचे घर व परिसर

# TRIBAL RESEARCH BULLETIN

Tribal Research & Training Institute,
Maharashtra State, Pune-411001.
Web Site : http://trti.mah.nic.in
Email: trti.mah@nic.in

Tribal Research Bulletin is a bi-annual bulletin published in March and September. Contributors can contribute articles pertaining to various aspects related to tribal life, culture and development.

### Guidelines for Contributors

The manuscripts to be published in this Bulletin should be typewritten in double space on one side of the paper and carefully edited for matter as well as language and corrected for any typing errors. The matter should be organized under suitable headings. Tables should be preferably incorporated in the body of the paper with relevant interpretation. Charts and maps should be in black and white only. Soft copy of the manuscript is welcome.

Manuscripts are not returned.

The views expressed by the authors do not necessarily reflect the views of the Government, and the Editor is not responsible for the views expressed by the authors.

The contributors will be given 2 reprints and two copies of the Bulletin.

All correspondences should be addressed to the Commissioner, Tribal Research and Training Institute, 28, Queen's Garden, Pune-411001.

Registration No. 37/438/79

**FORM IV**

(See Rule 80)

| | |
|---|---|
| 1. Place of publication | 28, Queen's Garden, Pune-411001 |
| 2. Periodicity of Publication | Bi-annual |
| 3. Printer's Name | Manager Photozinco Press, Pune-411001 |
| Nationality Address | Indian Photozinco Press, Pune-411001 |
| 4. Publisher's Name | D.D. Mayee |
| Nationality Address | Indian 28, Queen's Garden, Pune-411001 |
| 5. Editor's Name | D.D. Mayee |
| Nationality Address | Indian 28, Queen's Garden Pune-411001 |

I, D.D. Mayee, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

D.D. Mayee
(Signature of Publisher)

Annual Subscription Rs. 100/-
Cost of Single copy Rs.50/-

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - ४११ ००१.